CMYK

सोलापूर **तरुण भारत**
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

**आजचा सामना**
पंजाब वि. गुजरात
वेळ : दु.३.३० वाजता
ठिकाण : चंदीगढ

**आजचा सामना**
चेन्नई वि. दिल्ली
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : चेन्नई

सोलापूर | शनिवार, ११ एप्रिल २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १३३ | पाने १२ | किंमत रु. ८/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



नि एकदा आपण संघटनेमध्ये काम करायचे असे ठरविले की आपण या संघटनेचा अविभाज्य भाग बनले पाहिजे. संघटना आणि कार्यकर्ता या दोन गोष्टी स्वतंत्र राहूच शकत नाहीत. कार्यकर्त्याशिवाय संघटना नाही आणि संघटनेशिवाय कार्यकर्ता नाही.

- **पद्मविभूषण पी. परमेश्वरन्**
संस्थापक, भारतीय विचार केंद्र,
पूर्व अध्यक्ष विवेकानंद केंद्र

## विनम्र अभिवादन



थोर समाजसुधारक आणि महिलांच्या शिक्षणासाठी आग्रही असणारे महात्मा जोतिबा फुले यांची आज जयंती

# दहशतवादाच्या नंदनवनात आज शांतता चर्चा!

## अमेरिकेचे शिष्टमंडळ इस्लामाबादेत; इराणच्या नेत्यांची प्रतीक्षा

◆ **वॉशिंग्टन/इस्लामाबाद, १० एप्रिल**

अमेरिकेसोबत मध्यपूर्वेतील संघर्षविरामासाठी पाकिस्तानमध्ये होणारी प्रस्तावित शांतता चर्चा लेबनॉनवरील हल्ल्यावर इराणने घेतलेल्या आक्षेपामुळे शुक्रवारी स्थगित करण्यात आली. शनिवारी होणाऱ्या चर्चेसाठी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स इस्लामाबाद येथे पोहोचले असताना अद्याप इराणचे शिष्टमंडळ मात्र दाखल झाले नसल्याने शांतता चर्चा होणार की नाही यावरच संभ्रम आहे.

दरम्यान चर्चेसाठी इराणने आणखी दोन अटी ठेवताना लेबनॉनवरील हल्ले थांबवावेत आणि इराणची जगभरात गोठवलेल्या मालमत्तेवरील निर्बंध उठविण्याची मागणी केली. तसेच वाटाघाटी सुरू होण्यापूर्वी या दोन अटींची पूर्तता होणे आवश्यक असल्याचे इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद गालिबाफ यांनी म्हटले आहे.

इस्रायलकडून लेबनॉनवर सुरू असलेल्या हल्ल्यामुळे अटीचे उल्लंघन होत असल्याचा आरोप इराणचा आहे. पश्चिम आशियामध्ये अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेले युद्ध संपवण्यासाठीच्या महत्त्वपूर्ण राजनैतिक प्रयत्नांचा एक भाग म्हणून जे.डी. व्हान्स, विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे सल्लागार जेरेड कुशनर शुक्रवारी पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे पोहोचले. दुसरीकडे इराणच्या शिष्टमंडळातील अब्बास अराघची आणि मोहम्मद गालिबाफ पोहोचले नाहीत. (वृत्तसंस्था)





इस्लामाबादमध्ये लावण्यात आलेला कडेकोट बंदोबस्त

### दगाफटका खपवून घेणार नाही



**अमेरिकेतून रवाना होताना जे.डी व्हान्स म्हणाले, आम्ही प्रामाणिक संवादासाठी तयार आहे, पण कोणताही दगाफटका झाल्यास इराणला मोठी किंमत चुकवावी लागेल. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी इराणने दिलेल्या १० कलमी अजेंड्यातील अटी बदलून अमेरिकेला सादर केल्या. लेबनॉनवरील हल्ले थांबविण्याची अट शरीफ यांनी काढून टाकल्याचा आरोप त्यांनी केला.**

### पाकिस्तानचे ऑपरेशन आयर्न एस्कॉर्ट

**ऐतिहासिक शांतता चर्चेचे यजमानपद भूषवणारा पाकिस्तान सध्या हाय-अलर्टवर आहे. वायुदलाने जेएफ-१७ थंडर, आणि एफ-१६ विमाने शिष्टमंडळाला हवाई सुरक्षा कवच पुरवण्यासाठी तैनात केली. या मोहिमेला 'ऑपरेशन आयर्न एस्कॉर्ट' असे नाव दिले आहे. केवळ हवेतच नव्हे, तर जमिनीवरही कडेकोट बंदोबस्त तैनात आहे. इस्लामाबादमध्ये सध्या संपूर्ण टाळेबंदी असून दहा हजार सैनिकांच्या तुकड्या सुरक्षेसाठी तैनात आहेत.**

# भाजयुमोच्या मुंबई सचिवपदी कुलकर्णी



**मुंबई** : भाजपा युवा मोर्चा मुंबई सचिवपदी विराज कुलकर्णी यांची निवड झाली आहे. यामध्ये उपाध्यक्ष- कौशिक पाटील, प्रद्युम्न सावंत, राजेंद्र मोरे, वेदांत लालवानी, विवेक पांडे, साई नायडू, अनुप पाठक, तहवेद शेख. सरचिटणीस- कमलेश डोके, अक्षय निकाळजे, स्नेहा वेमुळकर, सचिव- प्रणव ठाकूर, विराज कुलकर्णी, जय कवठणकर, अक्षय ठाकूर, रोनक दोशी, जय थेवर, आलोक सिंह, वेदांत तिवारी, कोषाध्यक्ष- सचिन सूर्यवंशी, विद्यार्थी सेल - रिया खानोलकर, सोशल मीडिया- सुरत शर्मा व रोहित कांबळे, मीडिया- संजय यादव, कार्यालय - प्रमोद शुक्ला.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank

₹२५,००० कोटींच्या व्यवसायाची अभिमानास्पद वाटचाल, प्रगतीचा नवा अध्याय

७ राज्यात उपस्थिती

१६५ शाखांचे विस्तृत जाळे

लेखापरीक्षित निकाल

(₹ कोटींमध्ये)

| तपशील | ३१-०३-२०२६ | ३१-०३-२०२५ |
|---|---|---|
| एकूण व्यवसाय | २५,३६० | २३,१०५ |
| ठेवी | १६,२४४ | १४,८४९ |
| कर्जे | ९,११६ | ८,२५६ |
| ढोबळ नफा | २८७ | २५२ |
| निव्वळ नफा | १५५ | १८५ |
| स्वनिधी | १,७७३ | १,६३९ |
| ढोबळ अनुत्पादित कर्जे | ३.११% | ३.५९% |
| निव्वळ अनुत्पादित कर्जे | 0.00% | 0.00% |
| पुंजी पर्याप्तता | १६.८९% | १७.४८% |

www.tjsb.bank.in | Toll Free: 1800 266 3466 | 1800 103 466

# दहशतवादी कट उधळला

## ●पंजाब, दिल्ली येथून ११ आरोपींना अटक●

**नवी दिल्ली** : दिल्ली पोलिसांना एक मोठे यश मिळाले आहे. स्पेशल सेलने आंतरराज्यीय गुप्तहेरगिरी आणि शस्त्र तस्करी करणाऱ्या एका मोठ्या टोळीचा भंडाफोड केला आहे. ही टोळी पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयद्वारे चालवली जात होती.

पोलिसांनी या टोळीच्या ११ सदस्यांना दिल्ली आणि पंजाबमधून अटक केली आहे. तसेच त्यांच्याकडून विदेशी आणि देशी पिस्तूल, जिवंत काडतुसे आणि अनेक संशयास्पद सिम कार्डही जप्त केले आहेत. दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार, स्पेशल सेलच्या दोन पथकांनी देशाच्या विविध भागात आयएसआयच्या मदतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवणाऱ्या एका नेटवर्कचा भंडाफोड केला आहे. या टोळीने शस्त्र तस्करी आणि ग्रेनेड हल्ल्यांचेही नियोजन केले होते. तसेच त्यांनी सौरऊर्जेवर चालणारे सीसीटीव्ही कॅमेरे बसवले होते. ज्यांचे फुटेज पाकिस्तानला पाठवले जात होते. अनेक ठिकाणांचे व्हिडिओग्राफीदेखील करण्यात आले असून ते परदेशात पाठवण्यात आले आहे. पंजाब, दिल्लीतील व्यक्तींना अटक करण्यात आली आहे.


# मोदींच्या हत्येचा कट; बिहारमधून तिघांना अटक

**बक्सर** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हत्येचा कट आखल्याच्या आरोपाखाली बिहारमध्ये तीन आरोपींना अटक केल्याने खळबळ उडाली आहे.


हे तिघेही अमेरिकन गुप्तचर संस्था 'सीआयए'च्या संपर्कात असल्याची माहिती मिळाली आहे. बिहारमधील डुमराव उपविभागातील सिमरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आशा पडरी गावात बुधवारी रात्री उशिरा छापा टाकून एका तरुणासह तीन जणांना अटक केली आहे. चौकशीदरम्यान आरोपींकडून या संपूर्ण नेटवर्क आणि आंतरराष्ट्रीय संबंधांशी संबंधित अनेक महत्त्वाचे खुलासे होऊ शकतात. अमन कुमार, असे मुख्य आरोपीचे नाव आहे. बक्सरचे एसपी शुभम आर्य यांच्या निर्देशानुसार विशेष पथक तयार करण्यात आले. पथकाने कारवाई करत आशा पडरी गावात छापा टाकून तिन्ही आरोपींना अटक केली.

# अनंत अंबानी यांच्या पुढाकाराने जामनगरमध्ये वनतारा विद्यापीठाची स्थापना - वन्यजीव संरक्षण आणि पशुवैद्यकीय शास्त्राला वाहिलेले जगातील पहिले एकात्मिक गुरुकुल

**वनताराने जगातील पहिल्या वन्यजीव आणि पशुवैद्यक जागतिक विद्यापीठाची स्थापना केली. हे विशिष्ट हेतूंसाठी निर्माण केलेले आधुनिक काळातील गुरुकुल होणार असून, वन्यजीव आणि पशुवैद्यक शिक्षण या क्षेत्रात देशाला जगात प्रमुख स्थान मिळावे हा यामागील हेतू आहे.**







**जामनगर, ९ एप्रिल** : रिलायन्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक अनंत अंबानी यांनी स्थापन केलेल्या वनतारा या जागतिक वन्यजीव संरक्षक संघटनेने गुजरातच्या जामनगरमध्ये वनतारा विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा केली आहे. वन्यजीव संरक्षण आणि पशुवैद्यक शास्त्र या क्षेत्राला वाहून घेतलेले हे जगातील पहिले एकात्मिक जागतिक विद्यापीठ असेल.

पशु कल्याण क्षेत्रातील शास्त्रीय संशोधन वाढवणे तसेच वन्यजीव संरक्षणाचे भवितव्य या क्षेत्रांवर विद्यापीठाचा भर असेल. पशुवैद्यक औषधे, वन्यजीव संरक्षण आणि वन्यजीवांचे जतन या क्षेत्रात पुढील तज्ज्ञ निर्माण करणे, हे विद्यापीठाचे ध्येय आहे. या विद्यापीठाचे अभ्यासक्रम या क्षेत्रातील भारताच्या परंपरागत ज्ञानाचा वापर करून, या क्षेत्रातील शिक्षणाचे विशिष्ट हेतूंवर आधारित आणि भविष्यकाळासाठी सज्ज असे मॉडेल तयार करतील.

आपण वन्यजीवांच्या सेवेसाठी सहानुभूती, ज्ञान आणि कौशल्य यांच्या साह्याने आपले मन तसेच संस्था कशा घडवतो, यावर पशुसंवर्धनाचे भविष्य अवलंबून राहील. या वन्य जीवांना होणारा त्रास पाहणाऱ्या आणि त्यांची काळजी घेण्याच्या क्षेत्रात बरेच काही करण्याची आवश्यकता जाणणाऱ्या एका वैयक्तिक प्रवासातून वनतारा विद्यापीठ आकारास आले आहे. पुरातन नालंदा विद्यापीठाची मार्गदर्शक मूल्ये आणि 'आ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः' हे ऋग्वेदातील बोधवाक्य, म्हणजेच आदर्श विचार सर्व दिशांनी आपल्याकडे येऊ दे. या बोधवाक्यानुसार, प्रत्येक जीवाचे संरक्षण करणारी नवी पिढी तयार करण्यासाठी हे विद्यापीठ कटिबद्ध आहे, असे अनंत अंबानी म्हणाले.

ही बोधतत्वे अधोरेखित करणारे दोन बिजोलिया पाषाण, विद्यापीठाच्या भूमिपूजनाच्या जागीच उभारले आहेत. पुरातन विंध्यन संस्कृतीची परंपरा सांगणारे हे पाषाण सध्याच्या बिहारमध्ये असलेल्या पुरातन नालंदा विद्यापीठाची परंपरा सांगतात. हे पाषाण भारताच्या ज्ञान आणि शिक्षणाच्या समृद्ध परंपरेचे प्रतीक आहेत.

विद्यापीठाचा भूमिपूजन समारंभ हिंदू परंपरेनुसार झाला. यावेळी शिक्षण शास्त्र, वन्य जीव जतन आणि सार्वजनिक क्षेत्रातील अनेक मान्यवर हजर होते. यात अनंत अंबानी यांचे शिक्षक आणि त्यांना घडवणारे थोर व्यक्तिमत्वे हजर होती. जल, माती आणि पाषाण यांची धार्मिक परंपरागत पद्धतीने स्थापना करून त्याद्वारे प्रतिकात्मक पायाभरणी करण्यात आली. हे सर्व भाग, भारताच्या वेगवेगळ्या जैवविविधतेने समृद्ध असलेल्या ठिकाणांवरून म्हणजेच गवताळ भाग, जंगल, पाणथळ क्षेत्र, हिमालय आणि अन्य पर्वतरांगा येथून आणले होते. भारताच्या उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम आणि मध्य भागातून आणलेले हे भाग, भारताच्या समृद्ध पर्यावरणाचे आणि देशाच्या समृद्ध नैसर्गिक वारशाच्या पायावर आधारित विद्यापीठ उभारण्याच्या दूरदृष्टीचे प्रतीक होते.

वनतारा विद्यापीठ या क्षेत्रातील भिन्नभिन्न विद्या शाखांचे एकाच शैक्षणिक परियंत्रणेत एकत्रिकरण करेल. आजच्या जगातील वन्यजीव संरक्षण व्यवस्थेशी हा अभ्यासक्रम निगडित असेल. वनताराने या क्षेत्रात आतापर्यंत केलेल्या कामाच्या अनुभवाचा लाभ घेऊन हे विद्यापीठ, हा प्रत्यक्ष अनुभव आपल्या शैक्षणिक अभ्यासक्रमात, व्यावसायिक प्रशिक्षणात आणि जागतिक आराखड्यात समाविष्ट करेल. प्राण्यांविषयीची दयाभावना, शास्त्र आणि वन्यजीवांचे जतन, या सर्व बाबी एकत्रित करून या विद्यापीठात तज्ज्ञ व्यावसायिकांनी वन्यजीव आणि त्यांच्या परियंत्रणेचे आरोग्य, यांच्याशी संबंधित गुंतागुंतीच्या आव्हानांवर मात करावी, त्यावर तोडगा काढावा, यासाठी त्यांना सज्ज केले जाईल.

### वनताराबाबत

**वनतारा हा वन्यजीव सुरक्षा, पुनर्वसन, आरोग्य सेवा आणि जतन यासाठी गुजरातच्या जामनगरमध्ये स्थापन केलेला उपक्रम आहे. आधुनिक पशुवैद्यक औषधी शास्त्र, संगोपन आणि काळजी तसेच प्राणीजतनाचे मोठ्या प्रमाणावर नियोजन यांचे एकत्रीकरण करून वनतारा विशेष औषध उपचार, निगा आणि वेगवेगळ्या जातीच्या प्राण्यांची दीर्घकालीन काळजी घेण्यास सज्ज आहे. बंदिस्त वातावरणात प्राण्यांची पुनरुत्पत्ती, अस्तंगत होत चाललेल्या प्राण्यांची संख्या वाढवणे तसेच वन्य जीवसृष्टी वाढवणे यात मोठा सहभाग घेणारी वनतारा ही वन्यजीव आरोग्य, पशु जतनशास्त्र आणि दुर्मिळ प्रजातींची पुनर्स्थापना या क्षेत्रात ख्यातनाम संस्था म्हणून नावारूपाला येत आहे.**

या विद्यापीठात पदवीपूर्व, पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच विशेष अभ्यासक्रम असतील. यात वन्य जीव औषधे आणि शस्त्रक्रिया, पोषण त्यांची वर्तणूक शास्त्र, त्यांची अनुवंशिकता, साथीचे रोग, आरोग्य संरक्षणाचे धोरण तसेच नैसर्गिक पशुसंवर्धन पूरक वातावरण निर्मिती यांचा समावेश राहील. वनताराच्या कामाशी सुसंगत अशी क्षमता असलेल्या विशेष महाविद्यालयांमध्ये विद्यापीठातर्फे सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या निम्नस्तरातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीदेखील दिली जाईल. या विद्यापीठात अत्याधुनिक शैक्षणिक आणि वैद्यकीय पायाभूत सुविधा, वेगवेगळ्या प्रकारचे आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि निवासी संकुल असेल. पशु संगोपन आणि आधुनिक पशुसंवर्धन पद्धती यांना सक्षम करण्यासाठी कृती आधारित संशोधनावर विद्यापीठ भर ठेवेल. संवर्धन क्षेत्रातील नव्या जुन्या पद्धतीचे एकत्रीकरण करून वन्यजीवांची नैसर्गिक जीवन पद्धती आणि वन्यजीवांची शास्त्रीय काळजी तसेच त्यांचे दीर्घकालीन कल्याण आणि व्यवस्थापन यांची सांगड येथे घातली जाईल.

पशुसंवर्धनाचे भविष्य हे महाविद्यालयातील वर्गांमध्ये, प्रयोगशाळांमध्ये, माणसांच्या सद्विवेक बुद्धीमध्ये तसेच जंगलांमध्ये निर्माण होईल, हे ध्यानात घेऊन वन्यजीव पशुवैद्यक शास्त्र आणि पशुसंवर्धन शिक्षण यांचे आधुनिकीकरण करण्याचा विद्यापीठाचा निर्धार आहे. त्याचबरोबर वन्यजीव आरोग्य, प्राण्यांची निगा राखण्याच्या वातावरणाची निर्मिती आणि पशुसंवर्धन यांचे ज्ञानभंडार विकसित करून या क्षेत्रातील शिक्षण, संशोधन आणि नवकल्पना यांच्यासाठी ते दीर्घकालीन व्यासपीठ म्हणून उपयोगात येईल, याचा प्रयत्नही याचवेळी विद्यापीठातर्फे केला जाईल.

दयाबुद्धीचे पशुसंवर्धन प्रशिक्षण सुरू करण्याच्या राष्टीय प्रयत्नांची दखलही पायाभरणी समारंभात घेण्यात आली. या दृष्टीने 'वनतारा युनिव्हर्सिटी फाऊंडिंग फेलोज' आणि 'एव्हरी लाईफ मॅटर्स' या शिष्यवृत्त्यांची घोषणा करण्यात आली. ज्ञानाचा उपयोग केवळ प्रगतीसाठीच नव्हे, तर संरक्षणासाठीही करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

वनतारा विद्यापीठ हे शैक्षणिक व्यवस्थेपेक्षाही वेगळ्या स्तरावर असल्याचे उद्दिष्ट अधोरेखित करण्यात आले आहे. वन्यजीव संरक्षणासाठी केवळ प्रशंसाच नव्हे तर ज्ञानव्यवस्था आणि प्रशिक्षित व्यक्तींची गरज असल्याचेही त्यातून स्पष्ट होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/





# नांदणी टोलनाक्यावर वाहनधारकांची लूट

## नियमांचे उल्लंघन

## वाहनचालकांना जाणीवपूर्वक त्रास

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.१० एप्रिल-**

सोलापूर विजयपूर महामार्गावरील मंद्रपणाने टोलनाक्यावर कोणत्याही सुविधा नसताना व रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे असताना वाहनधारकांकडून टोल घेऊन वाहनचालकांची लूट करण्यात येत आहे.

शासनाचे नियम धाब्यावर बसवून वाहनचालकांची लूट होत असल्याने युवा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मोहसीन पटेल यांनी ठिय्या आंदोलन करून टोलनाका प्रशासनाला धारेवर धरले. त्यामुळे काही काळ वाहतूक खोळंबली होती. लिमका बुक रेकॉर्डमध्ये नोंद करण्यासाठी आय जे एम कंपनीकडून एकाच दिवसात २५ किलोमीटर रस्ता करण्यात आला. कोणत्याही प्रकारची गुणवत्ता नसताना रस्ता बनविण्यात आला. लिमका बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदही झाले. मात्र सहा महिन्यातच या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्यामुळे रस्ता निकृष्ट दर्जाचे झाल्याचे सिद्ध झाले आहे. रस्ता निकृष्ट असताना व रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे असतानाही टोल कंपनी वाहन चालकांकडून टोल घेऊन लूट करण्यात येत आहे. तसेच वाहन चालकांसाठी टोल नाक्यावर कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा नसताना टोल घेण्यात येत आहे. शिवाय परिसरातील वाहन चालक महिन्याभराचा पास काढून प्रवास करत असताना त्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात येत आहे . त्यामुळे पैसा भरूनही अपमानास्पद वागणूक मिळत असल्यामुळे शुक्रवारी दुपारी युवा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मोहसीन महामूद पटेल यांनी टोल नाक्यावर बसून ठिय्या आंदोलन केला. त्यामुळे प्रशासनाची धावपळ सुरू झाली. त्यामुळे टोल कंपनीने सर्व सुविधा उपलब्ध करून देऊन व रस्ता सुरळीत करूनच टोल घ्यावे यासाठी पटेल यांनी राष्ट्रीय महामार्गाकडे तक्रार केली आहे.

आयजेएम कंपनीकडून २४ थासात २५ किलोमीटर रस्ता बनवून लिमका बुकमध्ये रेकॉर्ड करण्यात आला. मात्र सहा महिन्यातच या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले. तसेच रस्ता घसरगुंडी सारखा बनला . रस्ता निकृष्ट बनल्यामुळेच वाहनधारकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. यापूर्वी टोल कंपनीकडे वारंवार तक्रार करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्रबंधक स्वप्निल कासार यांच्याकडे तक्रार केली आहे. स्थानिक वाहनचालकाडून प्रामाणिक टोल भरूनही टोल कंपनीकडून वाहनचालकांवर अन्याय होत आहे.

**- मोहसीन महामूद पटेल,**
**जिल्हाध्यक्ष, युवा स्वाभिमानी शेतकरी संघटना,**

# निक्षय आठवडा स्पर्धेत सोलापूर महापालिका राज्यात प्रथम

## निक्षय दिवा स्पर्धेत शहर क्षयरोग विभागास उत्तेजनार्थ बक्षीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य टीबी सेल राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२४ आणि २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या निक्षय आठवडा स्पर्धेत सोलापूर महानगरपालिकेने प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच निक्षय दिवा स्पर्धेत शहर क्षयरोग विभागास उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले.




महाराष्ट्र डिस्ट्रिक्ट टीबी एसीएसएम अवॉर्ड २०२५-२०२६ नुकतेच जाहीर झाले. या मीअंतर्गत शहर क्षयरोग विभाग सोलापूर महापालिकेने प्रथम क्रमांक मिळविला. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत शंभर दिवसीय टीबी मुक्त भारत अभियानामध्ये निक्षय आठवडा स्पर्धेत सोलापूर महापालिकेला प्रथम तसेच निक्षय दिवा स्पर्धेत शहर क्षयरोग विभागास उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. या दोन उपक्रमांची स्पर्धा घेण्यात आली होती. या उत्कृष्ट, सांघिक कामगिरीबाबत शहर क्षयरोग विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांचे तसेच आरोग्य विभागातील सर्व नागरी आरोग्य केंद्र, आयुष्यमान आरोग्य मंदिर, आरोग्यवर्धिनी केंद्र,एचबीटी केंद्रातील संपुर्ण स्टाफचे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी अभिनंदन केले. आरोग्याधिकारी डॉ. राखी माने, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर यांनी याबाबत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन आणि सहकार्य केले.



### कारखाने, जोखीमग्रस्त भागामध्ये घेतली होती शिबिरे

स्पर्धेमध्ये शहर क्षयरोग केंद्राने योग्य नियोजन करून शहरातील कारखाने, जोखीमग्रस्त भागामध्ये शिबिरे, विविध शाळा, महाविद्यालयामध्ये निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, कविता स्पर्धा आयोजित केल्या तसेच नाविन्यपूर्ण कल्पना वापरून टीबी आजाराविषयक असलेले समज गैरसमज याबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करून समाज माध्यमाद्वारे आयईसी करून व्यापक जनप्रसिद्ध दिली आणि समुदायाचा सहभाग वाढविला सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, महानगरपालिका यांनी सहभाग नोंदवला होता.

# बार्शी नगरपरिषदेत २६८ विकासकामे रखडली

## ठेकेदारांवर कारवाई करण्याची मागणी

## विरोधी नगरसेवकांकडून मुख्याधिकाऱ्यांना स्मरणपत्र सादर



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० एप्रिल-**

बार्शी नगरपरिषदेच्या सन २०२५-२६ च्या सुधारित अर्थसंकल्प व सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पातील नमुना क्र. ८८ (पान क्र. ५८ ते ७२) अंतर्गत नमूद २६८ विकासकामांपैकी अनेक कामे मुदत संपूनही अपूर्ण असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

प्रत्यक्ष पाहणी, स्थानिक नागरिकांकडून प्राप्त तक्रारी तसेच उपलब्ध नोंदींवरुन अनेक कामे अपूर्ण, तर काही ठिकाणी कामांची गती अत्यंत मंद असल्याचे निदर्शनास आले आहे. या परिस्थितीमुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय होत असल्याची शक्यता, नागरिकांना मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध न होणे,प्रशासनावरील विश्वास कमी होणे अशा गंभीर बाबी समोर येत आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ नुसार कामे करार अटींनुसार पूर्ण करणे बंधनकारक आहे. शासन निर्णयानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नमुन्यातील कंत्राट अटी करारानुसार विलंब दंड आकारण्याची तरतूद आहे. त्याचबरोबर करारानुसार करार रद्द करण्याचा अधिकार आहे यावेळी विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे, कृष्णराज बारबोले, राहुल कोंढारे, महेंदमिया लांडगे, नवनाथ माळगे, मुज्जमील पठाण, सचिन मांगडे, नगरसेविका रागिणी पाचपुते, बाळासाहेब पवार, वसंत देवकर, आकाश राऊत उपस्थित होते. सदर प्रकरण अत्यंत गंभीर असल्याने ३० दिवसांच्या आत उच्चस्तरीय चौकशी अहवाल सादर करण्याची मागणी विरोधकांकडून करण्यात आली आहे. अन्यथा पुढील टप्प्यात लोकायुक्त, उच्च न्यायालय किंवा इतर सक्षम प्राधिकरणांकडे कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही विरोधी नगरसेवकांकडून देण्यात आला आहे.

### विरोधी नगरसेवकांच्या मागण्या

सदर प्रकरणात पुढीलप्रमाणे कारवाईची मागणी करण्यात आली आहे. २६८ कामांची स्वतंत्र तांत्रिक व प्रशासकीय चौकशी, संबंधित ठेकेदारांना कारणे दाखवा नोटीस, करारानुसार विलंब दंड आकारणे,समाधानकारक उत्तर न दिल्यास करार रद्द व डिपॉझिट जप्ती, अपूर्ण कामे Risk Cost पद्धतीने पूर्ण करुन खर्च वसुली,दोषी ठेकेदारांना ब्लॅकलिस्ट किंवा डिबार करणे, संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर शिस्तभंग कारवाई करण्याची मागणी संदर्भात विरोधी नगरसेवकांनी यापूर्वी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्याधिकारी तैमूर मुलाणी यांना आज सर्व नगरसेवकांच्यावतीने स्मरणपत्र सादर करण्यात आले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेच्या ६ कामांना स्थायी समितीची मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरीवस्ती सुधार योजना सन २०२५-२६ योजनेअंतर्गत एकूण एक कोटी ८४ लाख ३८ हजार ९०३ रुपयांच्या विविध सहा कामांच्या विषयास महापालिका स्थायी समितीच्या सभेत शुक्रवारी एकमताने मान्यता देण्यात आली.

स्थायी समितीची सभा सभापती रंजिता चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या कौन्सिल हॉल येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात झाली. यावेळी नगरसचिव प्रवीण दंतकाळे व अन्य अधिकारी उपस्थित होते. सभेच्या अजेंड्यावर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरीवस्ती सुधार योजना सन २०२५-२६ योजनेअंतर्गत नितीन नगर येथील अंतर्गत रस्ते करणे, पाथरूट चौक ते स्टार हॉटेल ते कांबळे घर ते लिंबोळे घरा पर्यंत रस्ता करणे, भोसले घर ते चक्रपाणी म्हेत्रे घरापर्यंत रस्ता करणे, जांबमुनी चौक ते कुंभार गल्ली रस्ता व हनुमान मंदिर परिसरातील फुटपाथ कॉंक्रिटीकरण करून पेवर ब्लॉक बसविणे, उत्तर सदर बाझार येथे महावीर तालीम मातंग समाज येथे सचिन गोडलोलू घर ते सागर कोरे घरापर्यंत रस्ता करणे, सतनाम चौक ते दत्त मंदिर पर्यंत केबल बंच व रस्ता करणे असे एकूण एक कोटी ८४ लाख ३८ हजार रुपयांचे विविध सहा विषय प्रशासनाकडून मंजुरीसाठी ठेवण्यात आले होते. या कामांसाठी प्राप्त सर्वात कमी दराचे निविदाधारक सागर भोसले यांच्याकडून त्यांनी निविदेत दिलेल्या निविदा रक्कमेपेक्षा ०.१०० टक्के कमी दराने काम करुन घेण्यास, येणाऱ्या खर्चास, योग्य त्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन कार्यारंभ आदेश देण्यास समितीने एकमताने मान्यता दिली.

## महत्वाचे...



### सद्गुरु शिवाय जीवाचा उध्दार नाही : हभप ज्ञानेशबुवा धानोरकर

**अक्कलकोट, दि. १० एप्रिल-**

भगवंताला शरण गेला व संताचा सहवास लाभला संताचे नामस्मराण करणे भाग्य लागते.सदगुरूला शरण गेल्याशिवाय जीवाचा उध्दार होणार नाही. देवानी गीता एकट्याला अर्जुनाला सांगितली. उध्दार सर्व जीवाचा केला. हरिमुखे म्हण हरिमुखे म्हणा, पुण्याची गणना कोण करी.संत म्हणून भलत्याच माणसाला शरण गेल्यास जीवनाची इतिकर्तव्यता नष्ठ होते. संत म्हणून भलत्याच माणसाला शरण जाऊ नका. संताचे लक्षण जाणून घ्या, असे प्रतिपादन हभप ज्ञानेशबुवा धानोरकर पुणे यांनी केले. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथे समर्थाच्या १४८ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित धर्मसंकीर्तन महोत्सवात आठवे पुष्प गुंफताना हभप ज्ञानेषबुवा धानोरकर पुणे यांनी हरी कीर्तन सेवा स्वामी चरणी सादर केली. हभप धानोरकर यांचा परिचय ओंकार पाठक यांनी करुन दिला. याप्रसंगी वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान चेअरमन महेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे विश्वत महेश गोगी उज्वला सरदेशमुख, प्रथमेश इंगळे, प्रा.शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, श्रीशैल गंवडी, मनोज जाधव, ऋषी लोणारी, स्वामी लोणारी, काशीनाथ इंडे, बाळासाहेब कुलकर्णी, राजू भोसले, महादेव तेली, लक्ष्मण पाटील, प्रसाद सोनार, अशोक कडगंची , ओंकार पाठक, अक्षय सरदेशमुख, गिरिष पवार, संजय पवार, रमेश शिंदे, बाळासाहेब एकबोटे रमेश शिंदे, मनोज देगावकर अप्पा हंचाटे महादेव तेली सुनिल पवार उपस्थित होते.

### कोविडमध्ये लग्न; हौसमौज झाली नाही म्हणत विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

कोविडमध्ये लग्न झाल्याने मुलाची हौसमौज झाली नाही. मानपान झाला नाही, तसेच पती - अभिषेक याला मोबाईल घेण्यासाठी, कर्ज फेडण्यासाठी व मेडिकलचे रॅक बनवण्यासाठी पैशांची मागणी करत शारीरिक व मानसिक छळ केला. व विवाहितेला माहेरी हाकलून दिले. यात हकीकत अशी की, दि. २३ मार्च २०२१ ते मे २०२२ दरम्यान अभिषेक (पती), निर्मला (सासू), पंडित (सासरे) रा. इंदिरा नगर, सोलापूर यांनी मिळून ऋतिका अभिषेक माळगे, वय ३५, रा. ४५७, उत्तर सदर बाजार, लष्कर सतनाम चौक, सोलापूर हिला लग्न कोविडमध्ये झाल्याने मुलाची हौसमौज झाली नाही. लग्नात मानपान झाला नाही, तसेच पती - अभिषेक याला मोबाईल घेण्यासाठी पैसे मागून कर्ज फेडण्यासाठी माहेरून २ लाख रुपये, मेडिकलचे रॅक बनवण्यासाठी ४० हजार रुपये, मागणी करून शारीरिक व मानसिक छळ केला. सासरे पंडित यांनी तू आम्हाला पगार सांगत नाही, वारंवार माहेरी फोनवर बोलते, कामे नीट करत नाही असे बोलून मानसिक त्रास देऊन माहेरी हाकलून दिले. याबाबत दि. ९ एप्रिल रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात तिघां विरोधात गुन्हा दाखल झाला. आहे पुढील तपास राठोड करत आहेत.

# महात्मा फुले जयंतीनिमित्त ११२ जणांचे रक्तदान



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १० एप्रिल-**

पिसेवाडी (ता. माळशिरस) येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त क्रांतीसूर्य प्रतिष्ठान, पिसेवाडी यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरामध्ये तब्बल ११२ रक्तदात्यांनी रक्तदान करून शंभर बॉटल रक्तसंकलन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती व जि.प.सदस्य अर्जुनसिंह मोहिते-पाटील व रिपाई माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना अर्जुनसिंह मोहिते-पाटील म्हणाले की, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. एका रक्तदात्यामुळे एखाद्या गरजू रुग्णाला नवे जीवन मिळू शकते. महात्मा फुले यांनी समाजासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या जयंतीनिमित्त अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून आपण त्यांच्या विचारांना खरी मानवंदना देत आहोत. आणि हे प्रत्येक वर्षी आपल्या प्रतिष्ठान कडून केले जाते आहे हेच तरुणांनी पुढे येऊन रक्तदानासारख्या सेवाभावी कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच मिलिंद सरतापे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

शिबिराला शिवामृत दूध संघाचे संचालक सुरेश पिसे, संचालक भागवत पिसे, धानोरे माजी सरपंच जीवन जानकर, पिसेवाडीचे उपसरपंच भाऊसाहेब पिसे, क्रांतीसूर्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष व सरपंच आण्णासाहेब शेंडे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पिसे, खंडू मेहेत्रे, साहिल आतार, प्रकाश पवार, रामचंद्र पिस, गणेश पिसे, दीपक पिसे, अमोल राऊत, विशाल बोराटे, ज्ञानेश्वर बोराटे, गोरख शेंडे, अमोल पिसे, नवनाथ पिसे, मनोज पिसे उपस्थित होते.

शिबिर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शंकरराव मोहिते-पाटील ब्लड बँक, अकलूज येथील कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. आण्णासाहेब शेंडे यांनी आभार मानले.



# श्रीक्षेत्र मार्डीचे गतवैभव प्राप्त करण्यासाठी प्रयत्न गरजेचे

## शुभांगी बुवा; यमाई देवीच्या यात्रेनिमित्त पाणपोईचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

श्री यमाईदेवी, श्री नागनाथ, मार्कंडेय ऋषी यांच्या वास्तव्यामुळे श्रीक्षेत्र मार्डीला मोठा अध्यात्मिक वारसा आणि वैभव प्राप्त आहे. मात्र काळानुरुप हे वैभव लोप पावत असून, श्रीक्षेत्र मार्डीचे गत अध्यात्मिक वैभव पुन्हा प्राप्त करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन सोलापूर येथील पाखर संकुलच्या संस्थापिका व शुभराय महाराजांच्या विद्यमान वंशज शुभांगी बुवा यांनी केले.

श्री क्षेत्र मार्डी येथील खापरीच्या पाराजवळ यमाईदेवीच्या यात्रेनिमित्त येणा-या भाविकांसाठी सामाजिक कार्यकर्ते संजय खरटमल यांनी सुरु केलेल्या पाणपोईचे उद्घाटन बुवा यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. मार्डीचे उपसरपंच श्रीकांत मार्तंडे, भाजपाचे ज्येष्ठ नेते शिवाजी सोनार, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री विष्णू जगताप, हभप रामहरी शेंडगे महाराज, अच्युत महाराज, सुवर्णा झाडे,प्रशांतक काशीद, शशिकांत मार्तंडे, संजय खरटमल, शिवसेनेचे नेते संजय पौळ, मेजर लक्ष्मण राठोड, प्रभाकर नवगिरे, भगवान कदम, पोपट साठे,हनमंत बनसोडे, भिमा नारायणकर, राम ढगे यावेळी उपस्थित होते. पत्रकार दत्ता मोकाशी यांनी सूत्रसंचालन केले. दरवर्षी संजय खरटमल हे न चुकता यमाईदेवीच्या यात्रेनिमित्त पाणपोई सुरु करतात. त्यांच्या या उपक्रमाला २७ वर्षे पूर्ण झाले असून सलग २७ वर्षे न चुकता खरटमल यांनी हा उपक्रम सुरु ठेवला आहे.

# एसटी बस चालकाच्या मनमानीस कोण घालणार लगाम?

## एसटी. बस थांबत नसल्याने विद्यार्थ्यांसह, नागरिकातून संताप

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १० एप्रिल-**

खुडूस (ता. माळशिरस) येथे एस.टी. बस थांबा असताना देखील काही एसटी बसेस ओव्हर ब्रिज वरून जात असल्यामुळे विद्यार्थांसह नागरिकांची गैरसोय होत असून नागरिकांनी पुलावर बस थांबविण्याचा प्रयत्न केला तरी नागरिकांना न जुमानता बस चालक बस थांबवता बस पुढे घेऊन जात असल्याने विद्यार्थ्यासह नाग्रीकातून संताप व्यक्त होत आहे.अश्या बस चालकावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

खुडूस गावाची लोकसंख्या दहा हजाराच्या आसपास असून अनेक वाडया वस्त्यांशी निगडित आहे. त्यामुळे बस थांब्यावर प्रवाशांची मोठी गर्दी असते. शिवाय शालेय विदयार्थांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. खुडूस येथून नातेपुते, सदाशिवनगर, माळशिरस येथे अनेक विद्यार्थी शाळा, कॉलेजसाठी जातात. परंतु सकाळी वेळेवर येणाऱ्या गाडया सर्विस रोड वरती असणाऱ्या बस थांब्यावरून जात नसल्याने विदयार्थांच्या शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच नागरिकांना हि नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या मार्गावरून जाणाऱ्या बसेस लांब पल्ल्याच्या आहेत त्यांना वाहतूक नियंत्रकांनी सांगूनही काही बसेस ओव्हर ब्रिज वरूनच जातात. त्यामुळे शाळा, कॉलेजला वेळेत जाणे अवघड झाले आहे. दि. १० रोजी सकाळी पंढरपूर विठ्ठलवाडी बस ओव्हर ब्रिज वरून जात असल्याची पाहून नागरिकांनी पुलावर जाऊन थांबविण्याची विनंती केली. परंतु चालकाने बस न थांबवता नेली. अश्या लांबपल्ल्याच्या बस थांबत नाहीत. सर्वच विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु आहेत. या बसेस या बस थांब्यावर न येता ओव्हर ब्रिज वरून गेल्यास विद्यार्थ्यांचे परीक्षाला वेळेत न पोहचणे मुश्कील होत आहे.



याबाबत माळशिरस वाहतूक नियंत्रक यांच्याशी संपर्क साधला असता आम्ही चालकांना सूचना देत आहेफ तसेच त्यांच्या लॉग शीट वरही खुडूस बस थांब्यावर बस थांबवावेत असा शिक्का मारून देत आहे.

**- पांडुरंग कटके, माळशिरस वाहतूक नियंत्रक .**

परीक्षा सुरु झाली असून बसेस न थांबल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. याबाबत बस न बस थांब्यावरून न नेणाऱ्या बस चालकांवर कारवाई करावी


**- कल्याण मोटे, नागरिक खुडूस**

एसटी चे ब्रीदवाक्य 'प्रवाशांच्या सेवेसाठी' असे असले तरी याचा प्रत्यय मात्र खुडूस नागरिकांना येताना दिसून येत नाही. बसचालक आपली मनमानी करताना दिसून येत आहेत. आम्ही खुडूस ग्रामस्थांनी पुणे पंढरपूर मार्गावरील खाजगी वाहतूक अनेक वर्षापासून बंद केली त्यामुळे आम्हाला बसशिवाय पर्याय नाही परंतु बस थांबत नसल्याने गैरसोय होत आहे.

**- रमेश बनकर ,खुडूस**

# सहा महिन्यांत समान नागरी कायदा

## बंगाल निवडणुकीसाठी भाजपाचा जाहीरनामा प्रसिद्ध




पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी जाहीरनामा प्रसिद्ध करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह. यावेळी उपस्थित भाजपा नेते शुभेंदु अधिकारी

### शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे २०० दिवसांत हटवणार

**गर्भवती महिलांना २१,००० रुपये आणि सहा पोषण किट देण्यात येतील. भाजपा राज्य परिवहन बसमधून सर्व महिलांना मोफत प्रवास सुनिश्चित करेल. कोलकाता मेट्रोचे १००% विद्युतीकरण केले जाईल. एकाच वर्षात ६१ रेल्वे प्रकल्पांसाठी जमीन वाटप करून, हे रेल्वे प्रकल्प विकासाचा केंद्रबिंदू बनतील याची आम्ही खात्री करू. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे २०० दिवसांत हटवली जातील. सिंडिकेट्सचे निर्मूलन करून, उद्योग उभारणाऱ्यांना पहिल्या १०० दिवसांत आम्ही मदत करू. राज्यात ४ नवीन औद्योगिक वसाहती स्थापन केल्या जातील. हल्दिया बंदराचा विकास केला जाईल. बंगाल सरकार एमएसएमईसाठी महामंडळ स्थापन करून मदत करेल, असे आश्वासनही त्यांनी दिले.**

**कोलकाता, १० एप्रिल**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला सत्तेतून बेदखल करण्यासाठी भाजपाने कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर भाजपाने शुक्रवारी आपला जाहीरनामा अर्थात विश्वासपत्र प्रसिद्ध केले. यात महिलांना व बेरोजगार तरुणांना दरमहा ३००० रुपये आर्थिक मदत, पहिल्या सहा महिन्यांत राज्यात समान नागरी संहिता (यूसीसी) लागू करणे आणि सरकारी कर्मचाऱ्यांसाठी ४५ दिवसांत सातवा वेतन आयोग लागू करण्याची घोषणा करण्यात आली आहे.

विश्वासपत्र प्रसिद्ध करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले, गत १५ वर्षे बंगालच्या लोकांसाठी दुःस्वप्नासारखी होती. ममता घुसखोरांच्या माध्यमातून तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्या आहेत. आम्ही घुसखोरांना शोधून काढू, त्यांना संपवू आणि हद्दपार करू. बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत मतदान होणार आहे. निकाल ४ मे रोजी जाहीर होईल.

शहा पुढे म्हणाले, आम्ही महिलांना नोकरीत ३३ टक्के आरक्षण देऊ. यासाठी मोदी सरकार प्रयत्न करत आहे. बंगाल सरकार कुंपणासाठी जमीन देत नाही. आम्ही नद्या आणि ओढ्यांवर गस्त घालण्यासाठी शास्त्रीय व्यवस्था करू. आम्ही सर्व सरकारी पदे कायम करण्यासाठी काम करू. भूतकाळात झालेले कोट्यवधी रुपयांचे घोटाळे पुन्हा होणार नाहीत, हे आम्ही सुनिश्चित करू. तरुणांना पारदर्शकतेने नोकऱ्या मिळतील याची खात्री करण्यासाठी आम्ही एक योजना विकसित करू, असे आश्वासनही त्यांनी दिले.

**७५ लाख करोडपती दीदी निर्माण करण्याचे लक्ष्य**

तृणमूल काँग्रेसवर निशाणा साधत शहा पुढे म्हणाले, ममता बॅनर्जी यांनी उद्ध्वस्त केलेल्या भारत सरकारच्या योजनांना पुनरुज्जीवित करण्यासाठी आम्ही काम करणार आहोत. कोलकाताच्या विकासासाठी एक योजना सादर करण्यात येईल. जेणेकरून ते देशाची सांस्कृतिक आणि औद्योगिक राजधानी बनू शकेल. पोलिस दलासह सर्व सरकारी नोकऱ्यांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण दिले जाईल. ७५ लाख करोडपती दीदी निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. प्रत्येक विभागात महिला पोलिस ठाणे स्थापन केले जातील. आम्ही असे बंगाल घडवू, जिथे कोणत्याही मुख्यमंत्र्याला एखादी महिला रात्री इतक्या उशिरा बाहेर का होती? असा प्रश्न विचारण्याची गरज भासणार नाही. *(वृत्तसंस्था)*

# अमेरिकेचे १२ तळ उद्ध्वस्त

## लष्करी पायाभूत सुविधांचे नुकसान, आखाती देशांची सुरक्षा धोक्यात




**दुबई, १० एप्रिल**

अमेरिका-इस्रायलच्या संयुक्त हल्ल्याला इराणने दिलेल्या प्रत्युत्तरात आखाती देशातील १२ लष्करी आणि हवाई तळ उद्ध्वस्त झाल्याची माहिती समोर आली. ४० दिवसांच्या युद्धात आखातातील अमेरिकेच्या लष्करी पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे, लष्करी तळाच्या पुनर्बांधणीसाठी वर्षभराचा काळ आणि कोट्यवधी डॉलर्स अमेरिकेला खर्च करावे लागणार असल्याची माहिती न्यू यॉर्क टाईम्सच्या अहवालात प्रसिद्ध करण्यात आली.

अमेरिकेची लष्करी तळ आता सुरक्षेचा स्रोत न राहता एक धोका बनले आहेत. या घटनेने अमेरिकेची मध्यपूर्वेतील रणनीती आणि आखाती देशांची सुरक्षा पूर्णपणे बदलली आहे. अमेरिकेवर अवलंबून असलेल्या आखाती देशांपुढे सुरक्षेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. एकेकाळी या भागातील लष्करी तळ हे अमेरिकेच्या सामर्थ्याचे आणि प्रभावाचे प्रतीक मानले जात होते. पण आता हेच तळ अमेरिकेची सर्वात मोठी कमजोरी ठरत आहेत. इराणच्या प्रत्युत्तरात्मक हल्ल्यांमुळे सौदी अरब, संयुक्त अरब अमिरात, कतार आणि बहरीनसारख्या देशांमधील लष्करी पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाल्याने अमेरिकेची कमकुवत बाजू जगासमोर आली. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अद्याप नुकसानीची संपूर्ण माहिती जाहीर केलेली नाही. न्यू यॉर्क टाईम्समध्ये प्रकाशित झालेल्या वृत्तात अमेरिकन लष्कराच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीचा उल्लेख आहे. त्यात म्हटले की, आखाती देश आतापर्यंत अमेरिकेच्या सुरक्षा सामर्थ्यामुळे चिंतामुक्त होते. मात्र इराणने एका महिन्यातच लष्करी तळांना निरुपयोगी केले. *(वृत्तसंस्था)*

### खरी परिस्थिती लपवण्याचा प्रयत्न

**बहरीन, सौदी अरब, संयुक्त अरब अमिराती, कुवेत आणि कतार यांसारख्या देशांमध्ये, जिथे हे तळ आहेत, तिथे प्रवेशावर कठोर निर्बंध घालण्यात आले आहेत. या देशांनी त्यांच्या हवाई हद्दीतील क्षेपणास्त्रांचे फोटो आणि व्हिडीओ काढण्यावर बंदी घातली आहे. यामुळे या तळांची खरी परिस्थिती लपवण्याचा प्रयत्न केला जात आहे. बहरीनमधील अमेरिकेच्या नौदलाच्या पाचव्या फ्लीटचे मुख्यालय पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. एकेकाळी अमेरिकेच्या सागरी सामर्थ्याचे केंद्र मानले जाणारे हे ठिकाण आता धोक्यात आले आहे.**

### सुरक्षा हमीवरील विश्वासाला तडा

**पाचवी फ्लीट पूर्वीसारखी पुन्हा स्थापित करू शकू असे अमेरिकेला वाटत नाही. ती आता खूपच असुरक्षित झाली आहे. १९९० च्या आखाती युद्धानंतर अमेरिकन लष्करी जाळे या देशात अधिक मजबूत झाले. या प्रदेशात अंदाजे १९ मोठे लष्करी तळ उभारण्यात आले. यामुळे आखाती देशांना सुरक्षा मिळाली आणि त्या बदल्यात अमेरिकेला तेल आणि मध्यपूर्वेवरील आपली सामरिक पकड मजबूत करण्यास मदत झाली. मात्र इराण युद्धातील नुकसानीमुळे आखाती देशांचा अमेरिकेच्या सुरक्षा हमीवरील विश्वास कमी झाला आहे.**

# न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांचा राजीनामा

### बंगल्यात सापडले होते नोटांचे बंडल्स



**प्रयागराज, १० एप्रिल**

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या दिल्लीतील सरकारी बंगल्याला१४ मार्च २०२५ रोजी आग लागली होती. तेथे अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांना जळलेल्या ५०० रुपयांच्या नोटांनी भरलेल्या गोण्या मिळाल्या होत्या. या घटनेनंतर त्यांची दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आली होती. अखेर न्यायमूर्ती वर्मा यांनी राष्ट्रपतींकडे आपला राजीनामा सादर केला आहे.

विशेष म्हणजे, रोख रकमेच्या प्रकरणात नाव आल्यानंतर त्यांच्याविरुद्ध लोकसभेत महाभियोग प्रस्ताव आणण्यात आला होता. न्यायमूर्ती वर्मा यांनी त्यांच्याविरुद्ध आणलेल्या महाभियोग प्रस्तावाला आव्हान दिले होते. याचिकेत म्हटले होते की, दोन्ही सभागृहात महाभियोग प्रस्ताव आणला गेला होता, परंतु राज्यसभेने त्याला मंजुरी दिली नाही. राज्यसभेत प्रस्ताव नामंजूर झाला तरीही लोकसभेत समिती स्थापन करण्यात आली. संसदेत इतके खासदार आणि कायदेशीर तज्ज्ञ उपस्थित होते, परंतु कोणीही याकडे लक्ष दिले नाही, संसदेतील कायदेशीर तज्ज्ञांनी हे कसे होऊ दिले?, अशी विचारणा न्यायमूर्ती दत्ता यांनी केली होती.

याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने ८ जानेवारीला न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या याचिकेवरील निर्णय राखून ठेवला. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने १६ डिसेंबर २०२५ रोजी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना नोटीस बजावली होती. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि ए.जे. मसीह यांच्या खंडपीठाने लोकसभा अध्यक्ष कार्यालय आणि दोन्ही सभागृहांच्या महासचिवांकडून उत्तर मागवले होते.

७ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने अंतर्गत समितीचा अहवाल आणि खन्ना यांच्या शिफारशींविरुद्ध दाखल केलेली याचिका फेटाळली होती. *(वृत्तसंस्था)*

### १९ एप्रिलला यमुनोत्रीचे कपाट उघडणार

**नवी दिल्ली, १० एप्रिल**

उत्तराखंडमध्ये असलेल्या चार प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या यात्रेला येत्या १९ एप्रिलपासून सुरुवात होणार आहे. यमुनोत्री आणि गंगोत्री मंदिरांचे कपाट उघडणार आहे. याच यात्रेच्या पुढील टप्प्यात केदारनाथ मंदिराचे कपाट २२ एपिल रोजी उघडणार आहे.

आतापर्यंत सुमारे १४ लाख यात्रेकरूंनी यात्रेसाठी नोंदणी केल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान हिंदूंसाठी चारधाम यात्रा ही अत्यंत महत्त्वाची धार्मिक यात्रा मानली जाते. *(वृत्तसंस्था)*

# नितीश कुमारांनी घेतली राज्यसभेसाठी शपथ



**नवी दिल्ली, १० एप्रिल**

माजी मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी दिल्लीत राज्यसभा सदस्य म्हणून पदाची शपथ घेत नव्या राजकीय प्रवासाची सुरुवात केली. त्यांच्या या निर्णयामुळे बिहारमध्ये नेतृत्वबदल निश्चित मानला जात असून नव्या सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे.

दिल्लीत झालेल्या या शपथविधीनंतर नितीश कुमार लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्याची शक्यता आहे. त्यांच्या सोबत लल्लन सिंग आणि संजय झा हेही उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे. दरम्यान, बिहारमध्ये नव्या मुख्यमंत्र्याच्या निवडीसाठी सत्ताधारी पक्षात बैठका सुरू असून लवकरच नव्या नेतृत्वाची घोषणा होण्याची शक्यता आहे.

माहितीनुसार, नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी काही दिवसांत होऊ शकतो.मागील काही दिवसांत नितीश कुमार यांनी विधान परिषदेच्या सदस्यपदाचा राजीनामा दिल्यानंतरच बिहारमध्ये सत्तांतराची चर्चा रंगली होती. दिल्लीला आल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना बिहारमध्ये दीर्घकाळ काम केल्यानंतर आता राजधानीतूनही काम करण्याची इच्छा व्यक्त केली.

# गुन्हेगारांना मोबदला द्यावाच लागेल

## इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांचा इशारा





**तेहरान, १० एप्रिल**

युद्ध गुन्हेगारांना मोकळे सोडले जाणार नाही. त्यांना प्रत्येक जखमी नागरिकांसाठी नुकसान भरपाई द्यावी लागेल. युद्धात मृत्यू झालेले आणि जखमींसाठी भरपाई द्यावी लागेल. होर्मुझच्या सामुद्रधुनीचे व्यवस्थापन निश्चितपणे एका नवीन स्तरावर नेले जाईल असा इशारा इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी शांतता चर्चेपूर्वी दिला आहे.

मध्यपूर्वेत युद्धविराम लागू करण्यासाठी लेबनॉनमधील इस्रायली हल्ले तात्काळ थांबवणे ही एक महत्त्वाची अट आहे. इराणच्या १०-कलमी योजनेअंतर्गत प्रस्तावित युद्धविराम हा इराणी नेतृत्व आणि लोकांच्या त्यागाचा परिणाम आहे. इराणी नागरिकांच्या मृत्यूची आणि जखमेची किंमत युद्ध गुन्हेगारांकडून वसूल केली जाईल, असे पेझेश्कियान यांनी संदेशात म्हटले आहे. युद्धविरामासाठी तयार होणे याचा अर्थ आम्ही शस्त्र ठेवली असे होत नाही, अजूनही आम्ही लढण्यासाठी सज्ज आहे. शांतता चर्चा निष्फळ झाल्यास आम्ही हल्ले पुन्हा सुरू करू, हे शत्रूने लक्षात ठेवावे. इराणमध्ये झालेल्या नुकसानीची भरपाई घेतल्याशिवाय राहणार नाही. असा इशारा त्यांनी दिला. *(वृत्तसंस्था)*

### युद्धात युक्रेनची अमेरिकेला मदत

**युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी एक्सवरील पोस्टमध्ये दावा केला की, त्यांच्या देशाच्या लष्करी तुकड्यांनी इराण युद्धादरम्यान पश्चिम आशियातील अनेक देशांमध्ये इराणी बनावटीचे शाहेद ड्रोन पाडले.**

# आता पृथ्वी प्रकाश प्रदूषणाच्या जाळ्यात



**वाशिंग्टन, १० एप्रिल**


आतापर्यंत पृथ्वीवर जल, वायू आणि पाणी प्रदूषण होते, मात्र एका अलीकडील अभ्यासातून २०१४ ते २०२२ या कालावधीत जगभरात प्रकाश प्रदूषणामध्ये १६ टक्क्यांनी वाढ झाली असल्याचे समोर आले आहे.

हे बदल सर्वत्र एकसारखे नाहीत. काही प्रदेशांमध्ये प्रकाशाची तीव्रता लक्षणीयरीत्या वाढली आहे, तर इतर काही प्रदेशांनी जाणीवपूर्वक आपला प्रकाश मंद केला आहे. 'नेचर' या नियतकालिकेत प्रकाशित झालेला या अभ्यासज्याचे नेतृत्व युनिव्हर्सिटी ऑफ कनेक्टिकटच्या नैसर्गिक संसाधने आणि पर्यावरण विभागातील तियान ली आणि झे झू यांनी केले होते. रात्रीच्या वेळी वापरल्या जाणाऱ्या कृत्रिम प्रकाशातील बदल आणि रात्रीच्या आकाशाच्या तेजात झालेली वाढ यांवर केंद्रित होता. या संशोधकांनी पृथ्वीवरील मानवी वस्ती असलेल्या भूभागांच्या ११ लाख ६० हजार दैनंदिन उपग्रह प्रतिमांचे विश्लेषण केले. जेव्हा तुम्ही कृत्रिम प्रकाशाशी संबंधित बातम्यांचे लेख वाचत असत, तेव्हा अनेकदा असे म्हटले जायचे की, सर्व काही अधिकाधिक प्रकाशमान होत आहे. ठिकाणे अधिक उजळ होत आहेत आणि, तुम्हाला ठाऊकच आहे, एकंदरीत पाहता संपूर्ण जगासाठी आणि संपूर्ण खंडांसाठी हे विधान मुळात खरेच आहे, असे रुहर-युनिव्हर्सिटॅट बोखुम येथील सह-लेखक प्राध्यापक ख्रिस्तोफर कायबा यांनी सांगितले.

आतापर्यंत जी गोष्ट राहून गेली होती, ती म्हणजे अधिक सूक्ष्म स्तरावर पाहणे. या लहान स्तरांवर नेमके काय घडत आहे? शहरीकरण, पायाभूत सुविधांचा विकास आणि विजेच्या सुधारित उपलब्धतेमुळे उप-सहारा आफ्रिका आणि आग्नेय आशिया प्रदेशांमध्ये रात्रीच्या प्रकाशात झपाट्याने वाढ होत असल्याचे त्यांना आढळले. *(वृत्तसंस्था)*

### प्रकाशमानतेत झाली वाढ

**प्रकाशमानता वाढल्यामुळे २०१४ च्या जागतिक आधाररेषेच्या तुलनेत प्रकाशमानतेत ३४ टक्क्यांनी वाढली, तर प्रकाश मंदावल्यामुळे ही वाढ १८ टक्क्यांनी कमी झाली. विशेष म्हणजे, मागील दशकात प्रकाशमानता वाढणे आणि प्रकाश मंदावणे या दोन्हीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे, असे संशोधकांनी सांगितले.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# अविरोध निवडणुकीचा अन्वयार्थ

निवडणूक हा लोकशाही व्यवस्थेचा अविभाज्य भाग मानला जातो. निवडणूक, मग ती ग्रामपंचायतीची असो की विधानसभा आणि लोकसभेची, ती लढवताना सर्वांनाच स्फुरण चढत असते. निवडणूक लढवण्याची नशा असते. ही नशा चढली की सर्वस्व पणाला लावून निवडणूक लढली जाते. अनेकवेळा निवडणुकीत आपला पराभव स्पष्टपणे समोर दिसत असला तरीही निवडणूक लढवण्याची जिद्द काही सुटत नाही. प्रदीर्घ काळ राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुका अविरोध करण्याचा पायंडा होता, तो पाळलाही जात होता. नंतर मात्र देशातील या सर्वोच्च पदांसाठी निवडणूक होऊ लागली. राज्यसभा आणि विधान परिषदेच्या निवडणुकाही सामान्यपणे अविरोध होत असतात. काही वेळेला यासाठी निवडणुकाही होतात. निवडणूक होण्यात काहीही गैर आणि लोकशाहीविरोधी नाही. मात्र राज्यसभा वा विधान परिषदेसाठी निवडणूक झाली, तर त्यात घोडेबाजार मोठ्या प्रमाणात होत असतो. अशावेळी मतदार असलेल्या आमदारांची चांदी होत असते. त्यांना सोन्याचे दिवस येत असतात. नुकतीच राज्यसभेच्या ३७ जागांसाठी निवडणूक झाली. यातील २६ उमेदवार अविरोध निवडून आले, फक्त ११ जागांसाठी मतदान घ्यावे लागले.

हे सगळे रामायण आठवण्याचे कारण म्हणजे महाराष्ट्रात विधानसभेच्या दोन जागांसाठी होत असलेल्या निवडणुकीवरून निर्माण झालेले राजकीय वादळ. राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. या घटनेने महाराष्ट्रातील तसेच राष्ट्रवादी काँग्रेसमधील राजकीय समीकरणेच बदलली. अजितदादांच्या निधनानंतर चौथ्या दिवशीच राज्यसभेच्या सदस्य असलेल्या सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. दादांच्या अपघाती मृत्यूमुळे बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेण्याची वेळ आली. असाच प्रकार राहुरी विधानसभा मतदारसंघातही भाजपा आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे उद्भवला. या मतदारसंघातही पोटनिवडणूक जाहीर करावी लागली. नेत्याच्या निधनामुळे एखाद्या मतदारसंघात पोटनिवडणूक घेण्याची वेळ आली तर त्या मतदारसंघातील पोटनिवडणूक अविरोध होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याची रीत आहे. तिचे आतापर्यंत बऱ्यापैकी पालनही झाले. अशा पोटनिवडणुकीत निधन झालेल्या नेत्याच्या पत्नीला, मुलाला, मुलीला उमेदवारी देत अविरोध निवडून आणण्याचीही परंपरा आहे. या पृष्ठभूमीवर बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक अविरोध होईल, अशी चर्चा असताना काँग्रेसने त्या मतदारसंघात आपला उमेदवार उभा करण्याचा निर्णय घेतला. त्याने आपला उमेदवारी अर्जही दाखल केला. महाविकास आघाडीत तशी बारामतीची जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाची आहे. तो गट आपला उमेदवार उभा करणार असेल, तर आम्ही आपला उमेदवार उभा करणार नाही, असे काँग्रेसने म्हटले. शरद पवार गट उमेदवार उभा करणार नाही, हे स्पष्ट होते. त्यामुळे काँग्रेसने उमेदवार उतरवला. विशेष म्हणजे काँग्रेसने बारामतीची पोटनिवडणूक लढवण्याच्या निर्णयाचे समर्थन शरद पवार यांनी केले. निवडणूक लढण्याचे स्वातंत्र्य लोकशाहीत सर्व राजकीय पक्षांना आहे. निवडणूक अविरोध होण्याची काही गरज नाही, या शब्दांत शरद पवार यांनी त्या निर्णयाचे समर्थन केले होते. मात्र राजकारणात कोणत्या क्षणी काय होईल आणि कोण कशी आणि कधी कोलांटउडी मारेल हे सांगता येत नाही. राजकारणी आज एक बोलतात, उद्या आपली राजकीय सोय पाहून भूमिकाही बदलतात, याचा अनुभव अनेकवेळा आला आहे. त्यामुळे काँग्रेसने ही निवडणूक लढवण्याचे समर्थन करणाऱ्या शरद पवार यांनी काँग्रेसने आपला उमेदवार मागे घ्यावा म्हणून काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांना साकडे घातले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना दूरध्वनी करून विनंती केली. त्याचा परिणाम दिसून आला. काँग्रेस उमेदवाराने निवडणूक रिंगणातून माघार घेतली. मात्र यातून बारामतीची निवडणूक अविरोध होण्याचा मार्ग प्रशस्त झाला नाही. काँग्रेस उमेदवाराने माघार घेतली असली तरी अन्य अनेक अपक्ष उमेदवार रिंगणात कायम आहेत. त्यामुळे या मतदारसंघात निवडणूक होणारच आहे. म्हणजे ज्यासाठी हा सारा अट्टहास केला, ते साध्य झालेच नाही. निवडणुकीतील चुरस कमी झाली तरी बारामतीत आता मतदान घ्यावेच लागणार आहे. असाच प्रकार राहुरी मतदारसंघातही झाला. या दोन्ही मतदारसंघांतील पोटनिवडणुका अविरोधच करायच्या होत्या तर राजकीय पक्षांच्या उमेदवारांसह अपक्ष उमेदवारांनीही माघार घेण्यासाठी एकत्रित प्रयत्न करायला हवे होते. पण कोणत्याही कारणाने का होईना, या दोन्ही मतदारसंघांत तसा प्रयत्न झाला नाही. या दोन्ही मतदारसंघांत निवडणूक आयोगाला निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया राबवावीच लागणार आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची अविरोध निवडून येण्याची संधी हुकली आहे. अनेकवेळा अविरोध निवडून येण्यासाठी काही धनदांडगे आणि बाहुबली उमेदवार अन्य उमेदवारांना धमकावून माघार घेण्यासाठी भाग पाडतात. कधी पैशांचे आमिष दाखवले जाते, तर कधी धमक्या दिल्या जातात. १९५१ च्या पहिल्या लोकसभा निवडणुकीपासून २०२४ च्या १८ व्या लोकसभा निवडणुकीपर्यंत ३० खासदार देशात अविरोध निवडून आले होते. राज्य विधानसभांत तर अविरोध निवडून येणाऱ्या आमदारांची संख्या फार जास्त आहे. २०१२ मध्ये उत्तरप्रदेशातील कन्नौज लोकसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत समाजवादी पक्षाच्या डिम्पल यादव अविरोध विजयी झाल्या होत्या. त्यापूर्वी, १९८० मध्ये श्रीनगर लोकसभा मतदारसंघात नॅशनल कॉन्फरन्सचे डॉ. फारुक अब्दुल्ला विजयी झाले होते. १९८९ मध्ये याच मतदारसंघात नॅशनल कॉन्फरन्सचेच मोहम्मद शफी भट अविरोध निवडून आले होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत गुजरातच्या सुरत मतदारसंघातही भाजपाचे महेशकुमार दलाल अविरोध विजयी झाले होते. मध्यप्रदेशच्या इंदूर लोकसभा मतदारसंघातही असा प्रयत्न झाला होता. या मतदारसंघात काँग्रेस उमेदवाराने अचानक माघार घेतली. पण अन्य काही उमेदवार रिंगणात कायम राहिल्यामुळे येथील निवडणूक अविरोध होऊ शकली नाही.

विधि सेंटर फॉर लीगल पॉलिसी या थिंक टँकने १९५१ च्या लोकप्रतिनिधी कायद्यातील कलम ५३(२) च्या संवैधानिकतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. अविरोध निवडणुकीचे काही फायदे असले तरी मतदान करण्याच्या घटनादत्त अधिकारापासून यामुळे मतदारांना वंचित राहावे लागते. निवडणूक रिंगणातून माघार घेण्याच्या एका व्यक्तीच्या निर्णयाचा फटका त्या मतदारसंघातील लाखो मतदारांना बसत असतो, हा यातील आक्षेपांचा मुख्य मुद्दा. न्यायालयाने यावर केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाला नोटीस बजावली होती. आयोगाने अविरोध निवडीच्या पद्धतीचे समर्थन केले होते. सर्वोच्च न्यायालयाने या मुद्यावर गांभीर्याने विचार करण्याची सूचना सरकारला केली होती. आज हा मुद्दा फारसा गंभीर नसला तरी तो भविष्यात गंभीर होऊ शकतो, असे न्यायालयाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने या मुद्यावर एक गंभीर प्रश्नही उपस्थित केला आहे. बहुमत हा लोकशाहीचा आधार आहे, अशा स्थितीत एखाद्याला 'बाय-डिफॉल्ट' संसदेत प्रवेश करण्याची परवानगी कधी देता येईल, अशी विचारणा न्यायालयाने केली आहे, ती चुकीची कशी म्हणता येईल? आपल्या देशात नसली तरी काही देशांत संसदेचा अध्यक्ष वा सभापतीची निवड अविरोध केली जाते. कारण अध्यक्ष वा सभापती हा कोणत्याच पक्षाचा नसतो. त्याने कोणत्याही राजकीय पक्षातर्फे निवडणूक लढणे योग्य नाही. त्यामुळे त्याला अविरोध निवडून दिले पाहिजे, ही यामागची भूमिका आहे. ती देखील चुकीची ठरविता येत नाही. भारतातही यादृष्टीने विचार करायला हरकत नाही. अविरोध निवड ही सरसकट योग्य वा अयोग्य न ठरवता, ती कोणत्या परिस्थितीत आणि कोणत्या पृष्ठभूमीवर होते आहे, याचे तारतम्य बाळगून आणि तटस्थ विचार करून धोरणात्मक निर्णय घ्यायला हवा. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे लोकशाहीतील मतदारांचा मतदानाचा घटनादत्त अधिकारही प्रभावित होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे.

## प्रासंगिक

**नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

# महात्मा जोतिराव फुले भारताला प्रकाश दाखवणारा मार्ग

आज, ११ एप्रिल, हा आपल्या सर्वांसाठी अत्यंत विशेष दिवस आहे. भारताच्या अनेक महान समाजसुधारकांपैकी एक आणि पिढ्यान्‌पिढ्यांचे दीपस्तंभ महात्मा जोतिराव फुले यांची आज जयंती आहे. यावर्षी या जयंतीदिनाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे, कारण आजपासून त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या उत्सवाचा प्रारंभ होत आहे.

महात्मा फुले हे एक महान समाजसुधारक होते. त्याबरोबरच, त्यांचे जीवन नैतिक धैर्य, निरंतर जिज्ञासा आणि सामाजिक हितासाठी अविचल वचनबद्धतेचे प्रतीक होते. महात्मा फुले यांनी उभारलेल्या संस्था आणि त्यांनी नेतृत्व केलेल्या चळवळींसाठी त्यांचे स्मरण केले जाते. त्याच वेळी, आपल्या सांस्कृतिक प्रवासातील त्यांचे योगदान आजही देशभरातील कोट्यवधी लोकांना मिळणाऱ्या शक्तीमध्ये सामावलेले आहे, जे त्यांनी जागवलेल्या आशेमध्ये, निर्माण केलेल्या आत्मविश्वासात आणि त्यांच्या विचारांमुळे आहे.

१८२७ मध्ये महाराष्ट्र या महान राज्यात जन्मलेल्या महात्मा फुले यांची अत्यंत सामान्य परिस्थितीतून सुरुवातीची वाटचाल सुरू झाली. परंतु, सुरुवातीच्या काळात आलेल्या या अडचणी त्यांचे शिक्षण, धैर्य किंवा समाजाप्रति असलेल्या बांधिलकीच्या आड कधीही आल्या नाहीत. आव्हाने कितीही असली तरी, त्याला तोंड देण्यासाठी माणसाने कष्ट केले पाहिजेत, ज्ञान मिळवले पाहिजे आणि काहीही न करता बसण्याऐवजी त्या आव्हानांचे निवारण केले पाहिजे हे त्यांचे वैशिष्ट्य आयुष्यभर टिकून राहिले. शालेय जीवनापासूनच तरुण जोतिराव अत्यंत जिज्ञासू होते आणि त्यांच्यात वाचनाची प्रचंड आवड निर्माण झाली होती. अनेकदा ते त्यांच्या वयातील मुलांकडून अपेक्षित असलेल्या पुस्तकांपेक्षा कितीतरी पटीने अधिक पुस्तकांचे वाचन करत असत. अनेक वर्षांनंतर याविषयी बोलताना ते म्हणाले होते, ''आपण जितके जास्त प्रश्न निर्माण करू, तितके ज्ञान त्यातून बाहेर येईल.'' त्यांच्या बालपणापासून त्यांना लाभलेली चौकस वृत्ती त्यांच्या वाटचालीत सदैव स्थिर राहिली.

त्यांच्या संपूर्ण जीवनकाळात, महात्मा फुले यांच्या आयुष्याचे ध्येय हे शिकणे आणि शिक्षण देणे हेच बनले होते. शिक्षण आणि ज्ञान, ही कोणा एकाची मक्तेदारी असू शकत नाही, ती एक शक्ती आहे, जी सगळ्यांपर्यंत पोहोचलीच पाहिजे, याची अत्यंत दुर्मिळ अशी स्पष्टता त्यांना आली होती. जेव्हा शिक्षणाचा आनंद अनेकांना नाकारला जात होता, अशा काळात, त्यांनी मुलींसाठी आणि ज्यांना औपचारिक शिक्षणापासून वंचित ठेवले गेले होते, अशा सर्वांसाठी पहिल्यांदा त्यांनी शाळा सुरू केल्या. ते म्हणत असत- ''मुलांमध्ये आईच्या मार्फत होणारी कोणतीही सुधारणा, अत्यंत महत्त्वाची असते आणि म्हणूनच, जर शाळा सुरू करायच्या असतील, तर त्या मुलींसाठी काढल्या पाहिजेत.'' त्यांनी अशा एका समाजाच्या निर्मितीसाठी काम केले, जिथे शाळा या न्याय आणि समता प्रस्थापित करण्याचे माध्यम बनल्या.

शिक्षणाविषयीचे त्यांचे विचार, त्यांची दूरदृष्टी, आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायक आहे. आम्ही देशातल्या युवकांसाठी, संशोधन आणि नवोन्मेष, हा पाया रचण्याचा प्रयत्न गेल्या दशकभरात केला आहे. देशात एक असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, जिथे युवकांना, प्रश्न विचारणे, आपल्या शंका-कुशंका सोडवण्यासाठी नवनवी क्षितिजे शोधणे आणि नवोन्मेष हे खुलेपणाने करता येईल. ज्ञान, कौशल्य आणि संधी यात गुंतवणूक करून, भारत युवाशक्तीला समस्या सोडवणारे आणि राष्ट्रीय प्रगतीचे वाहक होण्यासाठी सक्षम बनवत आहे.

महात्मा फुले यांचे ज्ञान आणि शहाणीव यातून, त्यांची, कृषी, आरोग्य आणि ग्रामविकासाविषयीची समज विकसित झाली होती. आपले शेतकरी आणि कामगार यांच्यावर होणारा अन्याय, आपल्या समाजाला दुर्बळ करतो आहे, असे ते नेहमी म्हणत असत. गावात असो किंवा मग शेतात, या घटकांना सामाजिक विषमतेचे चटके कसे सहन करावे, लागत आहेत, ते त्यांनी पाहिले होते. आणि म्हणूनच, त्यांनी, गरीब, वंचित आणि दुर्बळ घटकांना त्यांचा आत्मसन्मान, त्यांची प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या कार्यात स्वतःला वाहून घेतले. त्याच वेळी, सामाजिक सौहार्द सुद्धा कायम राहील, यासाठी देखील त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले.



महात्मा फुले यांनी अत्यंत महत्त्वाचे मत व्यक्त केले होते की, जोपर्यंत समाजातील सर्वांना समान अधिकार मिळत नाहीत, तोपर्यंत खरे स्वातंत्र्य मिळत नाही. म्हणूनच तर त्यांनी हा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरणाऱ्या संस्था उभ्या केल्या आणि या संस्थांनी एका न्याय्य समाजाच्या निर्मितीत मोठे योगदान दिले. महात्मा फुले यांनी स्थापित केलेला सत्यशोधक समाज ही चळवळ आधुनिक भारतातील सर्वांत महत्त्वाच्या सामाजिक सुधारणा चळवळींपैकी एक होती. सामाजिक सुधारणा, समाजसेवा आणि प्रत्येक माणसाच्या सन्मानाला प्रतिष्ठा मिळवून देण्यात ही चळवळ आघाडीवर होती. ही चळवळ समाजातील महिला, युवा आणि ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांची एक ठोस प्रभावशाली अभिव्यक्ती बनली. जर समाजाने आपल्या गाभ्याशी न्याय, प्रत्येक व्यक्तीबद्दलचा आदर आणि सामूहिक प्रगतीची भावना ही मूल्ये जपली तर तो समाज अधिक सक्षम होऊ शकतो असा महात्मा फुले यांचा ठाम विश्वास होता. या चळवळीतूनही महात्मा फुले यांच्या याच विश्वासाचे प्रतिबिंब उमटले होते.

महात्मा फुले यांच्या वैयक्तिक जीवनातूनही आपल्याला धैर्याची शिकवण मिळते. सतत कामात गुंतून राहणे, सातत्याने लोकांमध्ये असणे याचा त्यांच्या प्रकृतीवर विपरीत परिणामही झाला. मात्र, प्रकृतीबात अत्यंत गंभीर आव्हाने समोर असतानाही त्यांचा निर्धार तसूभरही ढळला नाही. अर्धांगवायूच्या गंभीर झटक्याने त्यांना असंख्य मर्यादा आल्या, पण तरीही त्यांनी आपले काम आणि आपले संकल्प साकारण्याचे प्रयत्न सुरूच ठेवले. त्यांचे शरीर जणू त्यांची सत्त्वपरीक्षाच घेत होते, मात्र समाजाप्रति असलेल्या आपल्या वचनबद्धतेपासून त्यांनी कधीही फारकत घेतली नाही. त्यामुळेच तर आजही लाखो लोकांसाठी, विशेषतः संघर्षातून धैर्य मिळवणाऱ्यांसाठी, महात्मा फुले यांच्या जीवनाचा हा पैलू सर्वांत शक्तिशाली पैलूंपैकी एक आहे.

सावित्रीबाई फुले यांचा आदरपूर्वक उल्लेख केल्याशिवाय महात्मा फुले यांचे स्मरण पूर्ण होऊच शकत नाही. त्या स्वतः आपल्या देशातील महान सुधारकांपैकी एक होत्या. भारतातील स्त्री शिक्षणाचा भक्कम पाया रचणाऱ्या आघाडीच्या महिला शिक्षिकांपैकी त्या एक होत्या. त्यांनी मुलींच्या शिक्षणाला पुढे नेण्यात निर्णायक भूमिका बजावली होती आणि आपली स्वप्ने पूर्ण करण्याची संधी मुलींना मिळवून दिली होती. महात्मा फुले यांचे निधन झाल्यानंतरही सावित्रीबाईंनी हा वसा तसाच पुढे चालू ठेवला. १८९७ मध्ये प्लेगच्या साथ रोगाचा उद्रेक झालेला असताना त्यांनी बाधित रुग्णांची इतक्या समर्पण भावनेनं सेवा केली की, त्या स्वतः त्या रोगाच्या विळख्यात सापडल्या आणि त्यातच त्यांना आपले प्राण गमवावे लागले.

आपल्या भूमीला अशा महान सुपुत्र आणि सुकन्यांचे वरदान वारंवार लाभले आहे, ज्यांनी आपले विचार, त्याग आणि कृतीद्वारे समाज अधिक बळकट केला. बाहेरून कोणीतरी बदल घडवेल म्हणून त्यांनी प्रतीक्षा केली नाही, तर ते स्वतः त्या बदलाचे उगमस्थान बनले. आपल्या देशात शेकडो वर्षांपासून समाज सुधारणेची कळकळीची हाक नेहमीच समाजातूनच उमटली आहे, ती अशा लोकांकडून, ज्यांना समाजातील दुःख स्पष्टपणे दिसत होते आणि नशिबाचा भाग म्हणून तो स्वीकारायला त्यांनी ठामपणे नकार दिला. महात्मा जोतिराव फुले हे अशाच एका बुलंद आवाजाचे प्रतीक होते.

मला २०२२ मधील माझ्या पुणे भेटीचे स्मरण होते, त्यावेळी मी शहरातील महात्मा फुले यांच्या भव्य पुतळ्याला अभिवादन केले होते. आता आपण त्यांच्या द्विशताब्दी वर्षात पाऊल ठेवत आहोत. अशा वेळी या सगळ्याचे पुनर्नविनीकरण अर्थात नवी मांडणी करणे हीच महात्मा ज्योतिराव फुले यांना वाहिलेली सर्वांत यथार्थ आदरांजली ठरू शकणार आहे. त्यांना अत्यंत प्रिय असलेल्या शिक्षणासारख्या विषयांप्रति आपल्या बांधिलकीची नव्याने मांडणी करत आहोत, अन्यायाप्रति आपल्या संवेदनशीलतेची पुन्हा नव्याने जाणीव करून देत आहोत आणि समाजात स्वबळावर स्वतःत सुधारणा घडवून आणण्याची क्षमता आहे हा विश्वास नव्याने जागृत करत आहोत. नैतिक स्पष्टता आणि लोककल्याणाचा उद्देश यांची जोड मिळाल्यास, भारतातील सामुदायिक शक्ती चमत्कार घडवून आणू शकते असेच त्यांची जीवनगाथा आपल्याला सांगते. आणि म्हणूनच ते आजही लाखोंना प्रेरणा देत आहेत. म्हणूनच त्यांचे शब्द आणि कृती यांच्यातून आजही आशेचा किरण डोकावतो. आणि म्हणूनच महात्मा ज्योतिराव फुले हे त्यांच्या जन्मापासून दोनशे वर्षांनंतरही केवळ भूतकाळातील एक व्यक्तिमत्त्व नव्हे तर भारताच्या भविष्याचे मार्गदर्शक आहेत.

## वेध

**सोनाली ठेंगडी**

# नैवेद्यं समर्पयामि...

आपल्या संस्कृतीने दैनंदिन जीवनातील प्रत्येक छोट्या कर्माला धर्म आणि शास्त्राचे उत्तम असे अधिष्ठान दिले आहे. अगदी गर्भसंस्कारापासून तर अन्त्यसंस्कारापर्यंत प्रत्येक कर्मामागे उदात्त असा धार्मिक हेतू आहे. कदाचित आपल्यापैकी प्रत्येकाला प्रत्येक गोष्टीमागील अध्यात्म माहिती नसेल आणि ते माहिती असलेच पाहिजे, अशी अपेक्षाही अवाजवी आहे. पण, तरीही काही गोष्टी आपल्या संस्कृतीने अतिशय उदात्तपणे दिल्या आहेत त्यांचे सार समजून घेतलेच पाहिजे.

सणांच्या दिवशी आपल्या कुटुंबांमध्ये विशेष अन्न तयार होते. त्या दिवशी कोणाला कितीही घाई असली तरी देवाला तो नैवेद्य अर्पण केल्याशिवाय कोणी अन्न ग्रहण करत नाही. आजही अनेक कुटुंबांमध्ये ही परंपरा पाळली जाते. तसे पाहता आपल्याकडे रोजच देवाला नैवेद्य अर्पण केल्याशिवाय आणि गो-ग्रास काढल्याशिवाय अन्न ग्रहण करू नये, असे सांगितले आहे. पण कालौघात ते मागे पडले. निदान सणावारांना आपण हे सर्व पाळतो, हेही नसे थोडके. (आजकाल पारंपरिक गोष्टींबाबत 'मिनिमम'वर समाधान मानण्याचे युग आहे)

देवाला 'निवेदनीय' असे जे द्रव्य ते म्हणजे नैवेद्य होय. म्हणजे ईश्वराला अर्पण करता येण्यासारखी, त्याला देता येण्यासारखी खाद्य वस्तू, खाद्यपदार्थ म्हणजे नैवेद्य असे आपण म्हणूया. त्यातही आपण शब्दप्रयोग करतो, नैवेद्य दाखवणे. दाखवणे या शब्दात समर्पणाचा भाव नाही. म्हणून नेहमी हा शब्द नैवेद्य अर्पण करणे, अशाच प्रकारे वापरला जावा. कारण आपण तो देवाला अर्पण करत असतो. धर्मामध्ये ईश्वरचरणी नैवेद्य (प्रसाद) अर्पण करण्याची प्रथा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. अनेक लोक याला एक कर्मकांड मानतात परंतु धार्मिक जाणकारांच्या मते, नैवेद्य हा देवाच्या प्रति आपण मानलेला आभार, आपली भक्ती आणि त्याच्यासमोर आपल्या आत्मसमर्पणाचे एक प्रतीक असते. देवासमोर ठेवलेल्या नैवेद्याला आपण प्रसाद म्हणतो.

नैवेद्य अर्पण करण्याचे प्रथम उद्दिष्ट म्हणजे ईश्वराप्रति आभार व्यक्त करणे. प्राचीन काळापासून अशी मान्यता आहे की निसर्गापासून आपल्याला जे काही प्राप्त होतं, जसे की अन्न, जल, जीवन, हे सर्व ईश्वराच्या कृपेमुळेच मिळतं. यामुळेच सर्वप्रथम ईश्वराला अर्पण करून मग ग्रहण करणे आपल्या विनम्रतेचं आणि कृतज्ञतेचं प्रतीक असतं. नैवेद्य अर्पण करताना मनात ही भावना असते की, 'ईश्वरा हे सर्व भोजन तुझे आहे, त्यावर माझा हक्क नाही.' अशा भावनेतून नैवेद्य अर्पण केला की आपल्यातील मीपणा संपून त्यागाची आणि समर्पणाची भावना विकसित व्हायला मदत होते.

नैवेद्य बनवताना आपल्या मनात भावना असते की प्रत्यक्ष भगवंत आपल्याबरोबर भोजन ग्रहण करत आहेत. त्याचप्रमाणे कुठलीही गोष्ट सर्वप्रथम देवासमोर ठेवल्याने संयम, संतुलन आणि समाधानाची भावना जागृत होते. आपण नैवेद्य बनवताना आंघोळ करून स्वच्छ कपडे धारण करून स्वच्छ पाणी आणि धान्य, भाजी इत्यादीद्वारे तो तयार करतो. याचा उद्देश अन्न बनविण्याच्या प्रक्रियेत स्वच्छता असावी, हाच असतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, सात्त्विकता हे नैवेद्याचे मोठे वैशिष्ट्य आहे. सात्त्विक अन्नाचे सेवन आपल्याला विविध विकारांपासून दूर ठेवते. हे सर्व घरातील नव्या पिढीला शिकविण्यासाठी विद्यमान पालकांनी याचे पालन करणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे, नैवेद्य अर्पण केल्याशिवाय अन्न ग्रहण करायचे नाही, यात संयमाची फार मोठी शिकवण आपल्याला दिली जाते. आपण या सर्व परंपरांकडे वेगळ्या आणि काळानुरूप ज्याला 'प्रॅक्टिकल' दृष्टीने म्हणता येईल, असे पाहिले तर आपली संस्कृती नव्या पिढीकडे स्थानांतरित करतानाची प्रक्रिया सहज, सोपी होईल. फक्त ते आपण आपल्या रोजच्या जीवनात अंतर्भूत करणे गरजेचे आहे. जाता जाता एवढेच सांगायचे आहे की, जेवणापूर्वी आपल्या ताटाभोवती पाण्याचे मंडळ करण्याची पद्धत आहे. याचा अर्थ सूक्ष्म जीवजंतू आपल्या पानापर्यंत येणार नाही. जमीन गेली, सारवणे गेले, त्याजागी फरशी आणि टेबलखुर्ची आली, पण फरशीवरचे आणि ताटाखालचे जीवजंतू मात्र तसेच आहेत. काही वर्षांनी पाश्चात्त्य जेव्हा सांगतील... Please spray or sprinkle sterile water under your dish, before starting your food... तेव्हा आपल्या पिढीला कदाचित याचे महत्त्व पटेल आणि आपले आजोबा आणि घरातील मोठी मंडळी पानाभोवती पाण्याचे मंडळ का करत होते, ते पटेल. असे होण्याआधी आपणच आपल्या पिढीला याचे महत्त्व पटवून सांगितले तर त्यांना आपल्याच गोष्टी पाश्चात्त्यांकडून शिकण्याची वेळच येणार नाही.

७७५५९३८८२२

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# खोटारडे आणि पळपुटे!

खोटं बोलायचं, रेटून बोलायचं, वातावरण तापवायचं, त्यातून समाजात संभ्रम निर्माण करून आपला राजकीय स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करायचा आणि मग कायद्याचा बडगा उगारला की पार्श्वभागाला पाय लावायचा आणि पळायचं, ही जणू काही भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची नवी राजकीय कार्यपद्धतीच झाली आहे. आरोपांचे बाण सोडायचे, मथळे मिळवायचे, स्वस्तातली प्रसिद्धी मिळवायची आणि खटले दाखल झाले की जामिनाच्या छत्राखाली आश्रय घ्यायचा, या सगळ्या प्रकारातून एक वेगळीच राजकीय संस्कृती काँग्रेसने उभारली आहे. राहुल गांधींचे सावरकरांवरील व्यक्तव्य, गुजरातमधील एका विशिष्ट समाजाविषयीचे व्यक्तव्य, मल्लिकार्जुन खडगे यांचे अलिकडील भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयीचे वक्तव्य असो किंवा पवन खेडा प्रकरण, प्रत्येकवेळी एकच पॅटर्न दिसून येतो. आधी वादग्रस्त विधान, त्यानंतर संतापाची लाट, मग कायदेशीर अडचणी आणि शेवटी माघार किंवा माफी, स्पष्टीकरण. हा केवळ योगायोग नसून, एक ठरलेली राजकीय रणनीती नव्हे षडयंत्रच म्हणावं लागेल. असे प्रकार आता जोर धरू लागले आहेत. मात्र, काँग्रेसने चालविलेल्या या सगळ्या घटनांमधून काँग्रेसचा बुरखा फाटत चालल्याचे दिसत आहे.

राजकारणात आरोप-प्रत्यारोप नवे नाहीत. पण मर्यादा ओलांडल्या की सत्ता, कायदा आणि प्रतिमा तीनही गोष्टींचा प्रश्न निर्माण होतो. आसाममध्ये नुकत्याच घडलेल्या घटनेने हे पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. हिमंता बिस्व सरमा यांच्या पत्नीच्या पासपोर्टबाबत पवन खेडा यांनी केलेल्या दाव्यानंतर निर्माण झालेला वाद केवळ राजकीय राहिला नाही, तर तो कायदेशीर आणि वैयक्तिक प्रतिष्ठेच्या लढाईत परिवर्तित झाला. सरमा यांनी या प्रकरणाकडे केवळ राजकीय टीका म्हणून पाहिले नाही. तर बनावट कागदपत्र तयार केल्याप्रकरणी त्यांनी थेट कारवाईचा मार्ग स्वीकारला. संपूर्ण आसाम पोलिस यंत्रणा सक्रिय झाली. संदेश स्पष्ट होता. राजकीय टीका टिप्पणी, शेरेबाजी, आरोप-प्रत्यारोप वेगळी. मात्र, कागदपत्रांमध्ये छेडछाड, बनावट कागदपत्रे तयार करून वैयक्तिक आयुष्यावर हल्ला केल्यास त्याची किंमत मोजावी लागेल. यामुळे पवन खेडा यांच्यासमोरील अडचणी वाढल्या आहेत. ते पोलिसांपासून लपून पळत राहिले, अखेर आता सात दिवसांचा अटकपूर्व जामीन त्यांना मिळाला आहे. मात्र, न्यायालयाने कायमस्वरूपी जामीन दिलेला नाही. सात दिवसांनंतर खेडा यांना पोलिसी कारवाईला समोर जावे लागेल, तेव्हा पुन्हा तोंड लपवून पळण्याची वेळ येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आता याच पृष्ठभूमीवर महाराष्ट्राकडे पाहिले, तर चित्र वेगळे दिसते. देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नीबाबत अनेकदा सोशल मीडियावर, राजकीय व्यासपीठांवर टीका, टोमणे आणि वैयक्तिक पातळीवर सातत्याने हल्ले होताना दिसतात. पण अद्याप तरी फडणवीस यांनी आसामप्रमाणे आक्रमक भूमिका घेतलेली नाही. त्यांनी संयमाचा मार्ग निवडला आहे. त्यामुळे फडणवीसांवर, त्यांच्या पत्नीवर आरोप करणाऱ्यांनी त्यांच्या सहनशक्तीची दाद दिली पाहिजे. कारण माझ्या बायको, मुलींविषयी समाजमाध्यमांवर बदनामीकारक पोस्ट केल्यावरून तत्कालीन मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी सरकारी यंत्रणेचा वापर करत, अनंत करमुसे यांचे अपहरण करून बंगल्यावर नेले, तेथे बेदम मारहाण केली. शरद पवारांवर एका व्यक्तीने विडंबनात्मक कविता केली. ती केतकी चितळे या अभिनेत्रीने केवळ रिपोस्ट केली म्हणून तिच्यावर गुन्हा दाखल करून महिनाभर तुरुंगात टाकले. मविआ सरकारवर टीका केली म्हणून, अभिनेत्री आणि आता खासदार असलेल्या कंगना राणावत यांचे घर पाडले, सोनिया गांधींचे माहेरचे नाव घेतले म्हणून अर्णव गोस्वामी यांच्यावरील जुन्या संपलेल्या पोलिस केसला पुन्हा नव्याने सुरू करून त्यांना तुरुंगात टाकले. अशी एक नव्हे अनेक उदाहरणे या महाराष्ट्राने बघितली आहेत. राजकीय आशीर्वादाने सचिन वाझे खंडणी, हत्या प्रकरणं तर वेगळीच राहिली. गिरीश कुबेरांवर शाई फेकल्यानंतर विचारांची लढाई विचारांनी लढली पाहिजे म्हणत निषेध करणारे शरद पवार हे सगळं घडत असताना मूग गिळून बसले होते. याला एकप्रकारे मूक संमतीच म्हणायला हरकत नाही. अशा या सूड उगवणाऱ्या राजकारणाची उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी २०१९ ला सुरुवात केलेली असताना, त्याचे अनुकरण देवेंद्र फडणवीसांनी केले नाही. त्याची पुनरावृत्ती त्यांनी केल्याचे कधीही आढळून आले नाही. पण याचा अर्थ असाही नाही की त्यांना सूडाचे राजकारण करता येत नाही किंवा सूड उगवता येत नाही. मात्र, फडणवीसांना ते करायचं नाही. फडणवीसांना स्वच्छ राजकारण करायचं आहे. आजवर ते करत आले आहेत, हे या महाराष्ट्राने अनुभवलं आहे. रणनीती, कूटनीती, राजकीय डावपेचात फडणवीसांचा हात कोणी पकडणार नाही. राजकीय कुरघोडी करण्यात ते वस्ताद आहेत. हे अनेकदा त्यांनी सिद्ध करून दाखवलं आहे.

फडणवीसांची ही मवाळ भूमिका, सहनशीलता, चांगुलपणाचा विरोधक गैरफायदा घेत आहेत का?, हा त्यांचा स्वभाव विरोधकांना मोकळं रान देत आहे का? महाराष्ट्रात विरोधकांकडून किंवा काही ट्रोल गटांकडून मुख्यमंत्री किंवा त्यांच्या कुटुंबीयांवर होणारे वैयक्तिक हल्ले पाहिले, तर ते केवळ राजकीय नसून प्रतिमाहनन या पातळीवर जातात. आणि इथेच फरक पडतो. कोणी सहन करतो, कोणी थेट प्रत्युत्तर देतो. आसामचे मुख्यमंत्री सरमा यांनी जे केलं, ते अनेकांना कठोर वाटू शकतं. पण त्यांनी विरोधकांना एकप्रकारे इशारा दिला आहे. त्यातून त्यांच्या समर्थकांमध्ये दृढ नेतृत्व अशी प्रतिमा अधिक मजबूत झाली. त्याउलट देवेंद्र फडणवीस यांची भूमिका अधिक संयमी दिसते. ते वैयक्तिक टीकेकडे दुर्लक्ष करतात, कामावर लक्ष केंद्रित करतात. हा दृष्टिकोन सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श असू शकतो. असं असलं तरी उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांनी बुलडोझरचा नव्याने घातलेला पायंडा, सरमा यांनी उचललेलं पवन खेडा प्रकरणातलं आताचं पाऊल आणि फडणवीसांनी राजकारणात घालून दिलेला आदर्श. तिघांचेही मार्ग वेगळे आहेत, पण उद्देश एकच प्रतिमा टिकवणं.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### रक्ताने माखलेले हात!

इस्रायल-अमेरिका विरुद्ध इराण हे युद्ध थांबविण्यासाठी पाकिस्तान मध्यस्थी करतो आहे म्हणे! व्वा! हे म्हणजे सैतानाहाती बायबलच की! केवढा मोठ्ठा हा विनोद! मुस्लिम आक्रमकांचा चौदाशे वर्षांचा इतिहास हा हिंसा, अत्याचार, बलात्कार, लुटालूट, सक्तीची बाटवाबाटवी इत्यादी क्रौर्याच्या घटनांनी भरगच्च भरलेला असून तोच वारसा पाकिस्तान पुढे चालवीत आहे. धर्माच्या नावावर स्वतंत्र पाकिस्तानची मागणी पदरात पाडून घेऊन फाळणीच्या वेळी आताच्या पाकिस्तानातील दहा लाखांवर हिंदूंना कापण्यात आले; असंख्य अनन्वित अत्याचार, बलात्कार झाले; त्यांच्या किंकाळ्या अद्याप हवेत विरलेल्या नाहीत. तेथील जिवंत राहिलेल्या हिंदूंना पिढ्यान्‌पिढ्यांच्या मालमत्ता सोडून, जीव वाचविण्यासाठी निर्वासित म्हणून भारतात यावे लागले. हा इतिहास कसा विसरता येईल? दहशतवादी जिहाद्यांची फॅक्टरी असलेला, ओसामा बिन लादेनला आश्रय देणारा कर्जबाजारी पाकिस्तान जगभरातील शांततेला, मानवजातीला आव्हान देणारा ठरलेला आहे. त्या देशाचे हात त्यांनी केलेल्या अत्याचारांचे बळी ठरलेल्यांच्या रक्ताने माखलेले आहेत. त्या देशाने मध्यस्थी करावी अशी कल्पना कुणाच्या सुपीक मेंदूतून निघाली, असा प्रश्न जगभरातील शांतताप्रेमींना पडलेला आहे. मात्र त्यामुळे भारतातील मोदीद्वेषाची आणि हिंदुद्वेषाची कावीळ झालेली फुरोगामी फेक्युलर मंडळी कसे मोदींचे नाक कापले गेले म्हणत एकमेकांना टाळ्या देत आनंदाने नाचू लागली आहेत. त्यांची मडकी कच्ची आहेत, हेच यातून दिसून येते.

**अविनाश वाघ**/पुणे

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# अनुजाच्या मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्या हॉस्पिटलची सनद रद्द करा

## पोलिस आयुक्त व सिव्हील हॉस्पिटलचे अधिष्ठाता यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

सिझेरियन झालेल्या गर्भवती महिलेकडे दुर्लक्ष आणि निष्काळजीपणा केल्यामुळे अनुजा बावळे हिचा मृत्यू झाला. या सर्व प्रकरणात दबडे यांची चूक आहे. त्यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी आणि माझ्या पत्नीला न्याय मिळावा. डॉ. दबडे आणि स्टाफ यांच्यावर कारवाई होऊन त्यांची सनद रद्द करावी, अशी मागणी पोलीस आयुक्त एम राजकुमार व छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता यांच्याकडे अनुजाचे पती विनायक बावळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

पत्नी अनुजा सनी बावळे हिला प्रेग्नेंसी उपचारासाठी पहिल्या महिन्यापासून माधुरी दबडे कृष्णामाई हॉस्पिटल येथे दाखवले होते. दरवेळी पेशंट फॉलोअपसाठी दाखविले असता ती व्यवस्थित आहे, असे सांगितले होते. सातव्या महिन्यापासून पाणी कमी आहे असे सांगितले. त्यासाठी उपचार चालू होते. ४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता रेड डिस्चार्ज म्हणून हॉस्पिटलला ऍडमिट केले. थोडा बॅकपेन होता. साधारण ६ वाजता मॅडमने पाणी कमी असल्याने सिझेरियन आणि जेल ट्रीटमेंटचा पर्याय सांगितला आम्ही विचारपूर्वक सिझेरियन करण्यास सांगितले. संध्याकाळी ७:१५ वाजता सिझेरियन होऊन मुलगा झाल्याचे सांगितले. साधारण रात्री ८:१५ वाजता बाळाला आमच्याकडे देण्यात आले. रात्री ९ वाजता पेशंटला वार्डमध्ये शिफ्ट केले. त्यानंतर पहाटे ३:३० वाजेपर्यंत मॅडम एकदाही पेशंटकडे आल्या नाही. त्यावेळी पेशंट नॉर्मल होता बीपी, पल्सरेट, नॉर्मल होता. पेशंट रात्री १२ वाजेपर्यंत व्यवस्थित होता. त्यानंतर पेशंट मला कसं तरी होतंय, असे सांगून कन्हु लागला. पेशंटच्या नातेवाईकांनी सिस्टर कडे तक्रार केली मॅडमला बोलवा असे सांगितले, तरी त्यांनी त्रास होत असतो, कमी होते. असे सांगितले. परत रात्री १ वाजता सिस्टरकडे तक्रार केली, तरी त्यांनी बोलवले नाही. आणि रक्तस्त्राव कमी होण्यासाठी गोळी ठेवली. पेशंट वारंवार कण्हत होता, तरी लक्ष दिले नाही.

साधारण रात्री २ वाजता पॅड बदलण्यास सांगितले. त्यावेळी मावशीने पॅड बदलला, आणि सिस्टरने बीपी मशीन, पल्स चेक मशीन काढली पहाटे ३ नंतर पेशंट मला डोळ्यास काही दिसत नाही, मला काय होत आहे ते समजेना असे सांगून जोरात कन्हु लागला होता, हातपाय झाडू लागला. नातेवाईकांना फोन केला तेव्हा सिस्टरने मॅडमला फोन केला तोपर्यंत पेशंटनी सलाईन काढून टाकले, आणि अनकॉशस झाल्या. मॅडमने आल्या नंतर काय झाले? कसे झाले? असे विचारले आणि पेशंटला ऑक्सिजन लावण्याचा प्रयत्न केला हार्ट पंपिंग केले, आणि हृदयाचे ठोके कमी असल्याने अश्विनी हॉस्पिटलमध्ये शिफ्ट करू असे पेशंटच्या नातेवाईकांना सांगितले. अश्विनी हॉस्पिटलला शिफ्ट करताना कोणताही डॉक्टर किंवा स्टाफ आमच्या सोबत नव्हता. ऑक्सिजनची सोय नव्हती, नाइट इन्चार्ज किंवा डॉक्टर न्हवते. अश्विनी हॉस्पिटलमध्ये साधारण अर्धा ते पाऊण तासानंतर आम्हाला सांगण्यात आले की, पेशंट कोणत्याही उपचारास प्रतिसाद देत नाही.

कृष्णामाई हॉस्पिटलमधील माधुरी दबडे व इतर स्टाफ यांच्या दुर्लक्ष आणि निष्काळजीपणामुळे अनुजा बावळे हिचा मृत्यू झाला. या सर्व प्रकरणात दबडे यांची चूक आहे, त्यांच्यावर योग्य ती कारवाई कारवाई होऊन त्यांची सनद रद्द करावी अशी मागणी पोलीस आयुक्त एम राजकुमार यांच्याकडे मयत अनुजा हिचे पती विनायक बावळे यांनी केली आहे.

# बापू, आपणास आमदार का व्हावेसे वाटले?

## इंगळगी झेडपी शाळेत चिमुकल्यांची आमदार सुभाष देशमुख यांना प्रश्नोत्तरे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत एक आगळावेगळा उपक्रम पार पडला. आमदार सुभाष (बापू) देशमुख यांच्या भेटीदरम्यान पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्याशी थेट प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधला. ''आपले शिक्षण कुठे झाले?'', ''आपण राजकारणात कसे आलात?'', ''आपल्याला आमदार का व्हावेसे वाटले?'' अशा विविध प्रश्नांची सरबत्ती चिमुकल्यांनी केली.

आमदार देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या प्रत्येक प्रश्नाला मनमोकळेपणाने उत्तरे देत मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण तुळजापूर तालुका तसेच उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथे झाले. व्यवसायातूनच आपण अपघाताने राजकारणात प्रवेश केल्याचे त्यांनी नमूद केले.

''राजकारणापेक्षा समाजकारण आणि उद्योग क्षेत्राची मला अधिक आवड आहे,'' असे स्पष्ट करत त्यांनी विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेऊन आदर्श समाज घडवण्याचे आणि राष्ट्रनिर्मितीत योगदान देण्याचे आवाहन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांचे सादरीकरण करून आपली मतेही व्यक्त केली. शाळेच्या विकासासाठी पुण्यातील एका कंपनीच्या सीएसआर निधीतून आठ लाख रुपयांची मदत उपलब्ध करून दिल्याबद्दल ग्रामस्थांनी आमदार देशमुख यांचे आभार मानले.

कार्यक्रमास दक्षिण पंचायत समिती सदस्य अंबिका पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अतुल गायकवाड, सरपंच विनोद बनसोडे, शिवदारे हायस्कूलचे अध्यक्ष संभाजी माने, चंद्रकांत गुरव,इनोदगी कोटे, भुताळी गाडेकर, राहुल वंजारे, प्रधान गुरव, गोरख माळी, सागर धुळवे, भीमाशंकर कोळी, मुख्याध्यापक विलासराव देशमुख, शिक्षक डॉ. अनिल सर्जे, शेखलाल शेख, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निकम, उपाध्यक्ष सोनकडे, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मॉर्निंग वॉक करत असताना चारचाकीने दिली धडक

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

जुळे सोलापूर येथे मॉर्निंग वॉक करत असताना एका वृद्ध व्यक्तीला मागून येणाऱ्या अज्ञात चारचाकी पांढऱ्या कारने मागून जोराची धडक देऊन गंभीर रित्या जखमी केले. यात हकीकत अशी की, दि. ७ एप्रिल रोजी दिपाली शिवानंद नंदर्गी, वय ४२, रा. १४, डॉ. आंबेडकर हाऊसिंग सोसायटी, सिविल लाईन, सोलापूर यांचे वडील शिवपुत्रप्पा वय ७८, हे जुळे सोलापूर पाण्याच्या टाकीकडे जाणाऱ्या रोडच्या दिशेने मॉर्निंग वॉक करत असताना मागून येणाऱ्या अज्ञात चारचाकी पांढऱ्या कारने त्यांना मागून जोराची धडक देऊन गंभीर रित्या जखमी केले. त्यांना उपचारासाठी घेऊन न जाता भरधाव वेगाने कार निघून गेली. याबाबत दि. ९ एप्रिल रोजी विजापूर नाका पोलीस ठाण्यात अज्ञात चालकाविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास मणुरे करत आहेत.

# कर्ज फेडण्यासाठी माहेरून पैसे आण म्हणत विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

लग्नात मानपान केला नाही. आम्हाला कर्ज झाले आहे ते फेडण्यासाठी माहेरून ३ लाख रुपये घेऊन ये व तू जोपर्यंत पैसे घेऊन येत नाहीस तोपर्यंत तू आमच्याकडे नांदण्यास यायची नाही असे म्हणत सासरच्यांनी विवाहितेचा छळ केला आहे.यात हकीकत अशी की, दि. २६ नोव्हेंबर २०१० ते दि. २५ ऑक्टोबर २०२४ च्या दरम्यान रामा (पती), छाया (सासू), संगीता (ननंद), रा. एकतपुर, ता.सांगोला, जि. सोलापूर यांनी मिळून उज्वला रामा फळके, वय २८, रा. पांढरे वस्ती झोपडपट्टी, जुना कारंबा रोड, सोलापूर यांना तू फुकटची खाते, लग्नात मानपान केला नाही. आम्हाला कर्ज झाले आहे ते फेडण्यासाठी माहेरून ३ लाख रुपये घेऊन ये व तू जोपर्यंत पैसे घेऊन येत नाहीस तोपर्यंत तू आमच्याकडे नांदण्यास यायची नाही असे म्हणत शिवीगाळ, दमदाटी व मारहाण केली. जात हाट, छळ करून शारीरिक व मानसिक त्रास दिला. याबाबत दि. ९ एप्रिल रोजी तिघां विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास ढोबळे करत आहेत.


## लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर

९४/२९ मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर
**''नमुना झेड''**
**नियम १०७ पोटनियम (११) (ड-१) पहा**

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्याअर्थी खाली सही करणार विशेष वसुली अधिकारी, लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या, सोलापुर ९४/२९ मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर यांनी सदर पतसंस्थेच्या खालील दर्शविलेल्या थकबाकीदार कर्जदार व त्यांचे जामीनदार यांचेविरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अंतर्गत संस्थेने प्राप्त केलेल्या वसुली दाखल्यास अनुसरून कलम १५६ व नियम १०७ मधील तरतुदीस अनुसरून थकबाकीदार कर्जदारांना प्रथम मागणी नोटीस देऊन त्यांचाकडील थकबाकीची रक्कम भरण्याबाबत कळविलेले होते. परंतू थकबाकीदार कर्जदाराने रक्कम भरण्यास कसूर केल्याने त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. या उपरी ऋणकोने त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला या नोटीसीव्दारे त्यांच्या स्थावर मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतल्याबाबत कळविण्यात येत आहे. तसेच सर्व नागरिकांना देखील सूचित करण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या थकबाकीदार, कर्जदार यांच्या मालमत्तेवर प्रतिकात्मक ताबा नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड-१) नुसार विशेष वसुली व विकी अधिकारी यांनी घेतला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे. सदर ताबा घेतलेल्या मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि जर असा व्यवहार केल्यास लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या , सोलापूर या संस्थेच्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज याला संबंधितांना अधीन राहावे लागेल.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | कर्जदाराचे नांव | जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन | क्षेत्राचे एकक हे.आर.चौ.मी | जप्ती आदेश दिनांक | प्रतिकात्मक ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सौ. अनुराधा भिमाजी कुलकर्णी | मौजे माळकवठे ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं २१२/१/अ/१ | २.३२ | ०३/०४/२०२३ | २१/०८/२०२५ |
| २ | श्री. प्रभावती गोपाळराव बागल | मौजे मांगी ता. करमाळा जि. सोलापूर येथील गट नं २३० | २.२८ | २८/०६/२०२४ | १७/०४/२०२५ |
| ३ | श्री. प्रभावती गोपाळराव बागल | मौजे मांगी ता. करमाळा जि. सोलापूर येथील गट नं १९६ | १.७४ | २१/०२/२०२५ | १७/०४/२०२५ |
| ४ | श्री. दिनेश देवीदास घोलप | मौजे करमाळा (ग्रामीण) ता. करमाळा जि. सोलापूर येथील गट नं २२१/१/७ | ०.६०.८८ | १७/१०/२०२५ | ०२/०१/२०२६ |
| ५ | श्री. प्रविण प्रदिप जाधव | मौजे करमाळा (ग्रामीण) ता. करमाळा जि. सोलापूर येथील गट नं २२१/१/७ | ०.३७.१५ | १७/१०/२०२५ | ०२/०१/२०२६ |
| ६ | सौ. शुभदा देवीदास घोलप | मौजे करमाळा (ग्रामीण) ता. करमाळा जि. सोलापूर येथील गट न ३६९/ ३/७/१/अ/१० | ०.३७.१६ | १७/१०/२०२५ | ०२/०१/२०२६ |

**स्थळ - सोलापूर**
**दि.- ११.०४.२०२६**

(शिक्का)

**सही/-**
**श्री. संतोष कोंडिबा काळे**
विशेष वसुली व विकी अधिकारी लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर


# टीजेएसबी सहकारी बँकेचा एकूण व्यवसाय २५ हजार कोटींच्या पुढे

## यशस्वी वाटचालीवर लेखा परीक्षणातून शिक्कामोर्तब : बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांची माहिती




**तभा वृत्तसेवा,**
**ठाणे, दि. १० एप्रिल-**

देशातील चौथ्या क्रमांकाची बहुराज्यीय सहकारी बँक असलेल्या टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेडने ३१ मार्च २०२६ रोजी समाप्त झालेल्या आर्थिक वर्षासाठी आपले लेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. मागील १५ वर्षांप्रमाणे यंदाही दिनांक १० एप्रिल रोजी लेखा परिक्षित निकाल जाहीर करण्याची परंपरा बँकेने कायम ठेवली आहे, असे बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेत बोलताना अध्यक्ष श्री. गांगल म्हणाले, एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत बँकेने आपल्या ५४व्या वर्षात एकूण व्यवसायाचे २५ हजार कोटींचे उद्दिष्ट पार केले आहे. वर्षभरात नवीन शाखा सुरू करणे आणि धोरणात्मक विलीनीकरणांमुळे बँकेच्या एकूण शाखांची संख्या आता १६५ झालेली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये बँकेचा एकूण व्यवसाय २५ हजार ३६० कोटी इतका नोंदविण्यात आला असून, यात १ कोटी १६ लाख २४४ कोटी ठेवी आणि १९ हजार ११६ कोटी कर्ज वाटपाचा समावेश आहे. बँकेने २८७ कोटींचा एकूण नफा तर ५१५५ कोटींचा निव्वळ नफा नोंदविला आहे. बँकेची एकूण अनुत्पादित कर्जे ३.११% तर निव्वळ अनुत्पादित कर्जे ० टक्के इतकी आहेत, हे बँकेच्या शिस्तबद्ध कर्ज व्यवस्थापन आणि प्रभावी वसूली व्यवस्थेचे यश आहे.

उपाध्यक्ष सीए वैभव सिंगवी म्हणाले, या वर्षातील आमची आर्थिक कामगिरी सातत्य आणि संतुलन दर्शविते. भक्कम भांडवली पर्याप्तता आणि स्थिर मालमत्ता गुणवत्ता याच्या आधारे हे साध्य झाले आहे. व्यावसायिक जोखीम व्यवस्थापनाची शिस्त पाळली आहे. बँकेच्या कार्यपद्धतीमुळे ग्राहकांचा विश्वास टिकवून तो वृद्धिंगत केला आहे.

व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर यांनी सांगितले, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये या दोन राज्यात प्रवेश, नवीन शाखांतुन विस्तार आणि सिटीझन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, गोवा आणि सावंतवाडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड या दोन बँकांचे विलिनीकरण यातून बँकेचा विकासाचा आणि विस्ताराचा दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो.

### आर्थिक वर्षातील प्रमुख कामगिरी

✲ फेब्रुवारी २०२५ मध्ये सिटीझन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, गोवा आणि मे २०२५ मध्ये सावंतवाडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड यांचे विलीनीकरण. ✲ विलीनीकरणानंतर अवघ्या एका वर्षात नवीन समाविष्ट शाखा नफ्यात येण्यास सुरुवात झाली, ज्यामुळे कोकण आणि गोवा विभागातील बँकेची स्थिती अधिक सक्षम. ✲ सहकारी क्षेत्रातील पहिली बँक म्हणून bank.in या बँकिंग डोमेनवर संकेतस्थळ यशस्वीपणे स्थलांतरित. ✲ देशातील पहिली UPI-ICD (आंतरकार्यक्षम रोख ठेवी) स्वीकारणारी बँक म्हणून कार्यान्वित. ✲ राजस्थान आणि छत्तीसगड या दोन नवीन राज्यांमध्ये प्रवेश. ✲ ७ नवीन शाखांची वाढ; एकूण शाखा संख्या १६५. ✲ २५ हजार कोटी एकूण व्यवसायाचा टप्पा पूर्ण.


**CHANGE IN NAME**

I HAVE TO DECLARE THAT MY OLD NAME WAS **Sakubai Bhagwanrao Sawant** HAS BEEN CHANGED TO **Hindavi Anil More**
Resi. - Kamalkunj Anand Nagar, Dharashiv
**KINDLY NOTE**
**THE SAME.(16228 Dtd.10.04.2026)**

## जाहीर सूचना

या जाहीर सूचनेद्वारे जनतेला आवाहन करण्यात येत आहे की परिशिष्टात नमूद मिळकत श्री. राजकुमार शरणप्पा हल्लोळे यांनी मुलगा श्री. रोहित राजकुमार हल्लोळे याचे नावे बक्षीसपत्राने हस्तांतर केलेली असून, ती मिळकत तारण (Mortgage) ठेवण्याचा प्रस्ताव जना स्मॉल फायनान्स बँक लि. शाखा सोलापूर यांचेकडे दिला असून, आमचे अशिल बँकेने सदर कर्ज मंजूर करण्याची तयारी दर्शविलेली आहे.

सदर मिळकत निर्बंधरहित, निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी मिळकतीच्या सद्य मालकांनी दिलेला आहे.

तरी, सदर मिळकतीवर, कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, हक्क, हिस्सा, हितसंबंध, वाद, अगर कर्ज प्रकरणास हरकत किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी ही जाहीर सूचना प्रसिद्ध जलेपासून चौदा (१४) दिवसांच्या आत, खालील नमूद पत्यावर कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

जिल्हा सोलापूर, तालुका अक्कलकोट, पैकी मौजे बऱ्हाणपूर, येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.५४७, यासी क्षेत्र ८२५ चौ. फू., ची मिळकत.

ही जाहीर सूचना प्रसिद्ध केली दि. ०८/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. गणेश वसंत कटारे**
**ॲड. मंजुषा ग. कटारे (लोखंडे)**
कार्यालय क्र. ११, पहिला मजला, स्क्वेअर-वन कॉम्प्लेक्स, १३१, सिध्देश्वर पेठ, सोलापूर - ०३
मोबाईल क्र. ९८६०११००११

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः तालुका बार्शी पैकी शहर बार्शी, बार्शी तालुका हद्दीतील व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की,

लक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बार्शी ही एक नोंदणीकृत वित्तीय पतसंस्था होती व आहे. सदर पतसंस्थेचा रजि. नं. एसयुआर/बीएसआय/आरएसआर/१७७४/ दि. २९/१२/२००६ असा आहे. सदरची पतसंस्था ही सन २००६ पासून कार्यरत आहे. सदर पतसंस्थेमार्फत गरजू लोकांना कर्ज देणे, ठेवी स्वीकारणे इ. कामे केली जातात. असे असताना सदर पतसंस्थेतील संचालक मंडळातील चेअरमन संदीप दिलीप वायचळ, संचालक ज्योती संदीप वायचळ, संचालक आकाश शंकर वायचळ असे संचालक होते यातील चेअरमन संदीप दिलीप वायचळ यांनी सदर पतसंस्थेमध्ये आर्थिक अपहार केलेला आहे. त्यामुळे यातील संदिप दिलीप वायचळ यास संचालक मंडळाने चेअरमन पदावरून बडतर्फ केलेले आहे. तसेच बार्शी शहरातील विविध लोकांनाही संदीप दिलीप वायचळ यांनी शेअर मार्केट मधील गुंतवणुकीच्या बहाण्याने आर्थिक फसवणूक केलेली आहे. त्याबाबत पतसंस्था ही वरील इसमाविरुद्ध योग्य ती कारवाई करणार आहेतच.

त्यामुळे वर नमूद परिस्थिती असताना सदर पतसंस्थेतील कर्जदार, ठेवीदार यांना या नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, यातील कर्जदार यांनी त्यांचे कर्जाचे हप्ते, पिग्मी, ठेवी ह्या पतसंस्थेतील सचिव विरेश मल्लिकार्जुन बुचडे, संस्था व्यवस्थापक अमोल बाळासाहेब पाटील व पतसंस्थेतील अधिकृत पिग्मी एजंट यांच्याकडे त्यांच्या कर्जाचे रक्कम पिग्मी ठेवी, द्यावेत व त्याबाबत रीतसर पतसंस्थेची पावती घ्यावी.

**तरी या जाहीर नोटीसीने कळिवणेत येते की,**

तरी सदर पतसंस्थेतील कर्जदार, ठेवीदार यांनी यातील पतसंस्थेतील संचालक मंडळातील चेअरमन संदीप दिलीप वायचळ, संचालक ज्योती संदीप वायचळ, संचालक आकाश शंकर वायचळ यांच्याशी कोणताही पतसंस्थेबाबतचा आर्थिक व्यवहार करू नये, त्यांना कर्जाचे हप्ते देवू नये, ठेवी देवू नये, पिग्मी देवू नये. याउपर पतसंस्थेतील संचालक मंडळातील चेअरमन संदीप दिलीप वायचळ, संचालक ज्योती संदीप वायचळ, संचालक आकाश शंकर वायचळ यांच्याशी पतसंस्थेतील ठेवीदार, कर्जदार, व इतर लोकांनी कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार केल्यास त्या व्यवहाराबाबत पतसंस्था जबाबदार राहणार नाही. कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून ही सावधानतेची नोटीस प्रसिद्ध केली असे. दि. १०/०४/२०२६

**नोटीस देणार**
लक्ष्मी नागरी सह. पतसंस्था मर्या. बार्शी
तर्फे चेअरमन महादेव मल्लिकार्जून बुचडे

**सही/-**
**ॲड. प्रकाश एस. साखरे**
बी.ए.एलएल.बी.
दिवाणी व फौजदारी न्यायालय बार्शी
मो. नं. ९०२८४६८५०७
नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट

## सार्वजनिक सूचना

(दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ च्या कलम १०२ (१) आणि (२) अंतर्गत)

**मे. पांढे कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामिनदार श्री. मेहुल अशोक मुळे यांच्या धनकोंच्या लक्षार्थ**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कर्जदार/वैयक्तिक जामीनदाराचे नाव | श्री. मेहुल अशोक मुळे |
| २. | कर्जदार/वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | रा. १५७, रेल्वे लाईन्स, सुशील अपार्टमेंट, सोलापूर, महाराष्ट्र-४१३००१. |
| ३. | अर्ज स्वीकारण्याच्या आदेशाचा तपशील | IA (I.B.C) ३७८४ (MB) २०२५ in C.P. (IB) ७६३ (MB) २०२४ |
| ४. | दिवाळखोरी निवारण प्रक्रिया सुरू होण्याची तारीख. | ०६.०४.२०२६ (आदेश ०९.०४.२०२६ रोजी अपलोड केला) |
| ५. | ज्या निवारण व्यावसायिकाकडे दावे नोंदवायचे आहेत त्यांचा तपशील | डॉ. श्रवणकुमार विष्णोई नोंदणी क्रमांक: IBBI/PA-००२/ IP-N०००४०/२०१६-२०१७/१००७९ |
| ६. | बोर्डाकडे नोंदणीकृत ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | बीसीसी टॉवर, १००८, १० वा मजला, अर्जुनगंज, शहीद पथ जवळ, लखनौ, उत्तर प्रदेश २२६००२ EMAIL : shravan.vishnoi@yahoo.com |
| ७. | ठराव व्यावसायिकाशी पत्रव्यवहारासाठी वापरायचा पत्ता आणि ई-मेल | बीसीसी टॉवर, १००८, १० वा मजला, अर्जुनगंज, शहीद पथ जवळ, लखनौ, उत्तर प्रदेश २२६००२ EMAIL : pirp.mehul@shravanvishnoi.com |
| ८. | दावे सादर करण्याची अंतिम तारीख | ०२.०५.२०२६ |
| ९. | दावा दाखल करण्यासाठी संबंधित अर्ज येथे उपलब्ध आहेत: | ''फॉर्म बी'' वेब लिंक: HTTPS://WWW.IBBI.GOV.IN/HOME/DOWNLOADS |

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, मे. ट्रिन सिटी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीने दाखल केलेल्या अर्जावर, माननीय (आय.बी.सी)३७८४(एमबी)२०२५ यांनी सी.पी. (आयबी)७६३(एमबी)२०२४ मध्ये दिनांक ०६-०४-२०२६ च्या आदेशान्वये, श्री. मेहुल अशोक मुळे यांच्याविरुद्ध आयबीसी २०१६ च्या कलम १०० अन्वये दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश दिला आहे. त्यानुसार, श्री. मेहुल अशोक मुळे यांच्या धनकोंना याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांचे दावे पुराव्यासह, इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट कर्जदारांच्या वैयक्तिक जामीनदारांसाठी दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ७(१) अंतर्गत विहित नमुना ''फॉर्म बी'' मध्ये, नोंद क्र. ७ समोर नमूद केलेल्या पत्त्यावर किंवा त्याच नोंदीमध्ये नमूद केलेल्या ईमेलद्वारे, रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे दिनांक ०२.०५.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावेत. धनकोंनी त्यांचे दावे निर्णायक पुरावे, दाव्यांचा तपशील आणि वैयक्तिक माहितीसह इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे किंवा कुलर, स्पीड पोस्ट किंवा नोंदणीकृत पत्राद्वारे सादर करावेत. दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ किंवा इतर कोणत्याही लागू कायद्यांच्या तरतुदींनुसार दंड आकारला जाईल.

**डॉ. श्रवणकुमार विष्णोई**
**ठराव व्यावसायिक**
**श्री. मेहुल अशोक मुळे - पीजी, मे. पांढे कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**
**नोंदणी क्रमांक:** IBBI/IPA/-००२/-०००४०/२०१६-२०१७/१००७९
**एएफए क्रमांक:** AA२/१००७९/०२/३११२२६/२०४१२३

**दिनांक: ११.०४.२०२६**
**ठिकाण: लखनौ**

## सार्वजनिक सूचना

(दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ च्या कलम १०२(१) आणि(२) अंतर्गत)

**मे. पांढे कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामिनदार श्री. आरुध मोहन जाधव यांच्या धनकोंच्या लक्षार्थ**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कर्जदार/वैयक्तिक जामीनदाराचे नाव | श्री. आरुध मोहन जाधव |
| २. | कर्जदार/वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | डी-६, अवंती नगर, दत्त मंदिराजवळ, सोलापूर, महाराष्ट्र-४१३००१ |
| ३. | अर्ज स्वीकारण्याच्या आदेशाचा तपशील | IA (I.B.C) ९८२ (MB) २०२५ in C.P. (IB) ६११ (MB) २०२४ |
| ४. | दिवाळखोरी निवारण प्रक्रिया सुरू होण्याची तारीख. | ०६.०४.२०२६ (आदेश ०९.०४.२०२६ रोजी अपलोड केला) |
| ५. | ज्या निवारण व्यावसायिकाकडे दावे नोंदवायचे आहेत त्यांचा तपशील | डॉ. श्रवणकुमार विष्णोई नोंदणी क्रमांक: IBBI/PA-००२/ IP-N०००४०/२०१६-२०१७/१००७९ |
| ६. | बोर्डाकडे नोंदणीकृत ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | बीसीसी टॉवर, १००८, १० वा मजला, अर्जुनगंज, शहीद पथ जवळ, लखनौ, उत्तर प्रदेश २२६००२ EMAIL : shravan.vishnoi@yahoo.com |
| ७. | ठराव व्यावसायिकाशी पत्रव्यवहारासाठी वापरायचा पत्ता आणि ई-मेल | बीसीसी टॉवर, १००८, १० वा मजला, अर्जुनगंज, शहीद पथ जवळ, लखनौ, उत्तर प्रदेश २२६००२ EMAIL : pirp.mehul@shravanvishnoi.com |
| ८. | दावे सादर करण्याची अंतिम तारीख | ०२.०५.२०२६ |
| ९. | दावा दाखल करण्यासाठी संबंधित अर्ज येथे उपलब्ध आहेत: | ''फॉर्म बी'' वेब लिंक: HTTPS://WWW.IBBI.GOV.IN/HOME/DOWNLOADS |

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, माननीय न्यायनिर्णय प्राधिकरण, मुंबई खंडपीठ-६ यांनी, मे. ट्रिन सिटी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीने दाखल केलेल्या अर्जावर, सी.पी. (आयबी)६११(एमबी)२०२४ मधील आयए (आय.बी.सी)९८२(एमबी)२०२५ मध्ये, दिनांक ०६-०४-२०२६ च्या आदेशान्वये, श्री. आरुध मोहन जाधव यांच्याविरुद्ध आयबीसी २०१६ च्या कलम १०० अन्वये दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश दिला आहे. त्यानुसार, श्री. आरुध मोहन जाधव यांच्या धनकोंना याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांचे दावे पुराव्यासह, इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट कर्जदारांच्या वैयक्तिक जामीनदारांसाठी दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ७(१) अंतर्गत विहित नमुना ''फॉर्म बी'' मध्ये, नोंद क्र. समोर नमूद केलेल्या पत्त्यावर रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे दिनांक ०२.०५.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावेत. ७ किंवा त्याच नोंदीमध्ये नमूद केलेल्या ईमेलद्वारे. धनकोंनी त्यांचे दावे निर्णायक पुराव्यासह, दाव्यांचा तपशील आणि वैयक्तिक माहितीसह इलेक्ट्रॉनिक संप्रेषणाद्वारे किंवा कुरिअर, स्पीड पोस्ट किंवा नोंदणीकृत पत्राद्वारे सादर करावेत. दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ किंवा इतर कोणत्याही लागू कायद्यांच्या तरतुदींनुसार दंड आकारला जाईल.

**डॉ. श्रवणकुमार विष्णोई**
**ठराव व्यावसायिक**
**श्री. आरुध मोहन जाधव - मे. पांढे कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडचे पीजी**
**नोंदणी क्रमांक:** IBBI/IPA/-००२/-०००४०/२०१६-२०१७/१००७९
**एएफए क्रमांक:** AA२/१००७९/०२/३११२२६/२०४१२३

**दिनांक: ११.०४.२०२६**
**ठिकाण: लखनौ**

## सार्वजनिक सूचना

(दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ च्या कलम १०२ (१) आणि (२) अंतर्गत)

**मे. पांढे कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामिनदार श्री. मयुरेश कमळकर जाधव यांच्या धनकोंच्या लक्षार्थ**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कर्जदार/वैयक्तिक जामीनदाराचे नाव | श्री. मयुरेश कमळकर जाधव |
| २. | कर्जदार/वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | रा. १५७, रेल्वे लाईन्स, सुशील अपार्टमेंट, सोलापूर, महाराष्ट्र-४१३००१. |
| ३. | अर्ज स्वीकारण्याच्या आदेशाचा तपशील | IA (I.B.C) २०९७ (MB) २०२५ in C.P. (IB) १०३७ (MB) २०२४ माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ-६ द्वारे |
| ४. | दिवाळखोरी निवारण प्रक्रिया सुरू होण्याची तारीख. | ०६.०४.२०२६ (आदेश ०९.०४.२०२६ रोजी अपलोड केला) |
| ५. | ज्या निवारण व्यावसायिकाकडे दावे नोंदवायचे आहेत त्यांचा तपशील | डॉ. श्रवणकुमार विष्णोई नोंदणी क्रमांक: IBBI/PA-००२/ IP-N०००४०/२०१६-२०१७/१००७९ |
| ६. | बोर्डाकडे नोंदणीकृत ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | बीसीसी टॉवर, १००८, १० वा मजला, अर्जुनगंज, शहीद पथ जवळ, लखनौ, उत्तर प्रदेश २२६००२ EMAIL : shravan.vishnoi@yahoo.com |
| ७. | ठराव व्यावसायिकाशी पत्रव्यवहारासाठी वापरायचा पत्ता आणि ई-मेल | बीसीसी टॉवर, १००८, १० वा मजला, अर्जुनगंज, शहीद पथ जवळ, लखनौ, उत्तर प्रदेश २२६००२ EMAIL : pirp.mehul@shravanvishnoi.com |
| ८. | दावे सादर करण्याची अंतिम तारीख | ०२.०५.२०२६ |
| ९. | दावा दाखल करण्यासाठी संबंधित अर्ज येथे उपलब्ध आहेत: | ''फॉर्म बी'' वेब लिंक: HTTPS://WWW.IBBI.GOV.IN/HOME/DOWNLOADS |

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, मे. ट्रिन सिटी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीने दाखल केलेल्या अर्जावर, माननीय (आय.बी.सी) २०९७(एमबी)२०२५ यांनी सी.पी. (आयबी)/१०३७(एमबी)२०२४ मध्ये दिनांक ०६-०४-२०२६ च्या आदेशान्वये, श्री. मयुरेश कमळकर जाधव यांच्याविरुद्ध आयबीसी २०१६ च्या कलम १०० अन्वये दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश दिला आहे.

त्यानुसार, श्री. मयुरेश कमळकर जाधव यांच्या धनकोंना याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांचे दावे पुराव्यासह दिनांक ०२.०५.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी, इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट कर्जदारांच्या वैयक्तिक जामीनदारांसाठी दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ७(१) अंतर्गत विहित नमुना ''फॉर्म बी'' मध्ये, नोंद क्र. ७ समोर नमूद केलेल्या पत्त्यावर किंवा त्याच नोंदीमध्ये नमूद केलेल्या ईमेलद्वारे रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करावेत. धनकोंनी त्यांचे दावे निर्णायक पुराव्यासह, दाव्यांचा तपशील आणि वैयक्तिक माहितीसह इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे किंवा कुरिअर, स्पीड पोस्ट किंवा नोंदणीकृत पत्राद्वारे सादर करावेत.

दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ किंवा इतर कोणत्याही लागू कायद्यांच्या तरतुदींनुसार दंड आकारला जाईल.

**डॉ. श्रवणकुमार विष्णोई**
**ठराव व्यावसायिक**
**श्री. मयुरेश कमळकर जाधव - पीजी, मे. पांढे कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**
नोंदणी क्रमांक: IBBI/IPA/-००२/-०००४०/२०१६-२०१७/१००७९
एएफए क्रमांक: AA२/१००७९/०२/३११२२६/२०४१२३

**दिनांक: ११.०४.२०२६**
**ठिकाण: लखनौ**






## महत्त्वाचे

### भारतीय महिला नेमबाज पात्रता फेरीतच स्पर्धेबाहेर

**नवी दिल्ली :** स्पेनमधील ग्रॅनाडा येथे सुरू असलेल्या इंटरनॅशनल शूटिंग स्पोर्ट फेडरेशनच्या रायफल/पिस्तूल विश्वचषक स्पर्धेतील, महिलांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन्स (३पी) प्रकारात सहभागी झालेल्या तिन्ही भारतीय नेमबाजांना पात्रता फेरीच्या पुढे मजल मारता आली नाही. यामध्ये सुरभी भारद्वाज रापोले आणि ऑलिम्पिकपटू अंजुम मौदगिलने प्रत्येकी ५८७ गुणांची नोंद करीत अनुक्रमे १८वे आणि १९वे स्थान पटकावले. आयुषी पोद्दार हिने ५८५ गुणांची कमाई करीत २७ वे स्थान मिळविले. पात्रता फेरीतील आठवे आणि अंतिम स्थान ५८९ गुणांवर निश्चित झाले. तसेच, शुक्रवारी पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड-फायर पिस्तूल प्रकारात अंकुर गोयल हा सर्वोत्तम कामगिरी करणारा भारतीय नेमबाज ठरला; त्याने २८९ गुणांची नोंद केली. ऑलिम्पिकपटू विजयवीर सिद्धू याने २८७ गुण मिळविले, तर नीरज कुमार याने २८२ गुणांची कमाई केली.

### झिम्बाब्वेचा महिला संघ पाकिस्तानचा दौरा करणार

लाहोर : महिला टी-२० विश्वचषकापूर्वी झिम्बाब्वेचा महिला संघ पुढील मे महिन्यात पाकिस्तानच्या दौऱ्यावर जाणार आहे. महिलांच्या द्विपक्षीय मालिकेसाठी झिम्बाब्वेचा पाकिस्तानचा हा पहिलाच दौरा आहे. १२ जून ते ५ जुलै या कालावधीत इंग्लंडमध्ये होणाऱ्या २०२६ च्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषकापूर्वी, पाकिस्तान तसेच झिम्बाब्वे महिला संघासाठी ही मालिका तयारीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या मालिकेतील सर्व सहा सामने, यात प्रत्येकी तीन वन-डे व तीन टी-२० सामन्यांचा समावेश आहे. कराची येथील नॅशनल बँक स्टेडियमवर खेळवले जातील. या दौऱ्याची सुरुवात ३ मे रोजी एकदिवसीय सामन्यांच्या टप्प्याने होईल; त्यानंतर १२ मे पासून टी-२० मालिका सुरू होईल. झिम्बाब्वेचा संघ २९ एप्रिल रोजी कराचीमध्ये दाखल होणार असून, त्यानंतर ३० एप्रिल ते २ मे या कालावधीत दोन्ही संघ सराव सत्रे पार पाडतील. ३, ६ आणि ९ मे रोजी नियोजित असलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेला विशेष महत्त्व आहे.

### दुखापतग्रस्त हसरंगाच्या जागी जॉर्ज लिंडे लखनौ संघात

**नवी दिल्ली :** लखनौ सुपर जायंट्स संघाने २०२६ च्या इंडियन प्रीमियर लीग हंगामातील उर्वरित सामन्यांसाठी श्रीलंकेचा लेग-स्पिनर वानिंदू हसरंगा याच्या जागी दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज-अष्टपैलू जॉर्ज लिंडे याला करारबद्ध केले आहे, अशी घोषणा स्पर्धेच्या आयोजकांनी शुक्रवारी केली. लखनौ सुपर जायंट्स संघाने आयपीएलमधून बाहेर पडलेल्या वानिंदू हसरंगा याच्या जागी दक्षिण आफ्रिकेचा अष्टपैलू खेळाडू जॉर्ज लिंडे याला करारबद्ध केले आहे, असे एलएसजीच्या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.



गत वर्षी अबुधाबी येथे झालेल्या खेळाडूंच्या लिलावात एलएसजी संघाने २ कोटी रुपयांना विकत घेतलेला हसरंगा, २०२६ च्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकातील श्रीलंकेच्या पहिल्याच सामन्यादरम्यान झालेल्या हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे, सध्या सुरू असलेल्या या स्पर्धेतून बाहेर पडला आहे. तो आमच्या संघात सामील होऊ शकणार नाही, ही वस्तुस्थिती गृहीत धरून आम्ही तयारी करत आहोत. आम्ही त्याच्या पर्यायांचा शोध घेत आहोत; या संदर्भातील घोषणा २४ ते ४८ तासांत केली जाईल, असे एलएसजीचे क्रिकेट संचालक टॉम मूडी यांनी गुरुवारी ईडन गार्डन्सवर झालेल्या सामन्यादरम्यान सांगितले होते. हा सामना लखनौ संघाने शेवटच्या चेंडूवर तीन गडी राखून जिंकला होता.

# पहिल्याच चेंडूवर बंगळुरूला धक्का



जोफ्रा आर्चरचा प्रभावी मारा

**◆ गुवाहाटी, १० एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी पावसाच्या व्यत्ययामुळे सुमारे एक तास विलंबाने सुरू झालेल्या आयपीएल सामन्यात राजस्थान रॉयल्सच्या जोफ्रा आर्चरने पहिल्याच चेंडूत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सलामीवीर फिल सॉल्टला ध्रुव जुरेलकडून झेलबाद केले. त्यानंतर तिसऱ्या षटकांत आर्चरने देवदत्त पडिक्कलला लक्ष्य केले. शेवटचे वृत्त आले तेव्हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने ३ षटकांत दोन महत्त्वपूर्ण फलंदाज गमावित २ बाद ४६ धावा केल्या, त्यावेळी विराट कोहली नाबाद २२ धावांवर तर रजत पाटीदार शून्यावर खेळत होते.

राजस्थानचा कर्णधार रियान परागने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. फिल सॉल्ट व विराट कोहली ही सलामीची जोडी मैदानावर आली, परंतु जोफ्रा आर्चरचा जबरदस्त उसळणारा चेंडू आला, परंतु काय करावे, हेच सॉल्टला सुचत नव्हते. चेंडू मधल्या स्टंपवर होता व चेंडू सॉल्टच्या बॅटच्या हँडलजवळून गेला. जुरेलने सोपा झेल घेतला. (वृत्तसंस्था)

# भारताचे मंगोलियावर निर्भेळ वर्चस्व

## बिलि जीन किंग चषक टेनिस ● झिल देसाईचा पदार्पणात शानदार विजय

**◆ नवी दिल्ली, १० एप्रिल**

येथे सुरू असलेल्या बिली जीन किंग चषक टेनिस स्पर्धेच्या आशिया/ओशनिया गट-१ मधील लढतीत शुक्रवारी भारताने मंगोलियावर ३-० असा विजय मिळवित आपले निर्भेळ वर्चस्व सिद्ध केले. या सामन्यात भारताने केवळ एकच गेम गमावला. झिल देसाईने आपल्या बिली जीन किंग चषकात पदार्पणाच्या एकेरीच्या सामन्यात १५ वर्षीय अनु-विजिन गँटोरचा सरळ सेट्समध्ये पराभव केला, आणि त्यानंतर सहाजा यमलपल्लीनेही तिच्या पावलावर पाऊल टाकत विजय नोंदविला.




स्पर्धेत वर्चस्व गाजविणाऱ्या भारतीय महिला टेनिसपटू

डीएलटीए संकुलात झालेल्या या सामन्यात झिलने आपल्या प्रतिस्पर्ध्याचा अवघ्या ३७ मिनिटांत ६-०, ६-० असा धुव्वा उडविला. त्यानंतर सहाजानेही ३२ वर्षीय जर्गल अल्तान्सर्नाईचा ४२ मिनिटांत अगदी त्याच गुणफरकाने (६-०, ६-०) पराभव केला.

त्यानंतर, वैष्णवी अडकर व ऋतुजा भोसले या जोडीने खोंगोरझुल अल्दार्खिशिग व जर्गल अल्तान्सर्नाई या जोडीचा ६-१, ६-० असा सहज पराभव करीत भारताचा हा एकतर्फी विजय निश्चित केला.

स्पर्धेच्या अंतिम दिवशी, म्हणजेच शनिवारी, भारत आपला या स्पर्धेतील शेवटचा सामना कोरियाविरुद्ध खेळेल. बहुधा, यजमान भारत गट-१ मधील आपले स्थान कायम राखण्यात यशस्वी होईल. (वृत्तसंस्था)

# आयुष शेट्टी उपांत्य फेरीत

## आशिया बॅडमिंटन ● जोनाथन ख्रिस्टीवर मात

**◆ निंगबो, १० एप्रिल**

चीनमधील निंगबो येथे सुरू असलेल्या बॅडमिंटन आशिया स्पर्धेत भारताचा उदयोन्मुख खेळाडू आयुष शेट्टीने शुक्रवारी पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत चौथा विश्वमानांकित इंडोनेशियाच्या जोनाथन ख्रिस्टीचा २३-२१, २१-१७ अशा फरकाने पराभव करत भारतासाठी एका पदकाची निश्चिती केली.

२०२३ मध्ये जागतिक कनिष्ठ बॅडमिंटन स्पर्धेत कांस्यपदक जिंकणाऱ्या अवघ्या २० वर्षांच्या शेट्टीने या सामन्यात दडपणाखालीही विलक्षण संयम दाखवला. पहिल्या गेममध्ये त्याने प्रतिस्पर्ध्याचे दोन गेम पॉइंट्स वाचवले, स्वतः एक संधी गमावली; मात्र त्यानंतर २३-२१ अशा फरकाने हा गेम आपल्या नावी केला.

दुसऱ्या गेममध्ये दोन्ही खेळाडूंचे गुण अनेकदा बरोबरीत होते; परंतु नंतर आयुषने आपली आघाडी कायम राखली आणि ५४ मिनिटांत २१-१७ अशा गुणांनी सामना जिंकून घेतला. या विजयासह त्याने उपांत्य फेरीत जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या कुन्लावुत विटिडसर्नविरुद्धच्या लढतीची निश्चिती केली आहे.




या स्पर्धेत आतापर्यंत आयुषने एकही गेम गमावलेला नाही. यापूर्वीच्या दोन फेऱ्यांमध्ये त्याने जागतिक क्रमवारीत सातव्या क्रमांकावर असलेल्या चीनच्या ली शी फेंगचा, तसेच चीन तैपेईच्या ची यू जेनचा पराभव करून स्पर्धेतून त्यांना बाहेरचा रस्ता दाखवला होता.

या दौऱ्यादरम्यान ख्रिस्टी व शेट्टी यांच्यातील ही पहिलीच भेट होती. ख्रिस्टी हा आशियाई क्रीडा स्पर्धा तसेच आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता आहे. २०२० मध्ये थॉमस चषक जिंकणाऱ्या इंडोनेशियाच्या संघाचाही तो एक भाग होता.

यूएस ओपन सुपर ३०० स्पर्धेचा विद्यमान विजेता असलेल्या शेट्टीने, गुरुवारी अंतिम १६ च्या फेरीत चीन तैपेईच्या २० व्या क्रमांकावर असलेल्या ची यू जेनचा पराभव केला होता. (वृत्तसंस्था)

# चेन्नईची खाते उघडण्यासाठी धडपड

## सॅमसन, गायकवाडवर दडपण

**◆ चेन्नई, १० एप्रिल**

चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) या १९ व्या आयपीएल हंगामात आपल्या पहिल्या विजयाच्या शोधात आहे. शनिवारी येथे दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध होणाऱ्या सामन्यात अनुभवी सलामी जोडी असलेल्या संजू सॅमसन व ऋतुराज गायकवाडवर कामगिरी बजावण्याचा प्रचंड दबाव असेल.

तीन वेगवेगळ्या मैदानांवर तीन पराभव पत्करावे लागल्यामुळे सीएसकेने या हंगामाची सुरुवात अत्यंत निराशाजनक पद्धतीने केली आहे. प्रतिस्पर्धी संघांशी बरोबरीने स्पर्धा करायची असल्यास फलंदाजी असो वा गोलंदाजी, दोन्ही विभागांत लक्षणीय सुधारणा होणे गरजेचे आहे.

डेव्हाल्ड ब्रेव्हिसच्या अनुपस्थितीचाही संघाच्या संतुलनावर परिणाम झाला आहे. या आक्रमक दक्षिण आफ्रिकन फलंदाजाचे दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात दुखापतीतून सावरत पुनरागमन होण्याची अपेक्षा आहे. मात्र, महेंद्र सिंह धोनीच्या पुनरागमनाबाबत अद्याप कोणतीही स्पष्टता नाही. पोटरीच्या स्नायूंच्या दुखापतीमुळे धोनीला या हंगामात अद्याप एकही सामना खेळता आलेला नाही.



ऋतुराज गायकवाड



अक्षर पटेल

सीएसकेसाठी परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वीच, सॅमसन व गायकवाड या सलामी जोडीला आपली कामगिरी उंचावणे गरजेचे आहे.

मध्यक्रमात कार्तिक शर्मालाही आपली जबाबदारी ओळखून सरस कामगिरी करावी लागेल, तर तळाच्या फळीत प्रशांत वीरने चांगली कामगिरी केली आहे. या हंगामात सातत्यपूर्ण कामगिरी करणारा एकमेव फलंदाज म्हणजे सरफराज खान आहे. त्याला या हंगामात स्वतःला सिद्ध करून दाखवायचे आहे.

आरसीबीविरुद्धच्या सामन्यात सीएसकेच्या गोलंदाजांनी २५० धावा बहाल केल्या होत्या; ही धावसंख्या फलंदाजांसाठी गाठणे अत्यंत कठीण ठरले. खलील अहमदचा अपवाद वगळता, इतर सर्व गोलंदाजांनी प्रति षटक १२ किंवा त्याहून अधिक धावा दिल्या होत्या.

एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमच्या मैदानावर या हंगामातील हा दुसरा सामना असेल. ३ एप्रिल रोजी याच मैदानावर यजमान संघाविरुद्ध खेळताना पंजाब किंग्स संघाने २१० धावांचे लक्ष्य अगदी सहजपणे गाठले होते.

सीएसकेचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी होणार आहे. दिल्लीत दिल्ली कॅपिटल्सला गुजरात टायटन्सविरुद्ध एका धावेने पराभव पत्करावा लागला होता. मात्र आता अक्षर पटेलच्या नेतृत्वाखालील दिल्ली कॅपिटल्स संघाने अष्टपैलू कामगिरी करून सीएसकेला धूळ चारण्याचा दृढनिश्चय केला असेल. (वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**पंजाब किंग्स वि. सनरायझर्स हैदराबाद**
**स्थळ :** महाराजा यादविंद्र सिंग क्रिकेट स्टेडियम, मुल्लानपूर
**वेळ :** दुपारी ३.३० वाजतापासून

**चेन्नई सुपर किंग्स वि. दिल्ली कॅपिटल्स**
**स्थळ :** एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# पंजाब किंग्सची गाठ हैदराबादशी


**◆ मुल्लानपूर, १० एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये शनिवारी, एक जिगरबाज पंजाब किंग्स संघ स्टार खेळाडूंनी भरलेल्या, परंतु सातत्याचा अभाव असलेल्या सनरायझर्स हैदराबाद संघाविरुद्ध आत्मविश्वासाने मैदानात उतरेल.

या हंगामाची सुरुवात ज्या प्रकारे झाली आहे, ते पाहता; गेल्या सामन्यात पावसामुळे केकेआरसोबत गुण विभागून घ्यावे लागल्याने पंजाब किंग्सची नक्कीच निराश झाला असेल. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली पंजाब किंग्स संघाने एका विजयी संघाचे स्वरूप कसे असावे, याचा आदर्श घालून दिला आहे. मग तो पिवळ्या रंगाच्या चेन्नईच्या चाहत्यांच्या जनसागरात चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध २०० हून अधिक धावांचे लक्ष्य सहजपणे गाठण्याचा प्रसंग असो, किंवा मुल्लानपूरच्या कठीण खेळपट्टीवर माजी विजेत्या गुजरात टायटन्सवर मिळवलेला विजय असो.



श्रेयस अय्यर



ईशान किशन

ईडन गार्डन्सवर कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध सलग तिसरा विजय मिळवण्याच्या मार्गावर ते होते, ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज झेव्हियर बार्टलेटने त्यावेळी प्रतिस्पर्ध्यांची दाणादाण उडवून दिली होती. मात्र, मुसळधार पाऊस व वादळामुळे त्यांना यजमान केकेआर संघासोबत गुण विभागून घेण्यास भाग पडले. सलामीवीर आणि यष्टिरक्षक प्रभसिमरन सिंगने म्हटल्याप्रमाणे आमचा संघ ऑरेंज कॅप किंवा पर्पल कॅपच्या वैयक्तिक शर्यतीपेक्षा सांघिक यशावर अधिक लक्ष केंद्रित करीत आहे. प्रभसिमरनने ५०० हून अधिक धावांचा एक जबरदस्त हंगाम नुकताच गाजवला आहे.

हीच मानसिकता कूपर कॉनलीने गुजरात टायटन्सविरुद्ध केलेल्या नाबाद ७२ धावांच्या खेळीत व विजयकुमार वैशाकच्या गोलंदाजीतील वाढत्या प्रभावात दिसून येते.

मात्र, सनरायझर्स हैदराबादबद्दल असे म्हणता येणार नाही. स्फोटक फलंदाजी व मोठ्या धावसंख्येसाठी प्रसिद्ध असूनही, या हंगामात त्यांना अनेकदा अपयश आले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्या फलंदाजीच्या वरच्या फळीचे झालेले पतन आहे. ट्रॅव्हिस हेड व अभिषेक शर्मा ही धोकादायक सलामीची जोडी स्वस्तात बाद झाली होती.

त्यांच्या अडचणींमध्ये भर म्हणून, हैदराबादला हर्षल पटेल व जयदेव उनाडकटसारख्या गोलंदाजांकडून फारसा प्रभाव पाडता आलेला नाही. लखनौविरुद्धच्या सामन्यात नितीश कुमार रेड्डी व हेनरिक क्लासेनची फलंदाजी ही हैदराबादसाठी मोजक्याच सकारात्मक बाबींपैकी एक ठरली. फिरकी गोलंदाज हर्ष दुबेने पॉवरप्लेमध्ये आपल्या कौशल्याची झलक दाखवली आहे आणि तो आपला हाच फॉर्म पुढेही कायम राखेल, अशी अपेक्षा आहे.

जयदेव उनाडकटने गत सामन्यात २३ चेंडूंमध्ये ५० धावा दिल्या होत्या, त्यामुळे सौराष्ट्रचा हा धिप्पाड गोलंदाज आपल्या कामगिरीत सुधारणा करण्यास नक्कीच उत्सुक असेल. लखनौविरुद्धच्या सामन्यात, शेवटच्या षटकांत केवळ नऊ धावांचा बचाव करण्याचे कठीण आव्हान या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजासमोर होते, परंतु तो प्रतिस्पर्धी संघाला रोखण्यात अपयशी ठरला. (वृत्तसंस्था)

### भारतीय महिला फुटबॉल संघ केनियाविरुद्ध खेळणार

**नवी दिल्ली :** फिफा मालिका २०२६ अंतर्गत चार संघांचा समावेश असलेल्या या मैत्रीपूर्ण स्पर्धेत भारतीय महिला फुटबॉल संघ शनिवारी यजमान केनियाविरुद्ध सामना खेळणार आहे. या स्पर्धेच्या बाद फेरीत केवळ चारच संघांचा समावेश असल्याने, शनिवारी होणारा हा सामना वस्तुतः उपांत्य फेरीचाच सामना ठरतो.

# पंतने अधिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे : कैफ

**◆ नवी दिल्ली, १० एप्रिल**

यष्टिरक्षक-फलंदाजा ऋषभ पंतने आपल्या सामन्याच्या परिस्थितीचे भान ठेवण्यात सुधारणा केली पाहिजे व सातत्यपूर्ण निकालांसाठी अधिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे भारताचा माजी क्रिकेटपटू मोहम्मद कैफने म्हटले आहे.

गुरुवारी कोलकाता येथे झालेल्या एका थरारक सामन्यात लखनौ सुपर जायंट्सने कोलकाता नाईट रायडर्सवर शेवटच्या चेंडूवर तीन गडी राखून विजय मिळविला असूनही कैफने संघाचा कर्णधार ऋषभ पंतवर टीका केली आहे.

पंतची १० धावांची निराशाजनक खेळी आणि वरच्या फळीतील फलंदाजांची वाईट कामगिरी असूनही लखनौने विजय मिळवला. कठीण परिस्थितीतून मुकुल चौधरीने ठोकलेल्या षट्कारांनी भरलेल्या अर्धशतकामुळे हा विजय शक्य झाला.



ऋषभ पंत



मोहम्मद कैफ

पंतची कामगिरी आतापर्यंत लहरी राहिली आहे; त्याने खेळलेल्या तीन सामन्यांपैकी एका सामन्यात अर्धशतक झळकावले असले, तरी उर्वरित दोन सामन्यांमध्ये त्याने सरासरीपेक्षा कमी धावा केल्या आहेत. पंतसारख्या अनुभवी खेळाडूने धावांचा पाठलाग करताना शेवटपर्यंत फलंदाजी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे व आपली विकेट सहज गमावता कामा नये, असे कैफने म्हटले आहे. लखनौ संघाला पंतची शेवटपर्यंत मैदानावर थांबण्याची गरज होत. तो एक अनुभवी खेळाडू आहे, तो २०१६ पासून आयपीएलमध्ये खेळत आहे. जेव्हा तो फलंदाजीला आला, तेव्हा परिस्थिती फारशी कठीण नव्हती. लखनौ संघाने पहिल्या पाच षटकांतच ४१ धावा केल्या होत्या. एका फलंदाजाने जबाबदारी स्वीकारून धावांचा पाठलाग पूर्ण होईपर्यंत फलंदाजी करणे अपेक्षित होते. ती भूमिका पंतने पार पाडणे गरजेचे होते, असेही त्याने सांगितले. एक कर्णधार म्हणून, जर तुम्ही जबाबदारी स्वीकारली नाही, तर तुम्ही तुमच्या संघाला सामने जिंकवून देऊ शकत नाही, असे कैफ शेवटी म्हणाला. (वृत्तसंस्था)

# मालप स्पोर्ट्स् नर्सरीची १५ एप्रिलपासून सुरुवात

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

गेल्या ४0 वर्षांपासून क्रीडा क्षेत्रात योगदान देणाऱ्या मालप परिवाराच्या वतीने १५ एप्रिलपासून 'मालप स्पोर्ट्स नर्सरी' या उपक्रमाला सुरुवात होत असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे क्रीडा संकुल येथे हे प्रशिक्षण दररोज सायंकाळी ५ ते ६:३0 वाजेपर्यंत राष्ट्रीय खेळाडू सुदेश मालप, सुनील मालप यांच्यासह आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रेयस मालप, श्वेतांबरी मालप होमकर आणि निलेश गायकवाड हे प्रशिक्षण देणार आहेत या स्पोर्ट्स नर्सरीमध्ये ३ ते १२ वयोगटातील मुला-मुलींना प्रवेश दिला जाणार आहे. मुलांना खेळाची प्राथमिक गोडी लागावी आणि त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. अधिक माहितीसाठी ९८५0१२८८७७, ७५८८२१४६८१ किंवा ९५५२७४५७४४ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

**या क्रीडा प्रकारांचे मिळणार प्रशिक्षण**

नर्सरीमध्ये १२ प्रकारचे क्रीडा प्रकार आणि उपक्रम राबविले जाणार आहेत. यामध्ये क्रिकेट (लेदर व टेनिस बॉल), ॲथलेटिक्स, एअर रायफल शूटिंग, व्हॉलीबॉल, डॉज बॉल, हँडबॉल, टेबल टेनिस, योगासने, प्राणायाम व ध्यान, तलवारबाजी (फेन्सिंग), फुटबॉल आणि आठवड्यातून एकदा घोडसवारी अशा विविध खेळांचा समावेश आहे.

### बुद्धिबळ प्रशिक्षण शिबिर १४ एप्रिलपासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

सोलापुरात १४ ते २२ एप्रिल तसेच १ ते ८ मे दरम्यान दररोज दुपारी ४ ते ८ या वेळेत जुळे सोलापूर, एम्प्लॉयमेंट चौक, अशोक चौक, भद्रावती पेठ आदी शहरातील विविध ठिकाणी चॅम्प चेस स्कूल व सोलापूर चेस अकॅडेमी यांच्या वतीने बुद्धिबळ प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंसह ४ ते १५ वर्षे वयोगटातील नवोदित व उदयोन्मुख खेळाडूंसाठी उपयुक्त ठरणार आहे. शिबिरादरम्यान सहभागी खेळाडूंकरिता स्पर्धेचे आयोजनही करण्यात येणार असून, स्पर्धेतील प्रथम तीन विजेत्यांना आकर्षक पदक देऊन गौरविण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक खेळाडूंनी अकॅडेमीचे मुख्य व राष्ट्रीय प्रशिक्षक सुमुख गायकवाड (मो. ८८३0४३२१८४), उदय वगरे (मो. ८८८८0४५३४४) यांच्याशी संपर्क साधावा, असे अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी सांगितले.

# रॉयल्स, गुलमोहर संघ उपांत्य फेरीत

## इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग: प्रमोद मंगलपल्ली, प्रेम राठोड सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

'इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग'च्या १६ व्या पर्वात गुरुवारी झालेल्या चुरशीच्या सामन्यांमध्ये 'रॉयल्स' आणि ' गुलमोहर के.के.' या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियम (रेल्वे मैदान) येथे सुरू असलेल्या या स्पर्धेतील पहिल्या उपांत्यपूर्व सामन्यात रॉयल्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. रॉयल्सने १५ षटकांत २ बाद १५९ धावांचा डोंगर उभा केला.

यामध्ये सचिन वांगीकर (४६ धावा) आणि महेश आरनाळ (४३ धावा) यांनी उत्कृष्ट फलंदाजी केली. प्रत्युत्तरादाखल खेळताना मॉडर्नचा संघ १४.२ षटकांत १0९ धावांत सर्वबाद झाला. प्रमोद मंगलपल्लीने भेदक गोलंदाजी करत ४ बळी घेतले, ज्यामुळे रॉयल्सने हा सामना ५१ धावांनी जिंकला.



प्रमोद मंगलपल्ली

दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात गुलमोहर के.के. संघाने नाणेफेक जिंकून फलंदाजी स्वीकारली आणि १५ षटकांत ७ बाद १0८ धावा केल्या. प्रेम राठोडने ६२ धावांची झंझावाती खेळी केली. या आव्हानाचा पाठलाग करताना शिवशंभू संघाला १५ षटकांत ७ बाद १0१ धावांपर्यंतच मजल मारता आली. अटीतटीच्या झालेल्या या सामन्यात गुलमोहर संघाने ७ धावांनी विजय मिळवला.



प्रेम राठोड

**संक्षिप्त धावफलक:**

**रॉयल्स:** १५ षटकांत २ बाद १५९ धावा. (सचिन वांगीकर ४६, महेश आरनाळ ४३, बालाजी बोल्ली ३६. अंबादास तोरा १/१६, अब्दुल पिरजादे १/२६) **विजयी विरुद्ध मॉडर्न:** १४.२ षटकांत सर्वबाद १0९ धावा. (अंबादास तोरा १८, हाजी तांबोळी १८, युनूस खान १६. प्रमोद मंगलपल्ली ४/१८, प्रशांत भट्ट १/५). सामनावीर: प्रमोद मंगलपल्ली (४ बळी)

**गुलमोहर :** १५ षटकांत ७ बाद १0८ धावा. (प्रेम राठोड ६२, संदीप लटवकर १५. अनिरुद्ध अक्कलकोटी ४/२३, अनिल पटेल १/२४) **विजयी विरुद्ध शिवशंभू:** १५ षटकांत ७ बाद १0१ धावा. (संदीप वाघमारे २६, अनिरुद्ध अक्कलकोटी २६, अनिल पटेल २१. गोलंदाजी: प्रेम राठोड १/२४, प्रेम सानुपुर १/२१). सामनावीर: प्रेम राठोड (६२ धावा आणि १ बळी).

**असे होणार उपांत्य सामने :**
**थंडर्स विरुद्ध गुलमोहोर**
**समर्थ इलेव्हन विरुद्ध रॉयल्स**

# के.पी.क्रिकेट अकादमीची संचिता सपाटे सलग चौथ्यांदा महाराष्ट्र संघात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १0 एप्रिल-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १७ वर्षाखालील क्रिकेट संघात येथील के.पी. क्रिकेट अकादमीच्या संचिता सपाटे हिची अष्टपैलू खेळाडू म्हणून निवड झाली आहे. सलग चौथ्यांदा ती महाराष्ट्र संघातून खेळत आहे.

यापूर्वी संचिता २३-२४ मध्ये एम.सी.ए.च्या पंधरा वर्षाखालील संघात तसेच २४-२५ मध्ये हरीभाई देवकरण प्रशालेकडून खेळताना विभागीय स्पर्धेतील उत्कृष्ट प्रदर्शनामुळे तिची १७ वर्षाखालील शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी तर २४-२५ व २५-२६मध्ये आणि आता दुसऱ्यांदा सतरा वर्षाखालील संघात तिची निवड झाली आहे. हे सामने मुंबई येथे होणार असून या स्पर्धेचे यजमानपद मुंबईकडे आहे.



संचिता सपाटे

या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र, सौराष्ट्र, मुंबई, गुजरात व बडोदा असे पाच बलवान संघ आहेत. महाराष्ट्राचा पहिला सामना यजमानपद बलाढ्य मुंबई संघाशी होणार आहे.

संचिता ही ऑफ स्पिनर गोलंदाज व मधल्या फळीतील फलंदाज आहे. पुणे येथे झालेल्या निमंत्रित क्रिकेट कामगिरीवर तिची निवड झाली आहे. तिला के. पी. क्रिकेट अकादमीचे प्रशिक्षक प्रकाश कंपली यांचे मार्गदर्शन लाभले.

# शहरातील गॅस वितरण प्रणालीत सुधारणा

## आखातात युध्दविराम झाल्याचा परिणाम;
## सिलेंडरचा पुरवठा होणार लवकरच सुरळीत
## जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

सोलापूर शहर-जिल्ह्यात सध्या व्यावसायिक सिलेंडरचा कोठेही तुटवडा नाही. सद्यपरिस्थितीत आखाती युध्दाचा युध्दविराम झाल्यामुळे गॅस वितरणाची परिस्थिती सुधारत आहे. व्यावसायिक गॅस उपलब्धतेमुळे हॉटेल व्यावसायिक यांना देखील सिलेंडरचा पुरवठा सुरळीत होत आहे. यामुळे आगामी आठवड्यात अजून गॅस वितरण प्रणालीम



ध्ये मोठी सुधारणा होण्याचे संकेत आज (दि. १०) जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्तिकीयन यांनी दि. १० एप्रिल रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी व HPCL, BPCL, IOCL सेल्स ऑफिसर यांची आढावा बैठक घेऊन जिल्ह्यातील घरगुती व व्यावसायिक एलपीजी याच्या वितरणाबाबत आढावा घेतला. सदर आढावा बैठकीमध्ये पुढील प्रमाणे चर्चा करणेत आली. केंद्र शासनाने शिल्लक व्यवसाय गॅस सिलेंडरच्या वाटपाचे राज्य शासनास अधिकार दिले आहेत. त्यास अनुसरून शासनाकडील दि. ०८ एप्रिल २०२६ रोजी जारी करणेत आलेल्या प्राधान्यक्रमानुसार व्यावसायिक सिलेंडर करिता ७०% ची मर्यादा ठरवून देण्यात आलेली आहे. त्यानुसार संबंधित कंपनीने गॅस पुरवठा देण्यास सुरुवात केलेली आहे. ज्या व्यावसायिकाकडे कमर्शियल कनेक्शन नाही त्यांनी जवळच्या एजन्सीकडे जाऊन व्यावसायिक सिलेंडरची नोंदणी करावी.)



### ग्राहकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये

सध्या व्यावसायिक सिलेंडरचा कोठेही तुटवडा नाही. सद्यपरिस्थितीत आखाती युध्दाचा युध्दविराम झाल्यामुळे गॅस वितरणाची परिस्थिती सुधारत आहे. व्यावसायिक गॅस उपलब्धतेमुळे हॉटेल व्यावसायिक यांना देखील सिलेंडरचा पुरवठा सुरळीत होत आहे. तसेच अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्याकडील पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचनेप्रमाणे घरगुती एलपीजी गॅस पुरवठा सुरळीत करणेकामी सोलापूर जिल्हयातील सर्व गॅस एजन्सींना त्यांचे एजन्सीसमोर खालीलप्रमाणे फलक लावणेबाबत सूचना करणेत आली. यामध्ये गॅस एजन्सी अथवा गोडाऊन मधून गॅस सिलेंडरची विक्री करण्यात येत नाही, सर्व ग्राहकांना सिलेंडर घरपोच पुरविण्यात येत आहे, ग्राहकांनी एजन्सी अथवा गोडावून समोर रांगा लावू नयेत, गॅस सिलेंडरचे वितरण केवळ ऑनलाईन बुकींग नंतर OTP प्रणालीद्वारेच करण्यात येते. राज्यात तसेच एजन्सीमध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा आहे, यामुळे ग्राहकांनी कृपया अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही आवाहन जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी केले आहे.

## महत्वाचे...



### नगराध्यक्षा डॉ. भालके यांनी केली आंबेडकर स्मारक, महात्मा फुले पुतळा परिसराची पाहणी

**पंढरपूर, दि. १० एप्रिल-**

महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरच्या नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता भालके यांनी दोन्ही महापुरुषांच्या स्मारकाची पाहणी केली. यावेळी मुख्याधिकारी महेश रोकडे, नगर अभियंता प्रकाश केसकर, नगरसेवक विनायक देवमारे, मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष अभिराज उबाळे, उपाध्यक्ष विशाल मांदळे, कार्याध्यक्ष महेश मोटे उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिवशी मोठ्या प्रमाणात महिला भगिनी अभिवादन करण्यासाठी येत असतात. मात्र या ठिकाणी स्वच्छतागृहाची सोय नसल्याचे दिसून आल्यानंतर नगराध्यक्ष भालके यांनी तात्काळ सुसज्ज असे स्वच्छतागृह आणि भंतेजी यांच्या राहण्यासाठी दोन स्वतंत्र खोल्या बांधण्याच्या सूचना दिल्या. पंढरपूर नगरपालिकेच्या वतीने महात्मा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या नूतनीकरणासाठी किंवा दुरुस्तीसाठी कुठलाही निधी कमी पडू देणार नसल्याचे आश्वासन यावेळी त्यांनी दिले.



### धनगर समाजाच्यावतीने जि.प. अध्यक्ष, उपाध्यक्षांचा सत्कार

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी मार्डी गावचे भाचे दिपक वैद्य आणि गावचे सुपूत्र इंद्रजीत पवार यांची निवड झाल्याबद्दल धनगर समाजाच्या वतीने बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत व भाजपाचे नेते शहाजी पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दरम्यान, धनगर समाजात पहिल्यांदा वैद्यकीय क्षेत्रात पदव्युत्तर पदवी मिळविण्याचा मान पटकविल्याबद्दल सोनाली हनुमंत बनसोडे या विद्यार्थिनीचाही यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी आमदार राजेंद्र राऊत, भाजपा नेते शहाजी पवार, उत्तर सोलापूरच्या सभापती तेजस्विनी बोराडे, नान्नज गटातील जि.प.सदस्या चैताली मुळे, माजी उपसरपंच युवराज पवार, ॲड. रवींद्र वैद्य, जि.प.अध्यक्ष वैद्य यांचे मामा हनमंत बनसोडे, बाळासाहेब पाटील, नामदेव गवळी, विशाल मार्तंडे, नानासाहेब पवार, बिरुदेव बनसोडे, हनमंत मिसाळ, बाळकृष्ण भोगे, अक्षय बनसोडे, श्रीकांत बनसोडे, योगेश्वरी बनसोडे, सौंदर्या बनसोडे, यावेळी उपस्थित होते. सभापती तेजस्विनी बोराडे, जि.प.सदस्या चैताली मुळे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. पत्रकार दत्ता मोकाशी यांनी सूत्रसंचालन केले.



### शिवणे येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

**सांगोला, दि. १० एप्रिल-**

तहसिल कार्यालय, सांगोला अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर शुक्रवार दि.१० एप्रिल रोजी शिवणे येथील मुक्ताई मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आले होते. शिबीरास तहसीलदार बाळुताई भागवत, गट विकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, स्मिता गोडसे, मोहन आलदर, बाळासाहेब काटकर, दादासाहेब घाडगे उपस्थित होते. सदर शिबीरामध्ये ७२ फेरफार निकाली काढणेत आले. ७/१२ दुरुस्ती संदर्भात १ अर्ज स्विकारण्यात आला. १०२ डिजिटल ७/१२, ३५ ८ अ उतारे, ७५ प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आले. तसेच तालुका कृषि अधिकारी या विभागाअंतर्गत मंजुर शेती अवजारे व ट्रॅक्टर यांचे मंजुरीचे ५ प्रमाणपत्र व ग्राम विकास विभागाकडून मंजूर घरकुलाचे आदेश वितरित करण्यात आले.

# पंढरपुरात निर्भया पथकाने बालविवाह रोखला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० एप्रिल -**

पंढरपूर शहर हद्दीत होत असलेला एक बालविवाह निर्भया पथकाने तातडीने कारवाई करून रोखला. सहायक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली.

एका अल्पवयीन मुलीचा विवाह २७ वर्षीय तरुणाशी होत असल्याचे समोर आले. निर्भया पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत चौकशी केली. सुरुवातीला मुलीच्या नातेवाइकांनी खोटे आधार कार्ड दाखवत तिचे वय १८ वर्षे पूर्ण असल्याचे सांगितले. मात्र पोलिसांनी सखोल चौकशी करत संबंधित शाळेतून बोनाफाईड प्रमाणपत्र मागविले असता, मुलीचे वय केवळ १५ वर्षे ३ महिने असल्याचे स्पष्ट झाले.



यानंतर पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून विवाहस्थळीच मुलीच्या आई-वडिलांना समज देत बालविवाह रोखला. संबंधित अल्पवयीन मुलीस पुढील कारवाईसाठी बाल कल्याण समिती, सोलापूर यांच्यासमोर हजर करण्यात आले. दरम्यान ही कारवाई सहायक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे व निर्भया पथकाच्या प्रमुख पोलिस उपनिरीक्षक सुप्रिया यादव (रावण), पो.कॉ.सावंत, कुचेकर, टिंगरे व वाघमारे यांनी पार पाडली.

### माहिती देण्याचे पोलिसांकडून आवाहन

आपल्या परिसरात किंवा नातेवाइकांमध्ये अशा प्रकारचे बालविवाह होत असल्यास तात्काळ माहिती द्यावी. अशा बेकायदेशीर कृत्यांवर प्रचलित कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, तसेच कोणाचीही गय केली जाणार नाही, असा इशाराही पोलिसांनी यावेळी दिला.



### डिजिटल मीडियाच्या अधिवेशनासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांना निमंत्रण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या वतीने गोवा येथे आयोजित करण्यात येत असलेल्या तिसऱ्या राष्ट्रीय अधिवेशनानिमित्त राज्याचे ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांना निमंत्रण पत्रिका देण्यात आली. गेल्या पाच वर्षांपासून डिजिटल मीडिया क्षेत्रात अविरत कार्यरत असलेली ही संघटना आता राष्ट्रीय स्तरावर पोहोचली आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, दिल्ली, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या सात राज्यांत विस्तारलेल्या या संघटनेचे तब्बल १५ हजारांहून अधिक सक्रिय सभासद आहेत. संघटनेचे तिसरे राष्ट्रीय अधिवेशन पणजी (गोवा) येथे पार पडणार असून, या अधिवेशनासाठी प्रमुख मान्यवरांपैकी एक म्हणून ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना निमंत्रित करण्यात आले आहे. यावेळी संघटनेचे राज्य महासचिव विकास भोसले, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष धनंजय पानसांडे, सहसचिव लिंगराज साखरे, सातारा जिल्हाध्यक्ष संतोष शिराळे, जिल्हा उपाध्यक्ष फिरोज तांबोळी, जिल्हा संपर्कप्रमुख एकनाथ वाघमोडे, म ाण तालुकाध्यक्ष नितीन वाघमोडे, खजिनदार संदीप जठार यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.



### बसवेश्वर जयंतीनिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

विश्वगुरू महात्मा बसवेश्वर जयंती महोत्सवाचे औचित्य साधून, 'बसव सेंटर' च्या वतीने यंदाही निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दोन स्वतंत्र गटांमध्ये होणार आहे.

स्पर्धेचे गट आणि विषय: १. प्रौढ महिला गट: विषय - 'युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर' (शब्द मर्यादा: ६००) २. महाविद्यालयीन विद्यार्थी गट: विषय - 'महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक कार्य' (शब्द मर्यादा: ५००) या स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही. स्पर्धकांनी आपले निबंध मराठी भाषेत, सुवाच्य हस्ताक्षरात किंवा डीटीपी करून सादर करणे आवश्यक आहे. दोन्ही गटांतील प्रथम तीन विजेत्यांना रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. प्रौढ महिला गटासाठी ७००, ५०० आणि ३०० रुपये, तर विद्यार्थी गटासाठी ५००, ३०० आणि २५० रुपये अशी बक्षिसे ठेवली आहेत. इच्छुकांनी आपले निबंध २२ एप्रिलपर्यंत बाबासाहेब कुलकर्णी (कार्याध्यक्ष), ३९, बुधवार पेठ, लिंगशेट्टी मंगल कार्यालयाजवळ या पत्त्यावर सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत स्वतः किंवा पोस्टाने जमा करावेत. अधिक माहितीसाठी अध्यक्ष राजेंद्र मायनाळ (९९२२९१२४३४) यांच्याशी संपर्क साधावा.

# उपळे दुमाला येथे समाधान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० एप्रिल-**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, उपळे दुमाला यांच्यावतीने जि.प. प्राथमिक शाळा, उपळे दुमाला येथे समाधान शिबीर घेण्यात आले. यावेळी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरामध्ये ईसीजी, बीपी, शुगर, हिमोग्लोबिन तपासणी तसेच इतर सर्वसाधारण आरोग्य तपासण्या मोफत करण्यात आल्या. नागरिकांना औषधांचे मोफत वाटप करण्यात आले.

बार्शी तहसीलदार यांनी स्वतः उपस्थित राहून बीपी व शुगर तपासणी करुन घेतली व उपक्रमात सहभाग नोंदविला. आरोग्य अधिकारी डॉ. अनिता बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. उपळे (दु) येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. संगीता कुलांगे (ढगे) तसेच नवनियुक्त वैद्यकीय अधिकारी डॉ. मयूर उकीरडे यांच्या उपस्थितीत शिबीर पार पडले. या उपक्रमात आरोग्यसेवक वैभव धर्मे यांनी नागरिकांना तपासणीसाठी मार्गदर्शन केले. यावेळी आरोग्य सहाय्यक शंकर काळे व आरोग्य सहाय्यिका ज्योती मैंदर्गी यांनी कार्यक्रमाचे पर्यवेक्षण करुन शिबीर पार पाडण्यासाठी मोलाची भूमिका बजावली. प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी



मीना जाधव तसेच समुदाय आरोग्य अधिकारी संग्राम गायकवाड, रवी दळवे, रोहिणी शार्दुल, अंजुम शेख यांनी नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यावेळी आशा गटप्रवर्तिका सुनिता माने व नसीमा डोंगरे यांनी आयुष्यमान भारत कार्ड काढून नागरिकांना वाटप केले. तसेच आशासेविका सुप्रिया गायकवाड, वनमाला सुरवसे, वैशाली शेंडगे, प्रतीक्षा जाधव, विमल माळी, सुजाता कसबे, वाहनचालक नामदेव जाधव यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमासाठी परिचर पृथ्वीराज कांबळे यांचे सहकार्य लाभले.

# आरोपीचे म्हणणे न ऐकता तक्रारीची दखल; सत्र न्यायालयाकडून आदेश रद्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

येथील एसआरएलऑईल इंडिया कंपनीचे संचालक श्रीकांत सुरेंद्र लड्डा, वय-३९वर्षे, तसेच महालक्ष्मी ट्रेडींग कंपनीचे प्रो.प्रा. लक्ष्मीकांत सुरेंद्र लड्डा (वय-४०) दोघेही (रा. नाकोडा युनिटी सोलापूर) या व्यापाऱ्यांवर जीएसटी कार्यालय सोलापूर यांचेकडून जानेवारी २०२५ मध्ये बोगस आयटीसी घेतल्याच्या संशयावरुन कारवाई झाली होती. सदर प्रकरणात जीएसटी कार्यालय सोलापूर यांनी एस.आर.एल. ऑईल इंडिया प्रा.लि. व महालक्ष्मी ट्रेडींग कंपनीच्या विरोधात सोलापूर येथील प्रथम वर्ग न्यायाधीश यांचे कोर्टात खाजगी फिर्याद दाखल करुन एस.आर.एल. ऑईल इंडिया प्रा.लि. या कंपनीने रक्कम रु.२१.२० कोटीचा बोगस आयटीसी तसेच महालक्ष्मी ट्रेडींग यांनी रक्कम रु.१३.२९ कोटीचा बोगस आयटीसी घेतल्याचा आरोप ठेवला आहे.



सदर प्रकरणात सोलापूर येथील प्रथम वर्ग न्यायाधीश यांचे कोर्टाने सदर फिर्यादीची दखल घेऊन आरोपींविरुध्द प्रोसेस इश्यू चा आदेश पारित केलेला होता. सदर आदेशाच्या विरोधात आरोपींनी ॲड. गुरुदत्त बोरगांवकर यांचेमार्फत सोलापूर येथील सत्र न्यायालयामध्ये पुर्नविचार याचिका दाखल केलेली होती. सदर याचिकेची सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री.पी.पी. राजवैद्य यांचे कोर्टासमोर झाली. सदर प्रकरणाच्या सुनावणीवेळी प्रथम वर्ग न्यायालयाने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या तरतुदीप्रमाणे आरोपीस म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही त्यामुळे सदरचा आरोपीविरुध्द गुन्ह्याची दखल घेणारा आदेश हा कायद्यास अनुसरुन नाही, तो आरोपींच्या हक्कावर गदा आणणारा आहे. त्यामुळे सदरचा आदेश रद्द करुन आरोपीस प्रथमवर्ग न्यायालयासमोर म्हणणे दाखल करण्याची संधी द्यावी,असा युक्तीवाद केला तसेच त्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे दिले. सदरचा युक्तीवाद ग्राहय धरुन मे. कोर्टाने आरोपीस प्रथम वर्ग न्यायाधीश यांचा आरोपीविरुध्द गुन्ह्याची दखल घेणारा आदेश रद्द करुन खटल्याची नव्याने सुनावणी घेण्यात यावी व आरोपीस म्हणणे मांडण्याची संधी द्यावी असा आदेश पारीत केला. सदर प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. गुरुदत्त बोरगांवकर, ॲड. देवदत्त बोरगांवकर, ॲड. शिवानी करवा, ॲड. निकिता कुलकर्णी, जी.एस.टी.कार्यलयच्या ॲड. महेश झंवर यांनी काम पाहिले.

# दिवसा अवकाशात दिसणारे तारे पाहून विद्यार्थी झाले अचंबित

## द. ह. कवठेकर प्रशालेतील विद्यार्थ्यांना देण्यात आली खगोलशास्त्रीय माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० एप्रिल-**

पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या द. ह.कवठेकर प्रशालेत पुणे रोटरी क्लबचे पदाधिकारी धनंजय राजुरकर यांच्या सहकार्याने व पोलाद स्टील कंपनी यांच्या सीएसआर फंडाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांसाठी आकाश दर्शन, ग्रह तारे, खगोलशास्त्रीय माहितीचा कार्यक्रम डोमच्या माध्यम ातून प्रशालेत आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात आकाशातून दिसणारे पृथ्वीचे विलोभनीय दर्शन, पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालणारा चंद्र, लाल रंगाचा मंगळ, आपल्या कड्यांनी वेढलेला विलोभनीय शनी, सूर्याच्या जवळून भ्रमंती करणारा बुध, तेजस्वी दिसणारा शुक्र, युरेनस, नेपच्यून आधी ग्रह व विविध प्राण्यांच्या नावावरून



ओळखले जाणारे तारका समूह यांचे जणू प्रत्यक्ष दर्शनच या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लाभले. यावेळी तारे ग्रह यांची मराठी भाषेत माहिती देण्यात आली. हे सर्व पाहून विद्यार्थ्यांच्या (बाल चमुंच्या) डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले.

दरम्यान कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांचे स्वागत करून प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.एम.कुलकर्णी यांनी केली यावेळी पर्यवेक्षक आर.एस. कुलकर्णी, शेलार, ज्येष्ठ शिक्षक खजूरगे, गावडे आणि अहिल्या पवार आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक व्ही.एम. कुलकर्णी यांनी या प्रोजेक्ट बद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. रोटरी क्लबचे सदस्य धनंजय राजुरकर, कवठेकर प्रशालेचे शिक्षक चंद्रशेखर राजुरकर व पोलाद स्टील कंपनी यांचे कार्यकारी अधिकारी व संयोजक यांचे प्रशालेच्या वतीने आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी संस्थेचे मानद सचिव एस. आर. पटवर्धन यांचे सहकार्य लाभले. याकामी तंत्रज्ञ गणेश मेणसे व धनराज मेणसे यांचे सहकार्य लाभले.

### एक हजार ५०० विद्यार्थी घेणार लाभ

येथील द. ह. कवठेकर प्रशाले मध्ये दोन दिवस या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशालेचे सुमारे १ हजार ५०० विद्यार्थी या कार्यक्रमाचा लाभ घेणार असल्याची माहिती प्रशालेच्या वतीने मुख्याध्यापक व्ही.एम. कुलकर्णी यांनी दिली.

## निधन वृत्त...

### इंदुमती कल्याणशेट्टी



**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

दमाणी नगर येथील रहिवासी श्रीमती इंदुमती शिवप्पा कल्याणशेट्टी (वय ८६) यांचे आज शुक्रवार दि. १० एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन सुना, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

### राजीव काटे



**सोलापूर दि.१० एप्रिल-**

येथील राघवेंद्र नगर विजापूर रोड सैफुल येथील रहिवासी राजीव विठ्ठल काटे (वय ६२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, दोन भाऊ दोन बहिणी, नातवंडे असा परिवार आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरचे प्रमुख कार्यवाह प्रा. जोतिबा काटे व पोलीस उपनिरीक्षक हेमंत काटे यांचे ते ज्येष्ठ बंधू होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# रे-नगर गृहप्रकल्पातील वीज जोडणीचा प्रश्न मार्गी

- ५०० रुपयांत जोडणीची हमी
- खंडित वीजपुरवठा तात्काळ सुरु करा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मौजे कुंभारी येथे विडी कामगार महिलांसाठी उभारण्यात आलेल्या रे नगर गृहप्रकल्पातील सदनिकाधारकांना पुर्वीप्रमाणे ५०० रुपयांत नवीन वीज जोडणी दिले जाणार असल्याची ग्वाही 'महावितरण'कडून देण्यात आली.

त्यामुळे या गृहप्रकल्पातील वीज जोडणीचा प्रश्न मार्गी लागल्याचे सांगण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत रे नगर फेडरेशनच्या वतीने मौजे कुंभारी येथे तब्बल ३० हजार सदनिका उभारण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला. त्यापैकी सध्या १५ हजार ००४ सदनिका पूर्ण झाली असून अनेक लाभार्थी वास्तव्यासही आले आहेत.

लाभार्थ्यांना केवळ ५०० रुपयांत नवीन वीज जोडणी देण्यात येणार असल्याचा आदेश जारी करण्यात आला होता. 'महावितरण' ने ६ नोव्हेंबर २०२३ रोजी जारी केलेल्या आदेशान्वये प्रति जोडणी प्रक्रिया शुल्क १२० रुपये, त्यावर १८ टक्के जीएसटी आणि ३८० रुपये सुरक्षा ठेव अशी एकूण ५०० रुपयांची रक्कम निश्चित करण्यात आली होती. मात्र, वीज वितरण कंपनीकडून वाढीव दराने वीज जोडणीची मागणी केली जात असल्याचे निदर्शनास आले. रे नगर गृहनिर्माण प्रकल्पातील गट क्रमांक ७६४, ७५५, ७२१, ७२२-२३, ७२६, ६९७ व ७०७ मधील लाभार्थ्यांना घरे हस्तांतरित करण्यात आली आहेत. मात्र, या भागातील वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे सदर वीजपुरवठा तात्काळ सुरळीत करण्यात यावी, पुर्वी प्रमाणे ५०० रुपयांत नवीन वीज जोडणी द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

माजी आमदार नरसय्या आडम यांच्या नेतृत्वाखाली 'महावितरण'चे अधीक्षक अभियंता सुनील माने यांच्याकडे यासंदर्भात निवेदन सादर करण्यात आले. या शिष्टमंडळात युसुफ शेख, दाऊद शेख, नरेश दुगाणे, वीरेंद्र पद्मा, पांडुरंग म्हेत्रे आदींचा समावेश होता. दरम्यान, ५०० रुपयांत वीज जोडणी दिले जाणार असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

# 'पहाट उपक्रम' अंतर्गत बोअरवेल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

मुळेगाव तांडा येथे दरवर्षी जाणवणाऱ्या तीव्र पाणीटंचाईला अखेर दिलासा मिळाला आहे. पोलीस प्रशासनाच्या पहाट उपक्रमांतर्गत येथे नवीन बोरवेलची निर्मिती करून ग्रामस्थांसाठी पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सोय करण्यात आली.



सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी गावभेटीदरम्यान मुळेगाव तांड्यातील पाण्याची गंभीर समस्या लक्षात घेतली होती. त्यानंतर त्यांनी पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांना तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. देशपांडे यांनी पुढाकार घेत नागपूरस्थित बेरार फायनान्स लिमिटेड या कंपनीशी संपर्क साधला. कंपनीने आपल्या उडठ फंडातून बोरवेल उभारण्यास सकारात्मक प्रतिसाद दिला. ग्रामपंचायत आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नातून हा प्रकल्प पूर्णत्वास गेला. या बोरवेलचे उद्घाटन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी त्यांनी ऑपरेशन परिवर्तन आणि पहाट उपक्रमांद्वारे गावातील अवैध हातभट्टी दारू व्यवसाय करणाऱ्यांना पर्यायी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळकर, तसेच बेरार फायनान्सचे प्रतिनिधी संदीप जावंजळ, अभिजित महाजन, अशिष राठी, सतीश पोहाडरे व आशुतोष दुबे यांची उपस्थिती होती.

**औषधी वनस्पती लागवडीचा नवा उपक्रम**

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पर्यावरण संवर्धनाचा मुद्दा मांडत गावागावांत औषधी वनस्पती लागवडीचा उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला. त्यास मुळेगाव तांडा ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत तब्बल १ एकर जमीन उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शवली.

# अनधिकृत पुतळे, स्मारके, ध्वजस्तंभ उभारल्यास कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी एक परिपत्रक जारी काढून सार्वजनिक ठिकाणी पुतळे, स्मारके व ध्वजस्तंभ उभारणीसंदर्भात शासन नियमांचे पालन करण्याचे आदेश दिले आहेत. अनधिकृत उभारणीवर तात्काळ कारवाई करून कायदा व सुव्यवस्था राखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

अनधिकृत पुतळा उभारणीची पूर्वकल्पना न दिल्यास संबंधित ग्रामपंचायत सदस्यांविरुद्ध अपात्रतेचा प्रस्ताव गटविकास अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर करावा असेही आदेश काढले आहेत.

अनधिकृत पुतळा काढण्याबाबत मार्गदर्शक सूचनांमध्ये माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी, पोलीस अधिकारी, तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी एका तासात संयुक्त भेट देऊन चार तासांत पुतळा हटवावा, जागेच्या मालकीची निश्चिती न करता कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तात्काळ कारवाई करावी, पुतळा बसविणाऱ्यांची माहिती मिळविण्यासाठी व्हिडीओग्राफी व ड्रोनद्वारे निगराणी करावी; २४ तासांत गुन्हा दाखल करावा.

पोलिस, महसूल व ग्राम विकास विभागांनी संयुक्त बैठक घेऊन हटविण्याची रूपरेषा ठरवावी, अनधिकृत पुतळे निर्मिती कारखान्यांवर गुन्हे दाखल करून बंद करण्याची कार्यवाही करावी; कारखानदारांकडून जिल्हाधिकारी परवानगीशिवाय पुतळा न सुपूर्त करण्याचे बंधपत्र घ्यावे, हटविलेला पुतळा जवळच्या शासकीय गोदामात सुरक्षित ठेवावा.

गावांमध्ये पूर्वकल्पना मिळाल्यास संयुक्त बैठक घेऊन नागरिकांना अनधिकृत उभारणीपासून परावृत्त करावे; विरोध करणाऱ्यांविरुद्ध कारावास व दंडात्मक कारवाई होऊ शकते, असेही या आदेशात नमूद आहे.

# सोलापूरचा पारा पुन्हा चाळीशीवर

## २७ मार्चनंतर पुन्हा तापमानाचा तडाखा | उन्हाच्या झळा वाढणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१० एप्रिल-**

सोलापूरकरांसाठी उन्हाळ्याची तीव्रता आता खऱ्या अर्थाने जाणवू लागली आहे. आज, १० एप्रिल रोजी सोलापूरचे कमाल तापमान ४०.० अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले आहे. २७ मार्चनंतर पहिल्यांदाच तापमानाने पुन्हा चाळीशीचा टप्पा गाठला असून, येणाऱ्या दिवसांत उष्णतेची ही लाट अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



आजच्या हवामान नोंदीनुसार शहरात कोरडे हवामान आणि कडक ऊन पाहायला मिळाले. घटक नोंदवलेले प्रमाण कमाल तापमान ४०.० अंश सेल्सियस, किमान तापमान २३.८ अंश सेल्सियस, हवेतील आर्द्रता ३०% इतकी होती. या कडक उन्हामुळे दुपारच्या सत्रात रस्त्यावरील नागरिकांची गर्दी कमी दिसून येत होते. तर अनेक चाकरमाने उन्हाची तीव्रता कमी करण्यासाठी थंड पेयांच्या दुकानाकडे वळल्याचे दिसून येत होते.

आता हवामान खात्याच्या अंदाजानुसार, एप्रिलचा मध्य जवळ येत असताना सूर्याचा कोप वाढणार आहे. २७ मार्च रोजी तापमानात मोठी वाढ झाल्यानंतर मध्ये आभाळी वातावरणामुळे काही दिवस किंचित उतार पाहायला मिळाला होता, मात्र आजच्या ४० अंशांच्या नोंदीने पुन्हा एकदा उष्णतेच्या लाटेचे संकेत दिले आहेत.

हवेतील आर्द्रता केवळ ३०% असल्याने कोरड्या उन्हाचा चटका अधिक जाणवत आहे. दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट जाणवू लागला असून, उन्हापासून बचावासाठी खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे.

### उन्हाचा बचाव करण्यासाठी हे करा

दिवसभर पुरेसे पाणी, लिंबू सरबत किंवा ताक प्या, दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, बाहेर पडताना डोक्याला रुमाल, टोपी किंवा छत्रीचा वापर करा आणि सुती कपड्यांना प्राधान्य द्यावे. सोलापूरच्या तापमानाचा हा आलेख पाहता, मे महिन्यापूर्वीच शहर 'हॉटस्पॉट' ठरण्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे आतापासूनच वाढत्या उन्हाचा सामना करण्यासाठी सज्ज राहावे लागणार आहे.

### कडक उन्हात बळीराजाला कडबा काढण्याची वेळ

यावर्षी रब्बीची पेरणी उशिराने झाल्याने जिल्ह्याच्या काही भागात अजून ज्वारीचे फड उभे आहेत. अनेकांनी काढणी चालू केली असून, त्यांना भर उन्हात ज्वारी काढावी लागत आहे. शहरात ऊन लागत असेल तर किमान इमारतीचा आधार लोक घेतात मात्र वावरातील कडक उन्हात बळीराजावर कडबा काढणीची वेळ आल्याचे दिसून येत आहे.

# फ्लाय ९१ च्या उड्डाणांना सोलापुरातून उत्तम प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज यांच्या वतीने शहरातील हॉटेल लोटस येथे एक बैठक पार पडली. या आयोजित विशेष बैठकीत फ्लाय ९१ एअरलाईन्सचे बाघेश्वर यादव, जनरल मॅनेजर (सेल्स) यांनी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. या बैठकीत सोलापूरच्या औद्योगिक आणि व्यावसायिक विकासासंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा पार पडली. दरम्यान, सोलापूरकरांनी विमान उड्डाणांना मोठा प्रतिसाद दिल्याने कंपनी प्रतिनिधींनी समाधान व्यक्त केले. तर उद्योजकांनी फ्लाय ९१ कंपनी प्रतिनिधींचे आभार मानले.


या प्रसंगी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे गवरनिंग कॉन्सिल सदस्य व सिव्हिल एव्हीएशन समितीचे को चेअरमन केतन शहा, उद्योजक व महाराष्ट्र चेम्बरचे गवर्निंग सदस्य संजीव पाटील यांच्यासह सोलापूर विकास मंचचे सदस्य, तसेच शहरातील विविध क्षेत्रांतील नामवंत उद्योजक, संस्था व संघटनांचे पदाधिकारी आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. चाय पे चर्चा बैठकीदरम्यान फ्लाय ९१ एअरलाईन्सच्या प्रतिनिधींनी सोलापूर ते गोवा आणि हैद्राबाद या विमानसेवांना मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल सोलापूरकरांचे मनापासून आभार मानले. तसेच, भविष्यात आणखी नवीन मार्ग सुरू करण्याबाबत सकारात्मक संकेतही देण्यात आले. या बैठकीत आय एम ए च्या अध्यक्षा डॉ मंजुषा शहा, डॉ मिलिंद शहा, चिंचोळी एमआयडीसीचे उपाध्यक्ष सूत्रावे, विकास मंच चे योगीन गुज्जर, विजय यादव, दत्ता अंबुरे, झाम्बरे, जिल्ह्यातील सर्व तिकीट एजन्ट्स, सोलापूर चेम्बरचे सचिव शहा, बच्चूवार, चादर टॉवेल निर्यातदार व व्यापारी उपस्थित होते.

या बैठकीमुळे सोलापूरच्या हवाई संपर्कात वाढ होण्यास चालना मिळणार असून, जर सोलापूर विमानतळ हे उड्डाण योजने अंतर्गत सुरू झाल्यास तिकीट दर निम्म्याने कमी होतील. त्यासाठी मुख्यमंत्री, खासदार व पालकमंत्री यांनी प्रयत्न केले पाहिजे. विमानसेवेचा उद्योग, व्यापार आणि पर्यटन क्षेत्राला मोठा फायदा होणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. स्वागत संजीव पाटील, प्रास्ताविक केतनभाई शहा यांनी तर आभार प्रदर्शन नेक्शस ट्रॅव्हल्सचे तरंग शहा यांनी केले.

# शाळांची पटपडताळणी राबवण्यासाठी तालुकानिहाय नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

सोलापूर जिल्हा परिषद सोलापूरच्या प्राथमिक शिक्षण विभागाने राज्यातील शाळांची पटपडताळणी प्रभावीपणे राबवण्यासाठी तालुकानिहाय नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. शिक्षण संचालकांकडून प्राप्त आदेश आणि आयुक्त (शिक्षण) यांनी आभासी बैठकीत दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने ही कार्यवाही करण्यात आली आहे.



जिल्ह्यातील सर्व शाळांची पटपडताळणी ११, १५ आणि २२ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या पॅट ३ परीक्षेच्या दिवशी करण्यात येणार आहे. या प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती, नोंदींची अचूकता आणि शाळास्तरावरील माहितीची पडताळणी केली जाणार आहे. तालुकानिहाय संपर्क अधिकारी याप्रमाणे; दक्षिण सोलापूर-स्मिता नडीमेटला (उपशिक्षणाधिकारी, प्राथमिक), उत्तर सोलापूर-रुपाली भावसार (उपशिक्षणाधिकारी, प्राथमिक), माढा-मयुर पाटील (लेखा अधिकारी, शालेय पोषण आहार), मोहोळ-बसवेश्वर स्वामी (प्र.अधीक्षक), मंगळवेढा-डॉ.गजेंद्र जमादार (अधिव्याख्याता), बार्शी-डॉ.प्रभाकर बुधाराम (अधिव्याख्याता), माळशिरस-डॉ.क्रांती कुलकर्णी (अधिव्याख्याता), पंढरपूर-सुभाष बुवा (अधिव्याख्याता), सांगोला-रामदास टोणे (अधिव्याख्याता), अक्कलकोट-शहाजहान शेख (कार्यकारी अभियंता, समग्र शिक्षा अभियान).

पटपडताळणीची प्रक्रिया सुरळीत व पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यासाठी प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र संपर्क अधिकारी नेमण्यात आले आहेत. हे अधिकारी संबंधित तालुक्यातील शिक्षण यंत्रणा, पंचायत समिती आणि इतर संबंधित विभागांशी समन्वय साधून कामकाज पूर्ण करतील. संपूर्ण प्रक्रिया वेळेत आणि योग्य पध्दतीने पूर्ण होईल, याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. ही पटपडताळणी मोहीम शाळांमधील विद्यार्थ्यांची अचूक संख्या निश्चित करणे, शैक्षणिक योजनांची योग्य अंमलबजावणी सुनिश्चित करणे आणि शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता वाढविणे या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# गुंठेवारी विकास, मोजणी प्रक्रियाबाबत १५ एप्रिलपासून विशेष शिबिरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये महापौर विनायक कोंडयाल यांच्या अध्यक्षतेखाली हद्दवाढ भागातील गुंठेवारी विकास, मोजणी प्रक्रिया, नोटरी व्यवहार तसेच टी.पी. ४ योजनेअंतर्गत प्रॉपर्टी कार्ड तयार करण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली. १५ एप्रिलपासून हद्दवाढ प्रभागांमध्ये विशेष शिबिरे घेण्याचे यावेळी ठरविण्यात आले.

याप्रसंगी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, नगररचना उपसंचालक विनय झगडे, सहाय्यक संचालक शितोळे, मुद्रांक उपजिल्हाधिकारी श्रीराम कोळी, अधिक्षक भूमी अभिलेख दादासाहेब घोडके, उपअधिक्षक सचिन पवार आदी उपस्थित होते. टी.पी. ४ योजनेअंतर्गत ७/१२ उतारे बंद करून प्रॉपर्टी कार्ड तयार करताना येणाऱ्या अडचणींबाबत क्रेडाई प्रतिनिधींनी प्रश्न उपस्थित केला. यावर आयुक्त डॉ.ओम्बासे यांनी संबंधित विभागांसोबत पुढील बैठक आयोजित करून ज्या मिळकतींची नोंद अद्याप ७/१२ वर आहे. त्या फायनल प्लॉटनुसार तात्काळ प्रॉपर्टी कार्डमध्ये रूपांतरित करण्याबाबत सूचना देण्यात येतील, असे स्पष्ट केले. दि.१५ एप्रिल ते ३० एप्रिल यादरम्यान हद्दवाढ भागातील प्रभागांमध्ये विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांमध्ये नगरसेवकांच्या नियोजनाखाली नागरिकांकडून विहित नमुन्यात अर्ज स्वीकारले जाणार असून, नगररचना विभाग, मुद्रांक कार्यालय व भूमी अभिलेख विभागाच्या संयुक्त विद्यमाने ही प्रक्रिया राबविण्याचे ठरले. अधिक्षक भूमी अभिलेख घोडके यांनी सांगितले की, हद्दवाढ भागातील १२ गावांच्या मोजणीसाठी एजन्सी नियुक्त करण्यात आली आहे.



नेहरू नगर परिसरात पथदर्शी मोजणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मुद्रांक उपजिल्हाधिकारी कोळी यांनी सांगितले की, नोटरीद्वारे करण्यात आलेल्या व्यवहारांमध्ये मुद्रांक शुल्क टाळले गेले असल्यास, संबंधित मिळकतदारांनी मूळ मालकांकडून त्या वेळच्या रेडीरेकनर दरानुसार शासकीय नियमानुसार नोंदणीकृत व्यवहार पूर्ण करावेत.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये

# नगराध्यक्षा प्रणिता भालके व भगीरथ भालके यांचा उद्या शिवसेनेत प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर,दि.१० एप्रिल -**

येत्या रविवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये पंढरपूरच्या नगराध्यक्ष प्रणिता भालके यांच्यासह शेकडो कार्यकर्ते शिवसेनेमध्ये प्रवेश करणार आहेत, अशी माहिती विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष व तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नेते भगीरथ भालके यांनी आज पंढरपुरात पत्रकार परिषदेत दिली.



येथील टिळक स्मारक मंदिराच्या पटांगणामध्ये रविवारी दुपारी दोन वाजता पक्षप्रवेशाचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे पंचायत समितीचे सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, काही नगरसेवक व विविध गावचे सरपंच शिवसेनेमध्ये प्रवेश करणार आहेत. पंढरपूरच्या विकासासाठी शिवसेनेमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षप्रवेशाच्या दिवशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पंढरपूरच्या विकास कामांना निधी जाहीर करतील असेही भालके यांनी यावेळी स्पष्ट केले. सध्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगरसेवकांबाबत ज्या काही बातम्या येत आहेत. त्यामध्ये कोणतेही तथ्य नाही तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे सर्व नगरसेवक आमच्या सोबत आहेत. आमच्यामध्ये कोणतेही मतभेद नाहीत. जे काही समज गैरसमज होते. त्यावरती चर्चा होऊन ते देखील मिटलेले आहेत.

पंढरपूरच्या विकास कामासाठी सर्वांनी सोबत राहण्याची ग्वाही दिली आहे. असेही यावेळी भगीरथ भालके यांनी सांगितले. वेळी भैरवनाथ शुगर अध्यक्ष अनिल सावंत,नगरसेवक संजय बनपट्टे, राहुल देवमारे, माजी नगरसेवक सुधीर धोत्रे आदी उपस्थित होते. दरम्यान तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नगरपालिकेतील गटनेते नागेश भोसले हे अनुपस्थित राहिल्याने पुन्हा राजकीय चर्चांना उधाण आले आहे.


# जिल्हा परिषद विषय समित्यांसाठी ८३ नावांची अंतिम यादी तयार

- १५ एप्रिलला 'सीलबंद लखोटा' उघडणार
- पालकमंत्री गोरेंकडे अंतिम निर्णय

### शिवसेना-राष्ट्रवादीला संधी मिळणार का? याकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल**

जिल्हा परिषदेच्या १० विषय समित्यांसाठी एकूण ८३ सदस्यांची निवड करण्यात येणार असून, यासाठीची प्राथमिक यादी तयार करण्यात आली आहे. ही सर्वसमावेशक यादी अंतिम निर्णयासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. त्यामुळे समिती सदस्यांच्या निवडीबाबतचा अंतिम निर्णय आता त्यांच्या स्तरावर होणार आहे. दरम्यान, या नावांचा सीलबंद लखोटा १५ एप्रिल रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत उघडण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार आणि भाजपच्या पक्षनेत्या रश्मी बागल यांनी दिली.





विषय समिती सदस्यांच्या निवडीसाठी १५ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजता जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर ८ एप्रिल रोजी पक्षनेत्या रश्मी बागल यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, विविध विषय समित्यांचे सभापती आणि इतर पदाधिकारी सहभागी झाले होते. बैठकीत सदस्य निवडीच्या प्रक्रियेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. समिती सदस्य निवडीचे सर्व अधिकार पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे सोपविण्यात आले असून, ते तालुकास्तरीय नेते आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून अंतिम यादी निश्चित करणार आहेत.

त्यामुळे कोणत्या सदस्याला कोणती समिती मिळणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेत अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समिती सभापतींची निवड महायुतीने बहुमताच्या जोरावर बिनविरोध केली आहे. त्यामुळे समिती सदस्यांची निवडही बिनविरोध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. निवड प्रक्रियेदरम्यान पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाही सोबत घेण्याचे संकेत दिले होते. मात्र, प्रत्यक्षात या पक्षांना समित्यांमध्ये कितपत संधी दिली जाणार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

यासंदर्भात १२ एप्रिल रोजी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेत्यांची बैठक बोलावण्यात आली असून, त्यामध्ये या मुद्द्यावर चर्चा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या बैठकीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते, महिला व बालकल्याण सभापती अमृता वाघे यांच्यासह इतर पदाधिकारीही या प्रक्रियेत सक्रिय सहभागी झाले आहेत. एकंदरीत, जिल्हा परिषद विषय समित्यांच्या सदस्य निवडीभोवती राजकीय हालचालींना वेग आला असून, १५ एप्रिल रोजी होणारी सभा अनेक इच्छुक सदस्यांसाठी निर्णायक ठरणार आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा



# चुकीच्या एचआयव्ही रिपोर्टमुळे गर्भवती महिलेचे आयुष्य उद्ध्वस्त

## सासरच्या मंडळींकडून घेण्यात आला संशय

▸ 'अनुदान'साठी आरोग्य केंद्राने केलेला प्रताप ▸ मुख्यमंत्री कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील अकलूज येथील उपजिल्हा रुग्णालयशी संलग्न असलेल्या शासकीय आयसीटीसी एकात्मिक समुपदेशन व चाचणी केंद्राने एका गर्भवती महिलेच्या संदर्भात दिलेल्या एचआयव्ही रिपोर्टमुळे 'त्या' गर्भवती महिलेचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे, असा आरोप पिडीत महिला व ॲड.योगेश पवार यांनी पत्रकार परिषदेत केला.




संबंधित पीडित महिला प्रसूती पूर्व तपासणीसाठी अकलूज शासकीय रुग्णालयात गेल्या असता आयसीटीसी केंद्राने तीन किटद्वारे एचआयव्ही चाचणी केली. एचआयव्ही अहवालात पॉझिटिव्ह असल्याचे नमूदही केले. पीडितेला पंढरपूर एआरटी सेंटर येथे पाठवून अनावश्यक उपचार करण्यात आला. यासंदर्भात शंका आल्याने सदर महिलेने अन्य केंद्रांमध्ये तपासणी केली असता एचआयव्ही निगेटिव्ह अहवाल आला. त्यावरुन अकलूज आयसीटीसीने दिलेला अहवाल खोटा आणि बेकायदेशीर असल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान, त्या गर्भवती महिलेचा पती व सासरकडील मंडळींनी तिच्यावर संशय घेत नांदविण्यास स्पष्ट नकार दिला. शासनाकडून अनुदान मिळविण्यासाठीच अकलूजच्या त्या केंद्राने हा प्रताप केला. असे चुकीचे अहवाल देण्याचे प्रकार मंगळवेढा आणि पंढरपूर याठिकाणीही घडले आहे. शासनाने नुकसान भरपाई द्यावी. अन्यथा महाराष्ट्र दिनी मुख्यमंत्री कार्यालयासमोर आत्मदहन करु, असा इशारा महिलेने दिला आहे. यावेळी विश्वजित चुंगे हेही उपस्थित होते.

### फौजदारी, ऑडिट व माफी

चुकीचा अहवाल देणे, गोपनीयतेचा भंग करणे या आरोपाखाली संबंधित केंद्रातील दोषी कर्मचाऱ्यांवर तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करावा. राज्यातील सर्व आयसीटीसी केंद्रांमध्ये गर्भवती महिलांच्या बाबतीत तपासणी अहवालांचे पाच वर्षाचे ऑडिट करण्यात यावे. यातील महिला प्रकरणी जाहीर खुलासा करून संबंधित केंद्राने माफी मागावी, असेही त्यांनी सांगितले.

# पॅट परीक्षा, पटपडताळणीची धामधूम; शिक्षकांसह संस्थाचालकांमध्ये धास्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील शाळांमध्ये आजपासून द्वितीय सत्र परीक्षा, शासकीय पॅट परीक्षा तसेच विशेष पटपडताळणीची एकत्रित धामधूम सुरू होत आहे. यापार्श्वभूमीवर सर्व विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती सुनिश्चित करण्यासाठी शिक्षकांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. पटपडताळणीच्या या विशेष मोहिमेंतर्गत विद्यार्थी तसेच शाळेची तपासणी केली जाणार असून, यामुळे शिक्षकांसह संस्थाचालकांमध्ये धास्तीचे वातावरण पसरलेले दिसत आहे.



जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या खाजगी अनुदानित तसेच जिल्हा परिषदेच्या शाळेतील सर्व शिक्षकांना सकाळी लवकर शाळेत उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. उपस्थिती नोंदविल्यानंतर अनुपस्थित विद्यार्थ्यांच्या शंभर टक्के गृहभेटी घेऊन त्यांना शाळेत आणण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच, आजच शाळा सुटल्यानंतर वर्गनिहाय हजेरी क्रमांक पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सर्व शिक्षकांनी गणवेशात उपस्थित राहावे तसेच ग्रुपवर पाठविण्यात आलेल्या पत्रातील सूचनांचे काटेकोर पालन करावे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. भाषा विषयाची पॅट परीक्षा (तोंडी व लेखी) घेण्यात येणार असून, टाचणवही व प्रश्नपत्रिकेवर आवश्यक नोंदी आणि सह्या घेण्याबाबतही सूचना देण्यात आल्या आहेत. परीक्षा व पटपडताळणी ही कालमर्यादित व महत्त्वाची प्रक्रिया असल्याने सर्वांनी जबाबदारीने काम पार पाडावे, असे आवाहन करण्यात आले असून, या उपक्रमासाठी सर्व शिक्षकांना शुभेच्छाही देण्यात आल्या आहेत.

## ▸▸ थोडक्यात...

### स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त विजापूर रोडवरील श्री दत्त स्वामी समर्थ मंदिर येथे १३ ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये श्री स्वामी समर्थ गुरुलिलामृत पोथीचे सामूहिक पारायण, रुक्मिणी भजनी मंडळाचे भजन, रघुराज चव्हाण यांचे आर्ट ऑफ लिव्हिंग आत्मतरंग गायन ध्यान व ज्ञान कार्यक्रमांचा समावेश आहे. नितीन चव्हाण यांच्या महाआरती तर मल्हार चव्हाण यांच्या हस्ते महाप्रसाद वाटप होणार आहे. यावेळी विजापूर नाका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अशोक तरंगे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, असे मंदिराचे अध्यक्ष नागनाथ सुरवसे यांनी सांगितले.



### सोलापुरात सुरु होणार इलेक्ट्रोपॅथी, इलेक्ट्रो होमिओपॅथी कॅन्सर रिसर्च सेंटर

**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

सोलापुरात लवकरच इलेक्ट्रोपॅथी, इलेक्ट्रो होमिओपॅथी कॅन्सर रिसर्च सेंटर सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती डॉ.संतोष राठोड, डॉ. सुनील वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

इलेक्ट्रोपॅथी चिकित्साही शुद्ध वनस्पतीच्य अर्कापासून तयार करण्यात आली आहे. या औषधाचे कोणतेही दुष्परिणाम शरीरावर होत नाहीत. पूर्णतः नैसर्गिक आणि रुग्णांना दिलासा देणारी आहे. होमिओपॅथी मध्ये कॅन्सर रुग्णांना ऑपरेशन किमोथेरपी आणि रेडिएशन करण्याची गरज पडत नाही. यामुळे शरीरातील कोणताही आजार लवकरात लवकर बरा होण्याची मदत होते. किडनी विकार कोणत्याही प्रकारचे विकार यामुळे बरे केले जाऊ शकतात, असा दावाही त्यांनी केला. कोणाला कॅन्सर संदर्भात समस्या असेल तर युवराज मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, विजापूर रोड, सोलापूर येथे प्रत्यक्ष भेटावे, असे आवाहन डॉ.संतोष राठोड यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस ॲड. शिवशंकर घोडके, विजय शाबादे उपस्थित होते.

# जिल्हा परिषद समित्यांवरील 'हॉट सीट'ची चढाओढ

- स्टँडिंग-बांधकाम समितीसाठी सदस्यांची लॉबिंग
- १५ एप्रिलच्या सभेत ६८ सदस्यांची घोषणा नेत्यांकडे अंतिम निर्णयाचा 'की' फॅक्टर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समिती सभापतींच्या निवडीनंतर आता विविध समित्यांवरील 'हॉट सीट'साठीची जणू चढाओढ लागल्याचे दिसून येत आहे. विशेषतः स्टँडिंग-बांधकाम समितीसाठी सदस्यांची जोरदार लॉबिंग सुरु आहे.

१५ एप्रिलच्या सभेत ६८ सदस्यांची घोषणा करण्यात येणार आहे. दरम्यान, नेत्यांकडे अंतिम निर्णयाचा 'की' फॅक्टर असणार असल्याचे सांगण्यात येते.



कोणत्या सदस्याला कोणत्या समितीत संधी द्यायची यासाठी नेत्यांमार्फत 'फिल्डिंग' लावली जात असल्याचे चित्र आहे. अंतिम यादीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा प्रभाव राहणार आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, गटनेत्या रश्मी बागल, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम पातळीवर बैठकांचे सत्र सुरु आहे.

### वैयक्तिक संबंध लक्षात घेता...

जि.प.च्या ६८ सदस्यांपैकी सुमारे ३० विरोधी सदस्यांना कोणती समिती मिळणार, याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. मात्र महायुतीतील अनेक सदस्यांचे भाजप नेत्यांशी असलेले वैयक्तिक संबंध लक्षात घेता 'सेटिंग' सुरळीत होईल, असे संकेत आहेत.

### 'या' समित्यांना सर्वाधिक मागणी

स्टॅंडिंग अर्थात स्थायी समिती, समाज कल्याण समिती आणि जलसंधारण समितीत येण्यासाठी अनेकजण इच्छुक आहेत. स्थायी, समाजकल्याण किंवा जलसंधारण समितीतच स्थान देण्यात यावे, अशी मागणी काही सदस्यांकडून केली जात असल्याचे सांगण्यात आले.

### या समित्यांविषयी कमी आकर्षक

शिक्षण, आरोग्य, कृषी आणि पशुसंवर्धन यांसारख्या समित्यांविषयी सदस्यांना कमी आकर्षण असल्याचेही बोलले जात आहे. दरम्यान, महिला व बालकल्याण समितीमध्ये महिला सदस्यांनाच संधी असल्यामुळे त्याठिकाणी स्पर्धा मर्यादित आहे.

## तेलुगु भाषा प्रशिक्षण वाचन व लेखन वर्गाचे आयोजन

**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

तेलुगु भाषा अभिवृद्धी मंडळ व सार्वजनिक ग्रंथालयमच्या संयुक्त विद्यमाने २२ एप्रिल ते २० मे २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ६ ते ६ यावेळेत जुना वालचंद महाविद्यालय जवळील श्रीकृष्ण देवस्थानम् येथील ग्रंथालयम्च्या कार्यालयात तेलुगु भाषा लेखन, वाचन मोफत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सचिव तिप्पण्णा गणेरी यांनी दिली.

या शिबीराचे यंदाचे २० वे वर्ष आहे. राजलक्ष्मी गाडपल्ली ह्या शिबीरार्थींना मार्गदर्शन करणार आहेत. हे शिबीर सर्वांसाठी खुली असून यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी ९७३०५३२१४३ या मोबाईल नंबरवर संपर्क साधून नावे नोंदवावीत, असे आवाहनही त्यांनी केले.

### शिक्षकांच्या प्रलंबित वैद्यकीय बिलांचा प्रश्न मार्गी

# ९३८ जणांच्या खात्यात थेट ७ कोटी रुपये जमा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

अनेक महिन्यांपासून वैद्यकीय बिलांच्या प्रतीक्षेत असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील ९३८ शिक्षकांच्या प्रलंबित वैद्यकीय देयकांसाठी सुमारे ७ कोटी रुपयांचा निधी थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केला आहे.

जिल्ह्यातील अनेक शिक्षकांचे गंभीर आजार, शस्त्रक्रिया यासंबंधीचे वैद्यकीय खर्चाचे प्रस्ताव मंजुरीसाठी प्रलंबित होते. शिक्षण व वित्त विभागात फाईली रखडल्यामुळे शिक्षकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, या प्रकरणांचा वेगाने निपटारा करत सर्व पात्र प्रकरणांना न्याय देण्यात आला. शिक्षण उपसंचालक गणपत मोरे आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली त्रुटी असलेल्या प्रस्तावांची पूर्तता करून ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. नियमांनुसार मान्यताप्राप्त शाळांतील पूर्णवेळ कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना वैद्यकीय खर्चाची परतफेड मिळते. त्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करणे तसेच डिस्चार्जनंतर सहा महिन्यांच्या आत प्रस्ताव देणे बंधनकारक असते.

सध्या कॅशलेस सुविधा उपलब्ध नसली तरी प्रतिपूर्ती पद्धतीनेच ही रक्कम दिली जाते. ९३८ शिक्षकांच्या खात्यात ७ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. भविष्यात अशी प्रकरणे प्रलंबित राहू नयेत, यासाठी दक्षता घेऊ, असे वेतन पथकाचे अधीक्षक लक्ष्मण वालवाड यांनी सांगितले.

# वालचंद महाविद्यालयात 'युथ वेलनेस रिट्रीट'

## अध्यात्म, विज्ञान, आत्मजागरूकतेचा प्रेरणादायी संगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

वालचंद शिक्षण समूहांतर्गत वालचंद महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेला 'युथ वेलनेस रिट्रीट २०२६' हा अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम उत्साहात संपन्न झाला.

परमपूज्य मुनिश्री १०८ वीरसागरजी महाराज यांच्या मंगल मार्गदर्शनाखाली सुमारे २५०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या प्रारंभी परम पूज्य आचार्य श्री विद्यासागर महाराज यांच्या प्रेरणादायी विचारांचे स्मरण करून त्यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, भूषण शहा, पराग शहा तसेच सर्व प्राचार्यांच्या हस्ते हा सोहळा पार पडला. डब्ल्यू.आय.टी.चे माजी विद्यार्थी वैभव परतवार, पूजा परतवार आणि अंकित जैन यांच्या सहकार्याने कार्यक्रमाची सुरुवात ऊर्जावान झुंबा नृत्याने झाली. त्यानंतर योग व ध्यान सत्रांद्वारे विद्यार्थ्यांना मानसिक स्थैर्य, एकाग्रता, अंतर्मनाशी संवाद साधण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.



# समता सप्ताहात विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा; तालुकानिहाय ३५ हजारांचा निधी

## विजेत्या विद्यार्थ्यांना मिळणार रोख पारितोषिके आणि प्रशस्तिपत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक समता सप्ताहाच्या निमित्ताने जिल्हा परिषद सोलापूरच्या समाजकल्याण विभागाकडून इयत्ता ७वी ते १२वीतील विद्यार्थ्यांसाठी शालेय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ही स्पर्धा १४ एप्रिल २०२६ रोजी तालुका स्तरावर घेण्यात येणार आहे. या स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित विषयांसह महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त त्या ऐतिहासिक आंदोलनाचे महत्त्व, तसेच मानवी हक्कांची जाणीव करून देणारे विषय घेण्यात येणार आहेत. यासोबतच संत गाडगे महाराज यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यावर आधारित विषयांचाही समावेश असणार आहे.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी हॉल सजावट, चहा-नाश्ता, पिण्याचे पाणी, अल्पोपहार आणि प्रशस्तीपत्र छपाई यासाठी गटविकास अधिकारी स्तरावर ८ हजार रुपयांपर्यंत खर्च करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच प्रत्येक तालुक्यासाठी एकूण ३५ हजार रुपयांची मर्यादा निश्चित करण्यात आली असून, त्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. समाजकल्याण विभागाच्या वतीने हा आदेश जारी करण्यात आला असून, संबंधित सर्व पंचायत समित्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे ११ हजार, ९ हजार आणि ७ हजार रुपयांची रोख पारितोषिके तसेच प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहेत. या पारितोषिकांचे वितरण १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमात करण्यात येणार आहे, असे प्रसाद मिरकले, समाजकल्याण अधिकारी यांनी सांगितले.

# खरीप हंगामासाठी खत कंपन्यांनी युरिया, डीएपीचा १०० टक्के संरक्षित साठा ठेवणे बंधनकारक

## जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांचे निर्देश; कंपन्यांनी लिंकिंग केल्यास कडक कारवाईचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

खरीप हंगाम २०२६ साठी सोलापूर जिल्ह्याचा खत संरक्षित साठा १० हजार ६०० मेट्रिक टन इतका करण्यात आलेला आहे. यामध्ये युरिया ९ हजार ३५० मेट्रिक टन व डीएपी १ हजार २५० मेट्रिक टन आहे. तरी खत कंपन्यांनी सोलापूर जिल्ह्याचा खतांचा बफर स्टॉक १००% ठेवावा. या स्टॉकमध्ये कोणत्याही परिस्थितीत कमतरता होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी. खत कंपन्यांनी व बियाणे कंपन्यांनी कोणत्याही प्रकारचे लिंकिंग न करता खते व बियाण्याची विक्री शेतकऱ्यांना करावी. तक्रार आल्यास त्या कंपन्यावर अत्यंत कठोर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिला.



जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा सनियंत्रण समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा परिषदेचे जिल्हा कृषी विकास अधिकारी हरी हावळे, जिल्हा विपणन अधिकारी मनोज वाजपेयी, इफको खत कंपनीचे रवींद्र मोरे, इंडियन पोटॅश कंपनीचे ओंकार रनवरे, नॅशनल फर्टीलायझर कंपनीचे पवनलाल हुकरे, राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलायझर्सचे सागर कांबळे आदी उपस्थित होते.

मागील वर्षीच्या खरीप हंगामात खत कंपन्यांनी बफर स्टॉक फक्त ५४% ठेवलेल्या होता. त्यामुळे यावर्षी पुणे येथील कृषी आयुक्तालयचे निविष्ठा संचालक यांनी सोलापूर जिल्ह्यासाठी जेवढा खताचा संरक्षित साठा उपलब्ध करून दिलेला आहे, तेवढा शंभर टक्के साठा संरक्षित ठेवला पाहिजे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे निर्देशही त्यांनी दिले.

खत कंपन्यांनी त्यांचे सोलापूर येथे रॅक पॉईट तयार केले पाहिजे. तसेच जेवढा खतांचा साठा सोलापूर जिल्ह्यासाठी येणार आहे त्याचे सम प्रमाणात जिल्ह्यात सर्वत्र वितरण झाले पाहिजे त्याचे नियोजन सूक्ष्मपणे करावे आणि खत कंपन्याकडून किमान तीन ते चार दिवस अगोदर रॅक पॉईंट उपलब्ध होणार आहे, याची माहिती कृषी विभागाला द्यावी, असेही त्यांनी निर्देशित केले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सांगितले की, सोलापूर जिल्ह्याच्या पीक पद्धतीत मागील काही वर्षात बदल होत आहे. तसेच खरिपाच्या पीक क्षेत्रात ही वाढ होत आहे. सोयाबीन ऊस, तूर, उडीद व मका या पिकांची वाढ झालेली आहे.

सोलापूर जिल्ह्यात खतांचा विषय अत्यंत संवेदनशील आहे. तसेच कृषी निविष्ठा विक्रेत्यांमध्ये खते विक्रेते ३,११०, बियाणे विक्रेते ३०२७ आणि कीटकनाशके विक्रेते २९३० इतके असून जवळपास दहा ते बारा खत कंपन्याकडून सोलापूर जिल्ह्याला खतांचा पुरवठा होत असतो असेही त्यांनी सांगितले.

### जिल्ह्याला १० हजार ६०० मे. टन खताचा बफर स्टॉक

खरीप हंगाम २०२६ मध्ये युरिया डीएपी एम ओ पी एस एस पी संयुक्त खते अशी एकूण मागणी दोन लाख ९५ हजार ५६ इतकी असून, दोन लाख ५१ हजार ९५८ प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. निविष्ठा व गुण नियंत्रक संचालक यांच्या आदेशानुसार सोलापूर जिल्ह्याला दहा हजार सहाशे मेट्रिक टन खताचा बफर स्टॉक मिळाल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सांगून खरीप हंगामासाठी बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याचेही त्यांनी म्हटले.

### -११ तालुक्यांना सम प्रमाणात खत पुरवठा

यावेळी खत कंपन्यांच्या प्रतिनिधी कडून जिल्ह्याला मिळाला बफर स्टॉक १००% ठेवण्यात येईल असे सांगितले तर महाबीज कंपनीकडून मुबलक प्रमाणात बियाणे उपलब्ध करून मिळतील असे सांगितले तर वितरक असोसिएशनच्या वतीने जिल्ह्यातील अकरा तालुक्यांना सम प्रमाणात खत पुरवठा होत नसल्याबाबत सांगून सोलापूर येथे खत कंपन्यांनी रॅक पॉइंट तयार करण्याबाबत मागणी केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४०९

**पुण्यवंत व्हावें।**
**घेतां सज्जनांचीं नांवें।।**

प्रत्येकाला मोठे व्हावे, चांगले व्हावे असे वाटत असते. मोठेपण, चांगलेपण हे केवळ स्वत:ला योग्य वाटेल त्या मार्गाने मार्गक्रमण करून मिळेलच असे नाही. त्याकरिता कांही आदर्श डोळ्यासमोर ठेवावी लागतात. ज्या महात्म्यांनी त्यांचे जीवन उज्वल केले आहे, अशा महत्म्यांचा आदर्श आपणाला योग्य त्या मार्गावरून चालण्याची ताकद देऊ शकतो. त्यामुळे आपल्या उदिष्टाला अनुषंगून ज्या कोणाचा आदर्श आपणाला घेता येईल तो घ्यायला हवा. जगाच्या पाठीवर अनेक सत्पुरूष होऊन गेले आहेत. प्रत्येकाकडून कांही तरी घेण्यासारखे आहे. कोणाकडून किती व काय घ्यायचे हे आपल्यावर अवलंबून आहे. कांही सत्पुरुष तर असे



आहेत की केवळ त्यांच्या नांवाचा जपही आपल्या कल्याणासाठी पुरेसा आहे. त्यांच्या नांवाचा जप म्हणजे कळत न कळत त्यांच्या आदर्शाचे आपल्या जीवनात प्रत्यक्ष प्रतिबिंब उमटवणे होय. ज्यांचे नाव आपण आदराने घेतो, त्या नावाच्या पाठीमागे असलेला आदर्श, भावना, त्याग आपल्या जीवनात उतरवावा असे आपणाला वाटतच असते. म्हणून सत्पुरुषांची नांवे घेऊन त्यांच्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न करणारा सुखी, समाधानी होऊ शकतो. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, पुण्यवंत व्हावें। घेतां सज्जनांचीं नांवें ।।

एखाद्याचे सातत्याने नांव घेणे म्हणजे त्याच्या जीवन कार्याचा मन:पूर्वक स्विकार करणे होय. अर्थात त्यांच्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करणे होय. संत, महात्म्यांच्या नांवाचा जप करणे म्हणजे केवळ त्यांच्या नावापुरते मर्यादित राहणे असे अपेक्षित नसून त्यांच्या विचाराचा आपल्या जीवनात अंगीकार करणे, असे अपेक्षित आहे. आपण ज्याचे नांव वारंवार घेतो त्याला आपण दुसऱ्या शब्दात आपला मार्गदर्शक, सद्गुरु म्हणतो. आपला गुरु कोणी मोठा व्यक्ती असावा असे अपेक्षित नाही. मात्र आपला सद्गुरु हा सज्जन असावा असे अपेक्षित आहे. कारण सर्व मोठी माणसं खऱ्या अर्थाने सज्जन असतातच असे नव्हे, पण सर्व सज्जन माणसं खऱ्या अर्थाने मोठी असतात. म्हणून आपण अशाच व्यक्तिमत्वाचे नांव घ्यावे की जे सज्जन आहेत. सज्जनांच्या नावांचा वारंवार होणारा उल्लेखही आपल्यात बरेच काही परिवर्तन करू शकतो. कारण एखादे नाव मनात येताच ती व्यक्ती, त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व, त्यांचे आदर्श, कर्तव्य, मार्गदर्शन, संदेश आपल्या डोळ्यासमोर उभे राहतात. सर्व संत महात्म्यांनी त्यांच्या नजरेसमोर कोणते ना कोणते आदर्श उभे केले होतेच. त्या आदर्शाकडे पाहून त्यांनी आपले जीवन कार्य केले. आपल्या आदर्शाला, कर्तव्याला पुष्टी देण्यासाठी आपणही संत, सज्जनांना डोळ्यासमोर आणून आपल्या हृदयात स्थान द्यावे. ज्ञानोबा-तुकोबांच्या आदर्शांना आपण हृदयात स्थान दिल्यास आपल्यासारखा दुसरा कोण भाग्यवंत असणार आहे. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शनिवार,
दि. ११ एप्रिल २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - चैत्र कृ. नवमी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- उत्तरषाढा (१३.३८)
योग - सिध्द (१८.३७)
करण - तैतिल (१२.००)
राहू काल : शनिवार
स. १०.३० ते १२.००

दिनविशेष :
महात्मा ज्योतिबा फुले जयंती.
१९७०: अपोलो-१३ यानाचे प्रक्षेपण झाले.
१९७६: ॲपल कंपनी चे ॲपल १ हे कॉम्पुटर तयार झाले.
१९९२: चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, लेखक भालजी पेंढारकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला.

# गावातील ८० कुटुंबांपैकी ४५ कुटुंबातील मुला-मुलींचे सामुदायिक स्वरुपात झाले लग्न

### आ. देशमुख यांची गावकऱ्यांना कौतुकाची थाप; हजारो वऱ्हाडींच्या उपस्थितीत ७ जोडपी विवाहबध्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

बोरुळ गावात एकूण ८० कुटुंबे असून, त्यापैकी ४५ कुटुंबांतील मुला-मुलींचे सामुदायिक विवाह झाले आहेत. त्यामुळे बोरुळ गाव सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यासाठी एक आदर्श मॉडेल ठरल्याचे प्रतिपादन आ. सुभाष देशमुख यांनी केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरुळ येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त लोकमंगल फाउंडेशनच्या वतीने सामुदायिक विवाह सोहळा पार पडला. या सोहळ्यास फाउंडेशनचे संस्थापक आमदार सुभाष देशमुख यांनी नवदांपत्यांना आशीर्वाद दिले.

यावेळी हजारो वर्हाडी मंडळींची उपस्थिती होती. बोरुळ गावात लोकमंगल फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेला हा सलग चौथा सामुदायिक विवाह सोहळा ठरला. आमदार देशमुख यांनी ज्या गावात पाच किंवा त्यापेक्षा अधिक विवाह निश्चित होतील, त्या गावात सामुदायिक विवाह आयोजित करण्याचा संकल्प केला असून, त्याच अनुषंगाने




बोरुळमध्ये दरवर्षी हा उपक्रम राबविला जात आहे. यंदाच्या सोहळ्यात सात जोडपी विवाहबद्ध झाली. आमदार सुभाष देशमुख यांनी स्वतः कन्यादान करत नवदांपत्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी वधू-वरांना कपडे व संसारोपयोगी साहित्य, बूट चप्पल, सुवर्ण मनी, मंगळसूत्र,चांदीची जोडवी भेट म्हणून देण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक अतुल गायकवाड, पंचप्पा धनशेट्टी, अंबिका पाटील, उत्तरचे तालुकाध्यक्ष राम जाधव, लोकमंगल फाउंडेशनचे संचालक मारुती तोडकर, उत्तम शिंदे, घोडके, मुख्याध्यापक तेगीनकेरी, द्राक्ष बागायतदार गुरुबसप्पा म्हेत्र, राहुल वंजारे, सागर धुळवे, शिवानंद पुजारी उपस्थित होते.

**बरूळचा आदर्श इतर गावांनी घ्यावा**

सामुदायिक विवाह सोहळा ही एक सामाजिक चळवळ असून, विविध गावांतील नागरिकांनी या चळवळीत सहभागी होऊन ती अधिक व्यापक करावी. बरूळ गावाची प्रेरणा इतर गावांनीही घ्यावी असे आवाहन आ. देशमुख यांनी करत लग्नासाठी सावकारांकडून कर्ज घेण्यापेक्षा सामुदायिक विवाह सोहळ्यात सहभागी होण्याचा सल्ला दिला.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### श्वास ही मेंदूची गुरुकिल्ली; त्यावर नियंत्रण ठेवण्याची गरज



श्वास ही मेंदूची गुरुकिल्ली आहे. 'ॐकार' जपामुळे मन:शांती प्राप्त होते, ताणतणाव कमी होतो आणि नकारात्मक ऊर्जा दूर होते, नियमित ध्यान व प्राणायामामुळे शरीरातील चेतासंस्था, पचनसंस्था व श्वसनसंस्था संतुलित राहतात, असे मुनिश्री वीरसागरजी महाराज यांनी 'ॐकार' ध्वनीचे महत्त्व विशद करताना श्वासावर नियंत्रण ठेवण्याची गरज अधोरेखित केली. 'सोहम' आणि 'ॐ' मंत्रांच्या एकसुरात झालेल्या जपामुळे संपूर्ण परिसर अध्यात्मिक स्पंदनांनी भारावून गेला. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मुनीश्रींनी दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्न उपस्थित करून आत्मपरीक्षणाची दिशा दाखवली. 'सेल्फ रिफ्लेक्शन' आणि 'डथजढ विश्लेषण' (स्वत:च्या ताकदी, मर्यादा, संधी आणि धोके) यांचे महत्त्व पटवून देत, स्वत:कडे प्रामाणिकपणे पाहिल्यासच खरी प्रगती साधता येते, असे त्यांनी नमूद केले. स्वत:ला ओळखणे, भावनांवर नियंत्रण ठेवणे आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे ही जीवनमूल्य विद्यार्थ्यांच्या 'अंतर्गत सॉफ्टवेअर अपडेट'साठी 'सोहम' आणि 'ॐ' मंत्राची गरज आहे. मुनिश्रींनी जैन धर्मातील अहिंसा, क्षमा आणि द्वेषरहित जीवनाचे महत्त्व अधोरेखित केले. मनात क्रोध, द्वेष वा कपट न ठेवता निर्मळ भावनेने जीवन जगणे, हीच खरी साधना आहे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. त्यांच्या प्रेरणादायी कवितेने विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकतेची नवी ऊर्जा निर्माण केली. वैज्ञानिक दृष्टिकोनातून मार्गदर्शन करताना त्यांनी मेंदूतील 'अमिग्डाला' हा भाग भीती व रागाशी संबंधित असून 'प्रि-फ्रंटल कॉर्टेक्स' निर्णयक्षमतेसाठी महत्त्वाचा असल्याचे स्पष्ट केले. ध्यान, प्राणायाम आणि सकारात्मक विचारसरणीमुळे मानसिक संतुलन राखता येते, असे त्यांनी सांगितले.

# चायनीज गाडी व पावभाजी सेंटरवर धाड; ९ घरगुती सिलेंडर जप्त

- अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे पुन्हा ॲक्शन मोडवर
- घरगुती गॅसचा अवैध वापर करणाऱ्याचे धाबे दणाणले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

आखाती युद्धच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी सायंकाळी अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या नेतृत्वासह आसार मैदान (सावरकर मैदान) येथील चौपाटी किल्ला बागेच्या बाजूस चायनीज गाड्या व पावभाजी सेंटरवर धाडी टाकण्यात आल्या.

यावेळी नऊ घरगुती वापराचे सिलेंडर व्यावसायिक ठिकाणी अवैधरित्या वापरत असल्याचे दिसून आल्यावर पथका समक्ष



**चार दिवसांत गॅस एजन्सीबाबतीत ४० तक्रारी**

प्रशासनाच्या आपत्कालीन हेल्प लाईनवर चार दिवसात गॅस एजन्सी बाबतीत ४० तक्रारी प्राप्त तर दुसरीकडे अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे ह्यांनी घरगुती गॅसचा अवैधरित्या व्यावसायिक वापर करणाऱ्या वर धडक मोहिमेची कारवाई हाती घेतली आहे.

जप्त करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याचे कामकाज चालू होते. या पथकात परिमंडळ अधिकारी ब विभाग राजेश यमपुरे, परिमंडळ अधिकारी अ विभाग नंदकिशोर डोके परिमंडळ अधिकारी ड विभाग प्रफुल नाईक पुरवठा निरीक्षक ज्ञानेश्वर काशीद, सज्जन भोसले, गीता डंके लिपिक वैभव मोरे, सचिन लांडे,आनंद मधणे तसेच पोलीस प्रशासनातून पोलीस अंमलदार जावेद जमादार,आबाजी सावळे, धीरज सातपुते, विठ्ठल यलमार आदी उपस्थित होते.



## 'जीववितमलो' तेलुगु गाण्याचे प्रकाशन

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

इस्टर डे अर्थात येशु ख्रिस्ताच्या पुनरुत्थान दिनाचे औचित्य साधुन जीवितमलो या भावस्पर्शी व्हिडीओ गाण्याचे प्रकाशन पार पाडले. कार्यक्रमास रेव्ह. देवदास बेळ्ळी रेव्ह. अभिषेक होसुर तसेच प्रमुख पाहुणे म्हणुन हैद्राबाद येथील पास्टर विल्सन हिरेमनी उपस्थीत होते. या गीताची रचना व सूर संकल्पना पौल जयशील यांनी केली असून गायक आनंदराज भंडारे यांच्या सुमधुर आवाजात हे गीत सादर करण्यात आले आहे. इस्टर डेच्या दिवशीच या गाण्याचे प्रकाशन करण्यात आले. गाण्यासाठी अनिल बिंग (मुंबई) रेव्ह. सुभाष माने, पा. जस्टीन जगले (मुंबई) स्टीफन बॉब (बेंगलुरू), सुरेश भंडारे, अभिषेक भंडारे यांचे सहकार्य लाभले.



## विज्ञान एकांकिका स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

ग्रंथाली - प्रतिभांगण आणि ओंकार नाट्यमंदिर सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञानधारा' एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक- हिंगुलांबिका प्राथमिक शाळा, द्वितीय क्रमांक- स.ही.ने. प्रशाला, तृतीय क्रमांक- इनोव्हेटिव्ह स्कूल अंकोली व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शेटफळ या शाळांनी यश प्राप्त केले. या शाळेतील बालकलाकारांचा सत्कार सोहळा साखरपेठ येथील बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हिंगुलांबिका प्राथमिक शाळेत पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव विजय पुकाळे, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दिनेश रसाळ (भूलतज्ञ), विकास सुरवसे (अध्यक्ष-ओंकार नाट्यमंदिर), अभिषेक देशपांडे, धनंजय गोडबोले (परिक्षक), उमेश बटाणे (परिक्षक), अमोल राजमाने (नाट्यकलाकार), डॉ. राहूल हंचाटे (वैद्यकीय अधिकारी) उपस्थित होते. या सर्व मान्यवरांच्या हस्ते बालकलाकारांचे सत्कार करून त्यांना गौरविण्यात आले. मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे यांनी आभार मानले.



# 'सिंहगड'च्या विद्यार्थिनीची पोलिस भरतीत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग केगाव येथील विद्यार्थिनी गौरी अनिल वाघमारे हिने पोलीस भरतीत उल्लेखनीय यश संपादन करत सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलीसमध्ये निवड मिळवली आहे. तिच्या या यशामुळे परिसरात तिचे कौतुक होत आहे.

मोहोळ तालुक्यातील कोरवली येथील रहिवासी असलेल्या गौरीचे वय २० वर्षे असून ती शेतकरी कुटुंबातील आहे. वडील शेती करतात तर आई गृहिणी आहेत. प्रतिकूल परिस्थितीतही तिने शिक्षणासोबत स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवली.

गौरीने प्राथमिक शिक्षण गावात पूर्ण केले असून १२ वी नंतर ती सध्या सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर येथे इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षात शिक्षण घेत आहे. पोलिस भरती प्रक्रियेत तिला ११८ गुण मिळाले असून ती SC प्रवर्गातून प्रथम क्रमांकाने निवडली गेली आहे. तिची निवड सोलापूर ग्रामीण पोलीस दलात झाली आहे. मेहनत आणि चिकाटीचा प्रवास प्रथम वर्षात प्रवेश घेतल्यानंतरच गौरीने पोलीस भरतीचे स्वप्न पाहिले. सुरुवातीला तिला रनिंग आणि फिजिकल चाचण्यांमध्ये अडचणी आल्या. मात्र, कॉलेजच्या मैदानावर दररोज नियमित सराव करत तिने स्वत:मध्ये सातत्याने सुधारणा केली. फिजिकल टेस्टमध्ये ८०० मीटर, १०० मीटर धावणे आणि गोळाफेक यासाठी तिने मेहनत घेतली. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या आणि विभागीय उपआयुक्त संजय माने यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. यावेळेस प्राचार्य डॉ शंकर नवले, प्रबंधक डॉ. डी. आय नवले यांची उपस्थिती होती.

# सर्वांनी स्वच्छतेचा धर्म अंगीकारावा : कुलगुरू डॉ. महानवर

### सोलापूर विद्यापीठात संत गाडगेबाबा यांना अभिवादन व वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

संत गाडगेबाबा महाराज यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त त्यांच्या स्वच्छतेच्या विचारांचे स्मरण करून तो जीवनात अंगीकारणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहा'अंतर्गत गुरुवारी संत गाडगेबाबा महाराज यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. महानवर हे बोलत होते. यानंतर विद्यापीठाच्या



अतिथीगृहासमोर वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, समन्वयक डॉ. गौतम कांबळे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी डॉ. महादेव खराडे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

समता सप्ताहाच्या निमित्ताने 'भारतरन डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन व कार्य' तसेच 'महात्मा ज्योतिराव फुले : जीवन व कार्य' या विषयांवर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

# सोलापूरच्या खेळाडूंना 'प्रिसिजन'चे बळ



सोलापूरच्या औद्योगिक नकाशावर ठळकपणे उभे राहिलेले नाव म्हणजे Precision Camshafts Limited. कॅमशाफ्ट उत्पादन क्षेत्रात जागतिक स्तरावर भक्कम ओळख निर्माण केलेल्या या कंपनीने उद्योगाच्या चौकटीबाहेर पडत सामाजिक बांधिलकीची नवी व्याख्या घडवली आहे. सीएसआर उपक्रमांच्या माध्यमातून समाजाच्या विविध क्षेत्रात प्रिसिजनने प्रभावी हस्तक्षेप केला आहे.

कायद्यानुसार कंपन्यांना त्यांच्या वार्षिक नफ्याच्या २ टक्के रक्कम सामाजिक कार्यासाठी खर्च करणे बंधनकारक असले, तरी प्रिसिजनसाठी सीएसआर ही केवळ जबाबदारी नाही, तर ती एक मूल्यव्यवस्था आहे. कंपनीचे चेअरमन यतीन शहा आणि त्यांच्या संचालक मंडळांनी शिक्षण, आरोग्य, शाश्वत विकास, कला, संस्कृती आणि विशेषत: क्रीडा क्षेत्रात सातत्यपूर्ण आणि परिणामकारक काम उभे केले आहे.

**आंतरराष्ट्रीय लॉन टेनिसला साथ**

गेल्या १० वर्षांत क्रीडा क्षेत्रात प्रिसिजनने उमटवलेला ठसा लक्षणीय आहे. स्थानिक ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांना दिलेल्या आर्थिक पाठिंब्यामुळे अनेक खेळाडूंना नवी संधी आणि आत्मविश्वास मिळाला. जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन दरवर्षी २५ हजार अमेरिकन डॉलरची आंतराराष्ट्रीय दर्जाजी एकमेव महिला लॉन टेनिस स्पर्धा भरवत आहेत. प्रतिवर्षी कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात होणाऱ्या स्पर्धेला स्पॉन्सरशिपच्या माध्यमातून हातभार हा महिला क्रीडेला बळ देणारा ठरला. तसेच या टेनिस स्पर्धांसाठी लाउंज तयार करून दिले तर खेळाडू व प्रेक्षकाना बसण्यासाठी पॅव्हेलियन बांधून दिले. त्यामुळे टेनिस खेळाडूंना मोठी मदत झाली. तसेच मानाच्या रेल्वे स्कॉट मेमोरियल क्रिकेट स्पर्धेला गेल्या १४ वर्षांपासून प्रिसिजनने पुरस्कृत केले आहे. टेब टेनिस स्पर्धांमुळे स्थानिक प्रतिभेला व्यासपीठ मिळाले.

**कामगारांमध्ये क्रीडासंस्कृती रुजवण्याचा प्रयत्न**

औद्योगिक कामगारांमध्ये क्रीडासंस्कृती रुजवण्याचा अभिनव प्रयत्न म्हणून ''सोलापूर इंडस्ट्रीज प्रीमिअर लीग'' हा उपक्रम विशेष ठरतो. विविध कंपन्यांतील कर्मचारी एकत्र येत क्रिकेटच्या माध्यमातून संघभावना, स्पर्धात्मकता आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा अनुभव घेत आहेत. या स्पर्धेसाठी गेल्या तीन वर्षांपासून प्रायोजकत्व स्वीकारले. याशिवाय ऑर्किड कॉलेजच्या माध्यमातून सुप्रा आणि फार्म्यूला इंपिरियलसारख्या कार रेसिंग स्पर्धांना दिलेला पाठिंबा हा तांत्रिक आणि नवोन्मेषी क्रीडांना चालना देणारा आहे.

शासकीय निधीतून अनेक कामे होतात. परंतु प्रिसिजनने केलेली क्रीडा विकासाची कामे ही दर्जेदार व गुणवत्तापूर्णच झाली आहेत. कारण शासकीय मैदानावर बसण्याची बाकडे ही दर्जेदार नसल्याचे लक्षात येताच त्यांनी ती बाकडे तातडीने बदलली. हे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण कामाचे उदाहरण आहे. उद्योगातून समाजाकडे वाटचाल करताना प्रिसिजनने दाखवलेला हा क्रीडाप्रेमाचा दृष्टिकोन केवळ मदतीपुरता मर्यादित नाही तर तो प्रेरणा देणारा, दिशा दाखवणारा आणि सोलापूरच्या क्रीडाक्षेत्राला नवी उंची देणारा आहे.

**नेहरुनगर शासकीय मैदानाचे रुप पालटले**

जिल्हा क्रीडा कार्यालय राज्य शासनाच्या क्रीडा खात्याच्या वतीने अन्य संस्थाना क्रीडा साहित्य व क्रीडागंण विकासासाठी अनुदान देते. परंतु निधीअभावी स्वत:चे मैदान विकसीत करू शकत नसल्यामुळे नेहरूनगर शासकीय मैदान दुर्लक्षित आहे, असते. त्या मैदानाचे रुपडे प्रिसिजनने पालटले. हे मैदान दुरुस्ती करून ज्येष्ठांसाठी वॉकिंग ट्रॅक तयार केला. ट्रॅकच्या बाजूला बसण्यासाठी प्रत्येक २० मीटरवर एक बाकडा बसविला आहे. प्रिसिजनने योगासाठी स्वतंत्र जागा, व्यायामासाठी ओपन जिम तयार करून खेळाडूंना आवश्यक क्रीडा साहित्य व प्रसंगी आर्थिक मदतही केली आहे. स्थानिक खेळाडूंसाठी दर्जेदार सुविधा निर्माण करण्याच्या त्यांच्या प्रयत्नामुळे नवोदित खेळाडूंना सरावासाठी योग्य वातावरण मिळत असून, क्रीडाक्षेत्रात नव्या आशा निर्माण होत आहेत.



**स्ट्रेट ड्राईव्ह**
**अजितकुमार संगवे**
मो.9881133103

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापुरातील ३ हजार ५०० शाळांची पटपडताळणी


## १ हजार नोडल अधिकारी तसेच गटविकास अधिकारी आणि पंचायत समितीचे कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**प्रत्येक शाळेसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त**

**बीडीओ पंचायत समिती कर्मचारी यांचा सहभाग**

**शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन माहिती संकलन**

**त्रुटी आढळलेल्या शाळाबाबत शासन निर्णय घेणार**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**
राज्यातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या पटपडताळणी मोहिमेस आज पासून प्रारंभ झाला आहे. सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद तसेच खासगी अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या ऑनलाईन पद्धतीने तपासली जाणार आहे. त्याच पद्धतीने शिक्षण व्यवस्थेची अचूक माहिती मिळवण्यासाठी आणि शाळांच्या प्रत्यक्ष स्थितीचा आढावा घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून मोठ्या प्रमाणावर पटपडताळणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत जिल्ह्यातील तब्बल ३ हजार ५०० शाळांची तपासणी केली जाणार असून, यासाठी १ हजार नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली.

या पटपडताळणी मोहिमेत गटविकास अधिकारी (बीडीओ), पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी यांचाही सक्रिय सहभाग असणार आहे. प्रत्येक शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांची संख्या, उपस्थिती, शिक्षकांची उपलब्धता, शाळेची भौतिक सुविधा तसेच शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी याची सखोल तपासणी केली जाणार आहे. कागदोपत्री दाखविलेली माहिती आणि प्रत्यक्ष परिस्थिती यामध्ये तफावत असल्यास ती त्वरित निदर्शनास आणून दिली जाणार आहे. या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सर्व प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेऊन यासंबंधी विशेष सूचना दिल्या आहेत. अनेक वेळा शाळांबाबतची माहिती कागदावर वेगळी आणि प्रत्यक्षात वेगळी असल्याचे आढळते. त्यामुळे अशा प्रकारच्या मोहिमेमुळे खरी स्थिती स्पष्ट होऊन प्रशासनाला योग्य निर्णय घेणे सोपे होणार आहे. या मोहिमेदरम्यान गोळा करण्यात आलेली माहिती ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर केली जाणार असून, त्याचे विश्लेषण करून पुढील उपाययोजना आखल्या जाणार आहेत. तसेच, कोणतीही चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. ग्रामीण भागातील शाळांची परिस्थिती, मूलभूत सुविधा, शिक्षकांची कमतरता किंवा इतर अडचणी यांचे वास्तव चित्र या पटपडताळणीमुळे समोर येणार आहे. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा राबविण्यास मदत होणार आहे. एकूणच, सोलापूर जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्र अधिक सक्षम, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण करण्याच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वाची ठरणार असल्याचे मानले जात आहे.

### अशी होणार अंमलबजावणी

शहर जिल्ह्यातील सुमारे ३ हजार ५०० या प्रत्येक शाळेसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहेत. यामध्ये गटविकास अधिकारी आणि पंचायत समिती कर्मचारी यांचा सहभाग असणार आहे. यादरम्यान शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन माहिती संकलन केली जाणार आहे. प्रत्येक शाळेत किती विद्यार्थी उपस्थित आहेत आणि त्यांची पटसंख्या किती आहे याचे ऑनलाइन रजिस्टर होणार आहेत. त्यासाठी स्टुडन्ट पोर्टल एच.एम.लोगिंद्वारे हा अहवाल ऑनलाईन प्रणालीद्वारे शासनाकडे सादर केला जाणार आहे. तीन दिवसांच्या पडताळणीनंतर सदरचा अहवाल शासनाकडे पाठवल्यानंतर शासन यासंबंधी निर्णय घेईल.

**- कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी**

---

## महत्वाचे...



### अक्कलकोट येथे खा. ज्योती वाघमारे, माजी मंत्री म्हेत्रे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १० एप्रिल-**
शिवसेना शिंदे गटाच्या राज्यसभेच्या खासदार ज्योती वाघमारे यांची खासदारपदी वर्णी लागल्याबद्दल तसेच शिवसेना शिंदे गटाचे नेते माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त अक्कलकोट येथे सत्कार करण्यात आला. जुना आडत बाजारातील प्रांगणात शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास दुधनीचे नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे, शिवानंद पाटील, अमर पाटील, नगरसेवक अमोल शिंदे, शिवराज म्हेत्रे, महेश साठे, आनंद तानवडे, प्रवीण तानवडे, शितल म्हेत्रे, संगीता पाटील, भीमाणा सोलापुरे, नगरसेविका सरिता कुरले आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास व्यंकट मोरे, सुनील कटारे, स्वामीनाथ हेगडे, वैशाली हावनूर, वर्षा चव्हाण, क्रांती भरमशेट्टी मुबारक कोरबू, महादेव चुंगी, शिवशरण इचगे, गुरु म्हेत्रे, राहुल बकरे, सुनील ईसापुरे, अजय सलगर उपस्थित होते.



### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समाजोपयोगी साहित्याचे वाटप

**बार्शी, दि. १० एप्रिल-**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भीमनगर येथील बौद्ध विहार येथे समाजोपयोगी उपक्रम पडला. याप्रसंगी भीम टायगर मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्था, आरपीआय (आठवले) तसेच बहुजन हिताय मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्यावतीने बौद्ध विहाराला सहा सीलिंग फॅन भेट देण्यात आले. कार्यक्रमावेळी भीम टायगर मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक शंकर वाघमारे, आरपीआय (आठवले) गटाचे शहराध्यक्ष ॲड. अविनाश गायकवाड, बहुजन हिताय मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक ॲड. प्रसन्नजीत नाईकनवरे, नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टिसचे तालुका अध्यक्ष सनी गायकवाड, दीपक काकडे, मक्रोज बोकेफोडे, अशोक बोकेफोडे, दीपक बोकेफोडे, राजेंद्र कदम, दयावान लंकेश्वर, ॲड. धीरज कांबळे, अभिषेक अय्यर, वैभव काकडे, निलेश वाघमारे, भालचंद्र राजगुरु, कपिल बोकेफोडे उपस्थित होते. दीपक बोकेफोडे यांनी संस्थांच्या कार्याचे कौतुक व्यक्त केले.



### चोपडी वनविभागातील १८ हजार झाडांना पाणी घालण्यास सुरुवात

**सांगोला,दि. १० एप्रिल-**
चोपडी (ता.सांगोला) येथील वनविभागात झाडे जगवा उपक्रमाला सुरूवात करण्यात आली असून वनविभागातील १८ हजार झाडांना टँकरच्या साहाय्याने पाणी देण्यास सुरुवात केली असून पावसाळा सुरु होईपर्यंत काम चालू राहणार आहे. आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नामुळे तसेच शेतकरी, युवक, वनविभागाचे कर्मचारी यांच्या कष्टातून निसर्ग फुलणार आहे. चोपडी ग्रामस्थांनी या झाडांना वाचवण्यासाठी थेट सांगोला वनपरीक्षेत्र कार्यालयासमोर ठिय्या मांडला होता. त्यावेळी आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी यासाठी आर्थिक तरतूद करण्याचा शब्द दिला होता. प्रगतशील शेतकरी भागवत बाबर यांनी संपूर्ण पाण्याची सोय केली आहे. माजी सैनिक सुनील बाबर यांनी नारळ फोडून झाडे जगवा मोहिमेचा शुभारंभ केला. यावेळी सेवानिवृत्त सुभेदार अमोल बाबर, दिलीप बाबर, एम. एस. बाबर, विनायक बाबर, विकास बाबर, वनपाल नरळे उपस्थित होते.



### जिजामाता प्राथमिक शाळेस विद्यार्थ्यांकडून रेफ्रीजेटर भेट

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**
जिजामाता प्राथमिक शाळा तुळशीदासनगर कोंडी या शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांकडून निरोप समारंभ आयोजित करण्यात आले होते. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ होते तर प्रमुख अतिथी म्हणून संचालिका सोनाली ठोकळ, ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया भोसले, मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर, जाधव उपस्थित होते. यावेळी सातवीच्या विद्यार्थ्यांकडून शाळेस रेफ्रीजेटर भेट देण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर यांनी केले. कार्यक्रमाचे सचिवा शिल्पाताई ठोकळ, संचालक सत्वजय ठोकळ यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

# मुस्ती येथे जंगी कुस्त्यांचे आयोजन

**ग्रामदैवत शेख उमर साहेब यात्रा महोत्सव**



**तभा प्रतिनिधी,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**
ग्रामदैवत शेख उमर साहेब यात्रा महोत्सव २०२६ निमित्त मुस्ती येथे आयोजित भव्य जंगी कुस्त्यांनी संपूर्ण परिसरात उत्साहाची लाट उसळवली. आखाडा प्रेक्षकांनी खचाखच भरला होता. या सोहळ्याला बाजार समिती उपसभापती सुनील कळके, गड्डू अण्णा पटणे बोरामणी, माजी सरपंच नागराज पाटील विद्यमान सरपंच बालाजी जमादार उपसरपंच हरी शिंदे ,भाजपा मंडळ अध्यक्ष महादेव पाटील, देवराज बिराजदार ,शैलेश पाटील, तंटामुक्त अध्यक्ष गौतम चौधरी पोलीस पाटील रजनीकांत मेहता, रमेश चव्हाण,सुरेश चव्हाण यांनी उपस्थित राहून कुस्त्यांचा आनंद घेतला

मुख्य लढतीत योगेश पवार (उप महाराष्ट्र केसरी) विरुद्ध फेडरेला लिमा (ब्राझील) असा दमदार सामना रंगला आणि योगेश पवार विजयी ठरले. त्यानंतर नवीन कुमार (हिमाचल प्रदेश) व देवा थापा (नेपाळ) यांच्यातील लढत प्रचंड रंगली; देवा थापा यांनी आक्रमक डावपेचांनी विजय मिळवला. ५,००० ते २,५१,००० पर्यंतच्या कुस्त्या लावण्यात आल्या होत्या.

कुस्ती सोहळ्याची संकल्पना व नियोजन माजी सभापती भीमाशंकर जमादार आणि माजी सभापती कल्याणराव पाटील यांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने केले. आखाड्याची मांडणी, पैलवानांचे स्वागत, प्रेक्षकांची व्यवस्था, वेळेचे काटेकोर नियोजन आणि संपूर्ण कार्यक्रमाची सुसूत्रता यामध्ये त्यांच्या अनुभवाचा ठसा स्पष्ट जाणवला. परंपरेचा मान राखत आधुनिक नियोजनाची जोड देत त्यांनी हा सोहळा आदर्शवत उभा केला. सूत्रसंचालन धाराशिव येथील गोविंद घाडगे आणि मुस्ती येथील अशोक कस्तुरे यांनी आपल्या प्रभावी शैलीत केले तसेच यात्रा कमिटी अध्यक्ष भीमाशंकर चौधरी व समस्त ग्रामस्थ यांच्या परिश्रमामुळे हा कुस्ती सोहळा यशस्वीरिता पार पडला.

---

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त आजपासून तीन दिवसीय प्रबोधन व्याख्यानमाला

**तभा प्रतिनिधी,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**
भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधन समितीच्या वतीने ११ ते १३ एप्रिल २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ६ वाजता जुळे सोलापूर येथील वसुंधरा कला महाविद्यालयात तीन दिवसीय प्रबोधन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष प्रशांत गायकवाड यांनी दिली.

या व्याख्यानमालेची सुरुवात ११ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता होणार असून उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक माजी मंत्री प्रा. डॉ. लक्ष्मणराव ढोबळे यांच्या हस्ते होईल. जातविरहित समाजव्यवस्थेची संकल्पना : संत बसवण्णा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान या विषयावर समाजवादी विचारवंत शंकर पाटील मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी प्राचार्य अंबादास पांढरे राहणार आहेत. १२ एप्रिल रोजी डॉ. आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून संविधानिक आरक्षण आणि न्यायालयांची भूमिका या विषयावर परभणी येथील शिवाजी विधी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. विजय माकणीकर यांचे व्याख्यान होणार असून, अध्यक्षस्थानी संविधान अभ्यासक निजामुद्दीन शेख राहतील.

१३ एप्रिल रोजी आंबेडकरी चळवळ : ऐतिहासिक वाटचाल, सद्यस्थिती, आव्हाने व पर्याय या विषयावर प्रा. डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी प्राचार्य तानाजी देशमुख राहणार आहेत. या व्याख्यानमालेद्वारे समाजातील विविध घटकांमध्ये विचारप्रबोधन घडवून आणण्याचा प्रयत्न असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजन समितीचे अध्यक्ष प्रशांत गायकवाड, प्रा. एम.आर. कांबळे, मनीष सुरवसे, प्रा. डॉ. सुहास उघडे, प्रशांत बाबर, अरविंद जेटीथोर , राजेश जगताप, सचिन साबळे , रतिकांत कांबळे, अंबादास आळगीकर, मुसा अत्तार यांनी केले आहे.

---



# सण, उत्सव, जयंती शांततेत साजरे होण्यासाठी पंढरपुरात पोलिसांचा रूट मार्च

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० एप्रिल-**
आगामी सण, उत्सव, जयंती हे शांततेत पार पाडण्याच्या अनुषंगाने पंढरपूर शहर पोलीस स्टेशन यांच्याकडून रूट मार्च घेण्यात आला. तसेच नागरिकांना आगामी उत्सव, जयंती शांततेत व सामाजिक सलोखा ठेवून साजरे करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या. त्याचबरोबर आक्षेपार्ह ,धार्मिक व सामाजिक सलोखा बिघडेल अशा पोस्ट सोशल मीडियावर टाकणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा सूचनाही देण्यात आल्या. सदर रूट मार्च पंढरपूर शहरातील प्रमुख मार्गावरून घेण्यात आला.

या रूट मार्च मध्ये सहाय्यक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे, पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे चार पोलीस अधिकारी व ३३ पोलीस अंमलदार सहभागी झाले होते.

---

# तीर्थक्षेत्र अरण येथे मंगळवारी चंदन उटी सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**
संत शिरोमणी सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्ट अरण आणि संत शिरोमणी सावता महाराज भक्त परिवार महाराष्ट्र राज्य यांच्या नियोजनात मंगळवार दि. १४ एप्रिल २०२६ रोजी तीर्थक्षेत्र अरण येथे चंदन उटी सोहळा आणि संत शिरोमणी सावता महाराज कर्मभूषण पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संत सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव हभप प्रभू महाराज माळी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री जयकुमार गोरे, मंत्री छगनराव भुजबळ, मंत्री अतुल सावे, आ. योगेश टिळेकर उपस्थित राहणार आहेत. यावेळी जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक भाग्यश्री जाधव आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी हभप ज्ञानेश्वर माऊली कदम, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

---



# विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनतर्फे महावितरण संचालक पवार यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) मानव संसाधन विभाग संचालक राजेंद्र पवार. प्रकाशगड, मुंबई नियोजन दौऱ्यानुसार गुणगौरव सोहळा २०२५-२६ या कार्यक्रमानिमित्त सोलापूर येथे आले असता, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन (१०२९) यांच्यावतीने स्वागत-सत्कार करण्यात आले. याप्रसंगी संघटनेचे केंद्रीय कोषाध्यक्ष तानाजी चटके, पुणे प्रादेशिक संघटक सुनिल काळे, उत्तरेश्वर स्वामी, अनिलकुमार बनसोडे, अजिम चौधरी, बालाजी वरडे, बिभीषण चव्हाण, विजय बेदरे, अमर धस, बळीराम कदम उपस्थित होते.

---

# महात्मा बसवेश्वर स्मारकासाठी नारी शक्तीची गर्जना



**मंगळवेढ्यात महिलांचा सहभाग**

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि.९ एप्रिल -**
लोकशाहीचे खरे जनक जगदज्योती महात्मा बसवेश्वरांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारक झालचं पाहिजे अशी गर्जना देऊन मंगळवेढ्यातील नारी शक्ती एकवटली आहे महात्मा बसवेश्वर स्मारक प्रबोधन सप्ताहानिमित्त मंगळवेढ्यात महिलांची प्रबोधन पदयात्रा काढण्यात आली. मंगळवेढ्यात स्मारकाची मागणी जोर धरत असताना आता मात्र महिला भगिनी रस्त्यावर उतरून एकजुटीने हा लढा पुढे घेऊन जात आहेत. दामाजी मंदिरापासून सुरु झालेल्या पदयात्रेत शिवप्रेमी चौक,चोखामेळा चौक, मुरलीधर चौक, शनिवार पेठ आदी मार्गांवर प्रबोधन जनजागृती करण्यात आली. यावेळी पर्यटन विकासाला चालना मिळण्यासाठी स्मारक झालचं पाहिजे, छोटे-मोठे उद्योग सुरु होण्यासाठी स्मारक झालचं पाहिजे. रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी स्मारक झालचं पाहिजे,अर्थ व्यवस्थेला बळकटी येण्यासाठी स्मारक झालचं पाहिजे,सामाजिक व सांस्कृतिक देवाण घेवाण होण्यासाठी स्मारक झालचं पाहिजे, भविष्यात रेल्वे व विमानसेवा सुरु होण्यासाठी स्मारक झालचं पाहिजे, विदेशातील लोक अभ्यासाला येण्यासाठी स्मारक झालचं पाहिजे असे संदेश देणारे फलक व बसवेश्वरांच्या वेशभूषेतील लहान मुले सर्वांचे लक्ष वेधक आकर्षक ठरले.

---



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त साड्या वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**
महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून माजी महापौर स्व.महेश कोठे यांच्या जयंतीनिमित्त स्व. विष्णुपंत कोठे मेमोरियल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर तथा कोठेज गॅस्ट्रो केअर सेन्टर यांच्यावतीने डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी महाबोधी बुद्धविहार सम्राट चौक येथे महाबोधी लेझीम संघाच्या माध्यमातून माता भगिनींना साड्यांचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक महाबोधि लेझीम संघाचे उत्सव अध्यक्ष सुजित शेंडगे यांनी केले. यावेळी मंडळाचे संस्थापक शांतकुमार नागटिळक, अमोल गोडसे, सतीश लोंढे उपस्थित होते. यावेळी उद्योजक वेंकटेश चिल्का, संतोष सोमा, राजुल, श्याम कुमार गंजी, प्रा.विठ्ठल लोहार, छत्रपती अवशेट्टी उपस्थित होते. सुजित शेंडगे यांनी आभार मानले. १ हजारहून अधिक साड्यांचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन बिभीषण सिरसट यांनी केले.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## बार्शी ग्रामीणमध्ये जनगणना प्रक्रियेला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० एप्रिल-**

तब्बल १५ वर्षांनंतर जनगणना प्रक्रियेला प्रारंभ झाला असून बार्शी ग्रामीण भागात (बार्शी शहर व वैराग वगळून) ही मोहीम राबविण्यात येत आहे.

या जनगणनेसाठी एकूण ४३८ प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली असून ४३ प्रगणक राखीव ठेवण्यात आले असल्याची माहिती चार्ज अधिकारी तथा तहसीलदार एफ.आर. शेख यांनी दिली. जनगणना प्रक्रियेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ७३ सुपरवायझर नेमण्यात आले असून ८ सुपरवायझर राखीव ठेवण्यात आले आहेत. तसेच प्रगणक व सुपरवायझर यांना प्रशिक्षण देण्यासाठी ९ मास्टर ट्रेनर नेमण्यात आले असून त्यांचे प्रशिक्षण पुढील तीन दिवसांत पूर्ण होणार आहे. या जनगणना मोहिमेचे चार्ज ऑफिसर म्हणून तहसीलदार एफ. आर. शेख तर अतिरिक्त चार्ज अधिकारी म्हणून निवासी नायब तहसीलदार सुभाष बदे हे कामकाज पाहणार आहेत.दरम्यान, ही जनगणना प्रक्रिया दोन टप्प्यांत राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात प्रगणकांमार्फत घर गणना (घर यादी तयार करणे) केली जाणार आहे. यासाठी नागरिकांना १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत मोबाईल पच्या माध्यमातून स्वगणना करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानंतर १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान प्रगणक घरोघरी जाऊन घर यादी तयार करणार आहेत. तरी बार्शी ग्रामीण मधील नागरिकांनी प्रगणक आपल्या भागात आल्यानंतर आपली माहिती त्यांना द्यावी, असे आवाहन तहसीलदार एफ.आर. शेख यांनी केले आहे.

## महत्त्वाचे

### संतविचारांनी जगा; ज्ञानाने अज्ञान नष्ट होते : बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर

**मोडनिंब, दि. १० एप्रिल-**

भगवंताचे तीन रूप आहेत. पहिले सत्, चित्त आणि आनंद अशी तीन रूप आहेत. परमात्मा सदस्वरूप आहे. परमात्मा चित्त स्वरूप आहे. आणि परमात्मा आनंद स्वरूप आहे. ज्ञान प्राप्त झाले की, अज्ञान नष्ट होते. अज्ञान गेल की जीव मत्सर रहित होतो. जो मत्सर रहित झाला तो कृष्णकृपेचा अधिकारी झाला. पांडुरंग कृपेचा अधिकारी झाला. जगताला निर्माण करणे, जगताच पालन करणे ही भगवंताची कार्य असल्याचे परमपूज्य बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांनी श्रीमद भागवत कथेचे प्रथम पुष्प गुंफताना विवेचनात सांगितले. मोडनिंब (ता.माढा) येथे बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांची भागवत कथा भाविकांच्या प्रचंड प्रतिसादात सुरु आहे. प्रारंभी या संगीतमय कथेचे पुष्प गुंफताना बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांनी कलीयुगामध्ये परमात्म्याचे नाम, भगवंत दर्शन आणि साधुसंगती श्रेष्ठ असल्याचे सांगितले. मोडनिंब येथे गुरुवारपासून कथेला सुरवात झाली. राष्ट्रसंत सद्गुरू श्रीपादबाबा यांच्या २८ व्या पुण्यतिथी महोत्सव निमित्त या संगीतमय सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.श्री संगनबसवेश्वर मठ येथे सप्ताह पार पडणार आहे. रोज सायंकाळी सात ते दहा वाजेपर्यंत चालणाऱ्या या सोहळ्यात टेंभुर्णी, मोडनिंब, अरण व बावी, गिड्डेवाडी, आष्टी, तेलंगवाडी, शेटफळ, जाधववाडी, तुळशी, बैरागवाडी, भेंड येथील हजारो भाविक सहभागी होतात.



### विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती व्यवस्थापकपदी प्रवीण घम

**पंढरपूर, दि. १० एप्रिल-**

येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या व्यवस्थापकपदी प्रवीण घम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मंदिर समितीचे तत्कालीन व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी चांगले काम केले होते. त्यांनी मंदिर प्रशासनामध्ये शिस्त लावुन सुसुत्रता आणली होती. यामुळे मनोज श्रोत्री हे मंदिर समितीचे काही सदस्य तसेच मंदिरातील कर्मचाऱ्यांना नकोसे झाले होते. त्यामुळे त्यांच्यावर तथाकथित आरोप लावून त्यांची बदली करण्यात आली. त्यानंतर मंदिर समितीचे कामकाज सहव्यवस्थापक पहात होते. यामुळे हे काम पाहत असताना सहव्यवस्थापकांना अनेक अडचणी येत होत्या. त्यामुळे मंदिर समितीस कायमस्वरुपी व्यवस्थापक मिळावा अशी मागणी वारंवार बातम्यांच्या माध्यमातून वृत्तपत्रांमधून करण्यात येत होती. अखेर वृत्तपत्रांमधील बातम्यांची विधी व न्याय विभागाने दखल घेऊन विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या व्यवस्थापकपदी सोलापूर येथील निवडणूक शाखेतील नायब तहसीलदार प्रवीण घम यांची नियुक्ती केली आहे.



### शिवसेना शिंदे गटाच्या युवती सेनेच्या बार्शी शहराध्यक्षपदी ॲड. शीतल गुंड

**बार्शी, दि. १० एप्रिल-**

शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाच्या युवती सेनेच्या बार्शी शहर अध्यक्षपदी ॲड. शीतल काकासाहेब गुंड यांची नियुक्ती करण्यात आली. शिवसेना पक्ष वाढीसाठी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात प्रामाणिक प्रयत्न करेन आणि झालेली निवड सार्थ ठरवेन, असा विश्वास ॲड. गुंड यांनी व्यक्त केला. सदर निवड ही शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेशानुसार शिवसेना नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली युवा सेना कार्याध्यक्ष कवेश सरनाईक व युवा सेना सचिव किरण साळी यांचे सुचनेनुसार सदर निवड करण्यात आली.





### उजनी धरणातून भीमा नदीत तातडीने पाणी सोडण्याची मागणी

**पंढरपूर, दि. १० एप्रिल-**

सध्या वाढत्या उन्हामुळे भीमा नदीपात्रातील पाणीसाठा अत्यंत कमी झाला असून उपलब्ध पाणी केवळ पुढील ७ ते ८ दिवस पुरेल, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असून शेतीसाठीही पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने उजनी धरणातून भीमा नदीपात्रात तातडीने पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत कार्यकारी अभियंता, भीमा पाटबंधारे विभाग, उजनी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, पाणीटंचाईमुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना शेतीसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन उजनी धरणातून पाणी सोडावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तानाजी बागल, सचिन पाटील, सचिन आटकळे, नानासाहेब चव्हाण, समाधान चव्हाण उपस्थित होते.

## बार्शीतील २३ गावांसाठी टंचाई आराखडा तयार

**उन्हाच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय सज्जता**

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि. १० एप्रिल-**

राज्यात उन्हाचा पारा चढू लागल्याने पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवण्याची शक्यता आहे. बार्शी तालुक्यात सध्या पाण्याची परिस्थिती समाधानकारक असली, तरी मे महिन्यातील संभाव्य टंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच कंबर कसली आहे. तालुक्यातील २३ अतिसंवेदनशील गावांसाठी विशेष टंचाई आराखडा तयार करण्यात आला असून, टँकर आणि विहीर अधिग्रहणाचे चोख नियोजन पूर्ण झाले आहे.

२०२५ मध्ये झालेल्या दमदार पावसामुळे तालुक्यातील विहिरी, ओढे आणि मध्यम प्रकल्पांमध्ये अद्याप चांगला पाणीसाठा आहे. त्यामुळे एप्रिल महिना उजाडला तरी टंचाईची झळ मोठ्या प्रमाणावर पोहोचलेली नाही. मात्र, मे महिन्यात तापमानात मोठी वाढ होण्याची शक्यता असल्याने, नागरिकांची पाण्यासाठी वणवण होऊ नये या उद्देशाने प्रशासनाने 'आधीच सावध' पवित्रा घेतला आहे.

सध्या तालुक्यातील भोयरे, खडकलगाव आणि रास्तापूर या तीन गावांनी पिण्याच्या पाण्यासाठी विहीर अधिग्रहणाचे प्रस्ताव प्रशासनाकडे सादर केले आहेत. उन्हाची तीव्रता जशी वाढेल, तसे इतर गावांकडूनही मागणी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. गेल्या वर्षी एप्रिल-मे मध्ये घोळवेवाडी, धोत्रे, खडकलगाव, राऊळगाव आणि कळंबवाडी (पा) या गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली होती. तो अनुभव गाठीशी ठेवून यंदा प्रशासनाने एप्रिलमध्येच सर्व तांत्रिक आणि प्रशासकीय तयारी पूर्ण केली आहे.



**प्रशासनाचे उपाययोजनांचे नियोजन**

पंचायत समितीच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता अजित कुमार वाघमारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशासनाने याप्रमाणे उपाययोजनांचे नियोजन केले आहे. गरज भासल्यास खाजगी विहिरींचे तातडीने अधिग्रहण करणे, अतिदुर्गम किंवा तीव्र टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजन, गावांकडून मागणी येताच तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून उपाययोजना राबवणे.

> **सूक्ष्म नियोजन केले आहे**
>
> तालुक्यातील नागरिकांना ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी आम्ही सूक्ष्म नियोजन केले आहे. २३ गावांच्या टंचाई आराखड्यामुळे आम्हाला वेळेत मदत पोहोचवणे शक्य होईल.
>
> **- अजितकुमार वाघमारे**
> (उपविभागीय अभियंता, बार्शी तालुका)

**टंचाई आराखड्यात समाविष्ट असलेली २३ गावे**

प्रशासनाने ज्या गावांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे, ती गावे याप्रमाणे: रऊळगाव, तुळशीदासनगर, कळंबवाडी (आ), बोरगाव, झाडी, घाणेगाव, आळजापूर, खडकलगाव, गुळपोळी, अरणगाव, भातंबरे, पानगाव, गोरमाळे, शेलगाव (मा), शेलगाव व्हळे, धोत्रे, खामगाव, गाताचीवाडी, घोळवेवाडी, वानेवाडी, कुसळंब, भोयरे आणि रुई पिंपळगाव (धस).

## दहावीनंतरच्या करिअरविषयी आज विशेष मार्गदर्शन चर्चासत्र

**शिक्षणतज्ज्ञ विवेक वेलणकर यांचे मार्गदर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० एप्रिल-**

प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे दहावी आणि त्यानंतर प्रश्न पडतो दहावीनंतर पुढे काय? हा प्रश्न विद्यार्थी आणि पालक दोघांसाठीही चिंतेचा विषय असतो. या महत्त्वाच्या आणि निर्णायक टप्प्यावर योग्य दिशा मिळावी आणि करिअर निवडीतील संभ्रम दूर व्हावा, यासाठी माईर्स एम आयटी पुणे संचालित, एमआयटी विश्वशांती गुरुकुल वाखरी, पंढरपूर येथे एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या सायंकाळी ५ ते ७ यावेळेत विशेष करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले आहे.

या चर्चासत्रासाठी सर्व १० वी उत्तीर्ण विद्यार्थी व पालकांसाठी प्रवेश पूर्णपणे मोफत असून नोंदणीसाठी ९२०९०४३७३९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन एमआयटी संस्थेने केले आहे. या करिअर मार्गदर्शन विशेष चर्चसत्रात प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि करिअर समुपदेशक विवेक वेलणकर विद्यार्थी व पालकांना दहावीनंतर करिअरची निवड कशी करावी आणि विविध क्षेत्रातील संधींविषयी सखोल मार्गदर्शन करणार आहेत. एनडीए,जेईई,नीट या सारख्या प्रवेश आणि स्पर्धा परीक्षांची प्रभावी तयारी कशी करावी. सायन्स व कॉमर्स शाखांमधील आधुनिक व उच्च संभाव्यतेचे करिअर पर्याय. योग्य कोर्स निवडीसाठी आवश्यक निकष व भविष्यातील आव्हाने. विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या सर्व शंकांचे निरसन, एनडीए म्हणजेच संरक्षण क्षेत्रातील करिअरच्या संधींविषयी कर्नल डी.के. उपाध्याय मार्गदर्शन करणार आहेत.

**विशेष वाहतूक सुविधा**

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी पंढरपूर येथील बस स्टँड, अर्बन बँक, शिवाजी महाराज चौक व ठाकरे चौक येथून दुपारी ४.३० वाजता बसची विनामूल्य व्यवस्था करण्यात आली आहे.

## अकलूजमध्ये प्रत्येक प्रभागात दोन हायमास्ट दिवे, रस्ते विकासाला गती

**नगराध्यक्षा रेश्मा अडगळे व उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १० एप्रिल-**




अकलूज नगरपरिषदेची मासिक सर्वसाधारण सभा नगराध्यक्ष रेश्मा अडगळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेला उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील व मुख्याधिकारी सचिन पाटील यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते. सभेत विविध विकासकामां बाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. अकलूज नगर परिषदेच्या वतीने शहरातील सर्व १३ प्रभागांमध्ये प्रत्येकी दोन अशा एकूण २६ हायमास्ट दिवे बसविण्यास मंजुरी देण्यात आली.

प्रकाशव्यवस्था अधिक सक्षम होणार आहे. तसेच सर्वसाधारण रस्ता अनुदानांतर्गत नगर परिषद हद्दीतील विविध ठिकाणी रस्ते विकसित करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नगर परिषद सभागृहात सीसीटीव्ही कॅमेरे व अत्याधुनिक साऊंड सिस्टिम बसविण्याचाही निर्णय घेण्यात आला. केंद्र शासनाच्या 'अमृत २.०' योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी आवश्यक जॅकवेल या उपंगासाठी ७७ मैल येथे नंदविजय ॲग्रो फार्मसी ॲंड डेव्हलपर्स प्रा. लि. तर्फे नंदिनीदेवी विजयसिंह मोहिते पाटील यांनी संस्थेकडून दहा गुंठे जागा विना मोबदला नगर परिषदेला बक्षीस पत्राद्वारे दिल्याबद्दल सभेत त्यांच्या आभाराचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

शहरातील वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने विविध चौकांमध्ये ट्रॅफिक सिग्नल प्रणाली बसविण्याबाबतही सकारात्मक चर्चा करण्यात आली. दरम्यान, शहीद वीर जवान हनुमंत निवृत्ती करडे यांच्या स्मरणार्थ लक्ष्मीनारायण नगर अंतर्गत रस्त्यास त्यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच प्रथमाचार्य शांतिसागर महाराज यांच्या नावाने महावीर पथ ते उदयसिंह मोहिते पाटील कॉम्प्लेक्स आणि तेथून अकलाई आयसीयू नवीन बसस्थानकाच्या मागील रस्त्याला नामकरण करण्यासही मान्यता देण्यात आली. सभेत घेतलेल्या या निर्णयांमुळे अकलूज शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



## आम्हाला वेगळा गट द्या; भालकेंच्या निर्णयाला नगरसेवकांचा सुरुंग

**• जिल्हाधिकाऱ्यांना दिले पत्र**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० एप्रिल-**

विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगीरथ भालके यांनी भैरवनाथ शुगर्सचे अध्यक्ष अनिल सावंत यांच्यासह शिंदे शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले आहे. मात्र पालिकेतील त्यांच्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीतून विजयी झालेल्या बहुतांश नगरसेवकांनी या पक्षप्रवेशास चक्क विरोध दर्शविला आहे. कारण या नगरसेवकांनी चक्क जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत आपल्या वेगळ्या गटास मान्यता द्यावी, असे सांगत पालिकेत वेगळी चूल मांडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे भगिरथ भालकेंची पक्षप्रवेशाच्या अगोदर घरातच गोची झाल्याचे बोलले जात आहे.

पंढरपूर, मंगळवेढा शहर आणि तालुक्याच्या विकास कामांसाठी भगीरथ भालके यांनी शिंदे शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतला आहे. या बाबत पंढरपूर येथे त्यांची आपल्या कार्यकर्त्यां समवेत बैठक सुरू असतानाच दुसरीकडे त्यांच्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे काही नगरसेवक मात्र जिल्हाधिकारी यांच्या भेटीला सोलापूर येथे दाखल झाले होते. विशेष म्हणजे स्व. भारत भालके यांनी पंढरपूर नगरपरिषद निवडणुकी दरम्यान पंधरा वर्षापूर्वी जी तीर्थक्षेत्र विकास आघाडी स्थापन केली होती, त्या आघाडीशी भालके यांचा संबंध नसल्याचे त्यांनी जाहीर केले व व्हिपचा अधिकार देखील नसल्याचे सांगितले आहे. तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या बॅनरखाली निवडून आलेले नागेश भोसले, प्रसाद कळसे, संजय बंदपडे, अक्षय गंगेकर, नगरसेविका प्रणिता घाडगे यांचे पती किरण घाडगे, नगरसेविका साधना धोत्रे यांचे पती सुधीर धोत्रे, नगरसेविका रुक्मिणी धोत्रे यांचे पती धनाजी धोत्रे यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन स्वतंत्र गट असल्याची भूमिका मांडली आहे. तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे अध्यक्ष धुमाळ उपस्थित होते.

दरम्यान तिर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगरसेवकांच्या या खेळीनंतर विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगीरथ भालके आता नेमकी कोणती भूमिका घेतात ? याकडे विठ्ठल परिवाराचे तसेच भालके समर्थकांचे लक्ष लागले आहे.

## 'रिश्ते मायने रखते हैं' पैसा, सत्ता यापेक्षा कुटुंब महत्त्वाचे

- **खासदार सुप्रिया सुळे यांचे प्रतिपादन**
- **पंढरीत विठुरायाचे घेतले दर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० एप्रिल-**

पैसा सत्ता यापेक्षा कुटुंब महत्त्वाचे असते त्यामुळेच मी नेहमी सांगते, 'रिश्ते मायने रखते है' त्यामुळे संपूर्ण कुटुंब सुनेत्रा वहिनींच्या पाठीशी असल्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाच्या नेत्या तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले. खासदार सुप्रिया सुळे या शुक्रवारी पंढरपूरात विठुरायाच्या दर्शनासाठी आलेल्या होत्या.

त्यावेळी मंदिरात विठुरायाच्या दर्शनानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. सुप्रिया सुळे यांनी सांगितले की, बारामतीच्या पोटनिवडणुकीत माझा रोल मतदानाला जाण्याचा आहे. शेवटी रिश्तेही मायने रखते है.

सुनेत्रा पवारांच्या प्रचाराला जाणार का? या प्रश्नावर उत्तर देताना हा प्रश्न त्यांनी विचारायला हवा असे सांगत अजित पवार गटाकडून बोलावणे आल्यास बारामतीत सुनेत्रा वहिनींचा प्रचार करण्याचे थेट संकेत सुप्रिया सुळे यांनी दिले आहे. तुम्ही हा प्रश्न अजित पवार गटाच्या वतीने विचारत असाल तर त्याचे उत्तर माझ्याकडे तयार असल्याचेही यावेळी त्यांनी म्हटले आहे.

बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध का झाली नाही या प्रश्नावर सुळे यांनी याबाबतचे उत्तर तुम्ही अजित पवार गटालाच विचारा कारण यासाठीची सर्व मॅनेजमेंट तेच पाहत होते, असे सांगत बिनविरोध निवडणूक पूर्ण होण्यामागे अजित पवार गटाचे अपयश असल्याचे संकेतही त्यांनी दिले.

दरम्यान काल दिवसभर मी बारामतीत नव्हते त्यामुळे नेमके काय घडले याची मला माहिती नाही पण निवडणूक काळात निवडणूक लढविण्यास कार्यकर्ते उत्सुक असतात असे सांगत सुप्रिया सुळे यांनी या प्रश्नाला बगल दिली.



> **शेवटी माणसेच लागतात**
>
> पैसा सत्ता यापेक्षा कुटुंब महत्त्वाचे असते त्यामुळेच मी नेहमी सांगते, माणसांच्या अतिसुखात आणि अति दुखात माणसेच लागतात. पैसा, सत्ता, राजकारण हे नेहमी होतच राहते. ते कधीही थांबत नाही. 'रिश्ते मायने रखते है' त्यामुळे संपूर्ण कुटुंब सुनेत्रा वहिनींच्या पाठीशी असल्याचेही खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले. यावेळी त्यांच्या सोबत येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

## देवाच्या सोळावीने अर्धनारी नटेश्वर यात्रेची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १० एप्रिल-**

येथील ग्रामदैवत श्री अर्धनारी नटेश्वर यात्रेची सांगता देवाच्या सोळावी निमित्त आयोजित जागरण-गोंधळ व सत्यनारायण महापूजा कार्यक्रमाने अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडली.



शुक्रवारी सकाळी पुजेचे मानकरी गंगाधर होडगे व लता होडगे यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता सत्यनारायण महापूजा संपन्न झाली. यावेळी श्री अर्धनारी नटेश्वरास मानाचा पोशाख अर्पण करण्यात आला. या पूजेचे पौरोहित्य महेश स्वामी, मन्मथ स्वामी, विवेक जोशी यांनी केले. याप्रसंगी जीवन जानकर, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगूसकर, तसेच यात्रा कमिटीचे अध्यक्ष काशिनाथ आडत, उपाध्यक्ष ॲड. विठ्ठल मंडले, उपाध्यक्ष रणजीत साठे, कार्याध्यक्ष अमोल मंडलिक, खजिनदार दादा तुपे, सरचिटणीस विनायक भगत, सचिव अभिजीत साठे, सेक्रेटरी विजय पवार, सदस्य मनोहर माने, शैलेश होडगे, धनंजय माने-देशमुख, जवान माने देशमुख, संजय मंडले, दीपक राऊत, अमृतराव माने-देशमुख, रविराज गायकवाड, सीमा खाडे, प्रियंका आडत, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, महादेव म्हेत्रे, शिवाजी सावंत, युवराज मंडले, शिवाजी मंडले, शंकर आडत, डॉ. धनंजय मेहत्रे, राहुल सराटे, धनंजय शिवपुजे, रायचंद खाडे, पुजारी गौरीहर गुरव, सतिश गुरव, रविराज गुरव उपस्थित होते. सायंकाळी सोळावी निमित्त देवाला पारंपरिक जागरण गोंधळ घालण्यात आला. यावेळी ग्रामस्थ व नागरिकांकडून भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यात्रा सोहळा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी आमदार उत्तमराव जानकर, पं.स. सदस्या विमल जानकर, जि.प.सदस्या मीनाक्षी सरतापे, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगुसकर, ग्राम विकास अधिकारी कैलास सुरवसे, यात्रा कमिटी अध्यक्ष काशिनाथ आडत व त्यांचे सर्व सहकारी, वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलिस अधिकारी आशिष कांबळे, तरुण भाविक, तसेच कर्मचारीवर्ग यांचे सहकार्य लाभले.